# एकत्र गुंफून जीवित-धागे

सुधा जोशी : रा. भि. जोशी

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 3526



REFBK-0026882

...ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

15 MAY 1993

24 JUL 1993

14 AUG 1993

( क्र. मा. पहा )
१००००–११–८९

संदर्भ
निबंध
3५२८
२६८८२
9/3/83

निबंध
3५२८
२६८८२
9/3/83

मराठी

# एकत्र गुंफून जीवित - धागे

सुधा जोशी / रा. भि. जोशी

REFBK-0026882

अश्वमेध प्रकाशन
डोंबिवली

**प्रकाशक**
अश्वमेध प्रकाशन
रमेश नरहर वाडेकर
कृष्णनिवास, मानपाडा रोड,
डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१

© **नीलिमा भावे**
२, झपूर्झा, साहित्यसहवास
बांद्रे (पूर्व) ४०० ०५१

**लेखकद्वय**
सुधा जोशी / रा.भि. जोशी

**प्रकाशन क्रमांक : ४०**

**प्रथमावृत्ती**
६ नोव्हेंबर १९९२

**मुखपृष्ठ**
सौ. पद्मा सहस्रबुद्धे

**अक्षरजुळणी**
अभिषेक टाईपसेटर्स
१२६५, सदाशिव पेठ
पुणे : ४११ ०३०

**मुद्रक**
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
पुणे : ४११ ०३०

**किंमत** - रु. ४० /- फक्त

# प्रास्ताविक

६ नोव्हेंबर १९९२ हा माझे वडील रा. भि. जोशी ( भाऊ ) यांचा पहिला स्मृतिदिन. या स्मृतिदिनाच्या निमित्ताने भाऊंच्या लेखांचा एक संग्रह काढावा, असा प्रस्ताव मी भाऊंचे चाहते प्रकाशक - अश्वमेध प्रकाशनचे श्री. रमेश वाडेकर यांच्यासमोर मांडला. त्यांनी हा प्रस्ताव ताबडतोब उचलून धरला. मात्र या संग्राहाच्या स्वरूपाबाबत त्यांनी एक वेगळी सूचना केली. ती सूचना म्हणजे हा संग्रह फक्त भाऊंच्या लेखांचा न ठेवता, त्यात माझी आई सुधा जोशी ( ताई ) हिने लिहिलेले लेखही समाविष्ट करावे.

भाऊ जाण्याच्या आधी सुमारे महिनाभरापूर्वी ताई गेली होती. २९ सप्टेंबरला ती गेल्यानंतर भाऊंना जी पत्रे आली आणि, त्यातल्या काही पत्रांमधून ''जुन्या पिढीतलं एक आधुनिक विचारांचं सुसंस्कृत साहित्यिक दांपत्य म्हणून आम्ही तुम्हास ओळखत होतो.''असे उल्लेख होते.

ताई तशी रूढ अर्थाने साहित्यिक नव्हती, म्हणजे तिच्या नावावर पुस्तके वगैरे प्रसिद्ध झालेली नाहीत. पण साहित्याशी संबंधित विषय आणि व्यक्ती यांच्याबद्दल गप्पा, चर्चा, वादविवाद करण्यात, संधी मिळेल तेव्हा व्यासपीठावरून भाषणे देण्यात तिला मनापासून रस होता. साहित्यिक - सामाजिक विषयांवर तिने लेखही लिहिले. ते अगदी पूर्वीच्या धनुर्धारीपासून ते आताच्या 'महाराष्ट्र टाइम्स'पर्यंतच्या वृत्तपत्रांमधे प्रसिद्धही झाले. सत्यकथेतही तिचे इंदिरा संत, पद्मा गोळे यांच्या काव्यावरचे रसग्रहणात्मक समीक्षा करणारे लेख प्रसिद्ध झाले होते. मात्र ते लेखन तिने सातत्याने चालू ठेवले नाही. ताईचा मूळ पिंड मुक्त रसिकतेचा होता. पण सृजनशील लेखनही तिने फारसे केलेले नाही.

ताई आणि भाऊ 'साहित्यसहवासा' त रहायला आल्यानंतर ताईच्या लेखनाला पुन्हा काहीशी गती मिळाली, ती त्यांचे साहित्य सहवासमधले शेजारी प्रसिद्ध पत्रकार व लेखक श्री. नारायण आठवले यांच्यामुळे. श्री. आठवले यांनी 'परी' या नावाचे स्त्रियांचे साप्ताहिक काढले होते त्यात एप्रिल ७५ ते सप्टेंबर ७५ या काळात दर आठवड्याला एक याप्रमाणे २१ ललितलेख ''सुगीचे दिवस'' या नावाने ताईने लिहिले. या लेखांचे

विषय वेगवेगळे असले तरी ते प्रामुख्याने आत्मपर, आठवणीवजा आहेत आणि या आठवणींमधून तो "सुंदर चैतन्यदायी" काळ जिवंत झाला आहे. तिच्या लहानपणाच्या, शाळेच्या, कॉलेजच्या आणि नव्या वैवाहिक जीवनाच्या आठवणी त्यात आहेत. काही लेख इतर विषयांवरही आहेत. या सर्व लेखांमधून निवड करून त्या साधारण '२५ ते ५०' या कालखंडांतरचा साहित्यिक, सामाजिक, शैक्षणिक जीवनाचे काही पैलू दाखवणारा असा संग्रह "सुगीचे दिवस" या नावानेच प्रसिद्ध करावा असा विचार चालला होता. पण काही कारणांमुळे ते घडून आले नाही.

ताई गेल्यानंतर श्री. वाडेकर भाऊंना भेटायला आले होते तेव्हा तिच्या लेखांचा संग्रह आपण काढायचा असे भाऊ त्यांना आग्रहाने म्हणाले होते. पण त्यानंतर काही दिवसांतच भाऊही गेले.

हा संग्रह ताई असतानाच निघाला असता, किंवा ती गेल्यानंतर भाऊंच्या हयातीत प्रसिद्ध झाला असता, तर त्यात एक विशेष स्वारस्य होते. कारण "सुधा जोशी" हे नाव ओळखणारे, आणि त्या नावासाठी प्रसिद्ध झालेले लेखन आत्मीयतेने वाचणारे वाचक त्या दोघांच्या जवळपासच्या पिढीतले होते. ताईला लेखिका म्हणून ओळखणारी मंडळी काळाच्या ओघात हळू हळू कमी होत आहेत. खुद्द ताईही गेली. त्यामुळे "सुगीचे दिवस" - ले. सुधा जोशी या शद्बसमुच्चयास सध्याच्या नव्या वाचकांकडून ओळखीचा प्रतिसाद मिळण्याचा संभव कमीच. आज त्याला प्रतिसाद मिळाला असता सुधा जोशी - प्रसिद्ध साहित्यिक रा.भि.जोशी यांच्या पत्नी म्हणून. ही ओळखही ताईला आवडली असती. स्वतःच्या तरुण वयात जरी ताईने साहित्यिकांच्या क्षेत्रात सक्रीय भाग घेतलेला असला, तरी तिची खरी मनापासूनची इच्छा भाऊंनी भरपूर लिहावं, भरीव लिहावं, नाव मिळवावं, आणि तो आनंद आपण उपभोगांवा अशी असायची.

भाऊंच्या प्रस्तावनेसह तिच्या या आठवणीवजा लेखांचा संग्रह स्वतंत्रपणे प्रसिद्ध झाला असता, तर त्यातही एक हृद्यपणा असता. पण तेही व्हायचं नव्हतं. भाऊ तिच्या मागोमाग महिना सव्वा महिन्याच्या अंतरानं गेले. जवळ जवळ साठ वर्षांचा त्यांचा सहप्रवास साहित्यात असावा, तशा नाट्यपूर्ण रीतीने संपुष्टात आला.

ताई - भाऊंचं वैवाहिक जीवन अतिशय वेगळ्या पद्धतीचं होतं. लग्नाच्या वेळी भाऊंजवळ एक बी. ए. ची पदवी सोडली, तर दुसरं काही नव्हतं. आईवडील नव्हते, घरदार नव्हतं, आरोग्य नव्हतं, नोकरी जेमतेमच होती, लेखक म्हणून नाव होतं असंही नाही. याउलट ताईचं माहेरचं आणि आजोळचं अशी दोन्ही घराणी सामाजिक प्रतिष्ठा असलेली, संपन्न आणि सुधारक विचारांची होती. आजोळच्या भागवत घराण्याचा आगरकर, कोल्हटकर यांच्याशी नातेसंबंध होता. ताई स्वतः कर्वे विद्यापीठाची जी. ए. होती. पण अशा कुटुंबातून बाहेर पडून, काही रोमँटिक कल्पनांच्या जगात वावरणारी ताई भाऊंबरोबर आपलं आयुष्य घालवायला तयार झाली. भाऊ फारसे रोमँटिक वृत्तीचे

नव्हते. भाऊंनी पारंपरिक नवऱ्याचा अधिकार ताईवर गाजवला नाही हे खरं पण ताईनेदेखील पारंपरिक पत्नीप्रमाणे आपला सर्व भार भाऊंच्या डोक्यावर ठेवलेला नव्हता. उलट भाऊंच्या अस्थिर संसाराचा आर्थिक भार बराच काळपर्यंत ताईने उचलला होता, तोदेखील ५०/६० वर्षांपूर्वी.

ताईची आधुनिकता काही काही बाबतीत जरा जहालच होती. शिवाय तिच्यावर भावनांचा पगडा बराच असे. याचाही प्रत्यय तिच्या लेखांमधून येतो. तिचा "आमचे काही आदर्श" हा लेख, आणि भाऊंचा "आपण यांच्या समान व्हावे" हा लेख हे या तुलनेच्या दृष्टीने वाचण्यासारखे आहेत.

ताईच्या तुलनेत भाऊ स्वत:शी अतिशय पक्केपणानं बांधलेले होते. त्यांचा रोजच्या व्यवहारातला समन्वयवाद, दुसऱ्याला समजून घेणं, सामोपचाराची भूमिका स्वीकारणं, अटीतटीनं वाद न घालणं या गोष्टी दुसऱ्याचं स्वत:वर होऊ शकणारं आक्रमण थोपवण्यासाठी असतं. आपल्या आतपर्यंत त्यांनी कधी कुणाला पोचू दिलं नाही. त्यांच्या अखेरच्या आजारात काही काही प्रसंगांमधून ही गोष्ट एकदम लख्खपणानं माझ्या प्रत्ययास आली. परिस्थितीला स्वत:वर हावी होऊ द्यायचं नाही हा त्यांचा पक्का निश्चय असे. त्यासाठी परिस्थितीला टक्कर देण्याऐवजी त्यांच्या स्वभावानुसार तिला बगल देण्याचा मार्ग ते स्वीकारीत असत. आयुष्याचा सुरुवातीचा एकाकी खडतर प्रवास करीत असताना आपली स्वत:ची म्हणून एक भूमिका, एक प्रतिमा त्यांनी निश्चित केली होती.

ताईची शेवटची दोन वर्ष शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या बिकट अशा अवस्थेत गेली. भाऊंच्या एरवी आयुष्यभर तब्बेतीच्या लहान मोठ्या तक्रारी होत्या. पण ताईच्या या आजारपणाच्या दोन वर्षांत त्यांनी स्वत:ला उभं ठेवून घरातले, बाहेरचे सर्व व्यवहार उत्तम रीतीने सांभाळले, ते केवळ त्यांच्या त्या आतल्या पक्केपणामुळेच.

भाऊ गेले ते तसे अनपेक्षितपणे. त्यांचं वय ८८ वर्षांचं झालं होतं, आणि तीन महिन्यांपूर्वी त्यांच्या माकडहाडाचं फ्रॅक्चर झालं होतं, हे खरं. पण फ्रॅक्चर होण्यापूर्वी या वयातही ते उत्साही, आनंदी, कार्यतत्पर असत. फ्रॅक्चरही ऑपरेशन करून ठीक झालं होतं आणि त्यांनी उठून हिंडायला, फिरायला वैद्यकीयदृष्ट्या कसलीच हरकत नव्हती. पण मग ताई गेली. ती गेल्यावर भाऊ फार बेचैन झाले. त्यांची स्वत:वरची पकड सुटत चालली. कधी नव्हे तो त्यांचा आतल्या आत स्वत:शी झगडा सुरू झाला, आणि काही बाह्य लक्षणांमधून तो उमटून वर येऊ लागला. त्यात ताप आल्याची भर पडली. जी वस्तुस्थिती स्वत:पासून दूर ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न चालला होता, ती अखेरीस त्यांना स्वीकारावी लागली. आणि त्यांनी ती स्वीकारली. अखेरपर्यंत शुद्धीवर राहून ते अतिशय शांतपणाने गेले.

भाऊंनी आपल्या जीवनप्रवासात जी शिदोरी जमवली होती, तिच्यात दुसऱ्याला देण्यासारख्या, दुसऱ्यांनी घेण्यासारख्या बऱ्याच गोष्टी होत्या. त्या त्यांनी आपल्या लेखनातून

आणि आपल्या सहवासातून दुसऱ्यांना दिल्यादेखील. पण त्यांचं जाणंदेखील बरंच काही शिकवून गेलं.

ताई आणि भाऊ यांच्या लेखांचा हा एकत्रित संग्रह प्रकाशित होताना त्यांच्या आठवणींनी मनात गर्दी करणं स्वाभाविक आहे, आणि म्हणूनच त्यांना दूर ठेवण्याचा प्रयत्न मी केला नाही.

पण या संग्रहाच्या स्वरूपाला जरी भावनात्मक पार्श्वभूमी असली तरी त्यातल्या लेखनाचं महत्त्व मात्र वैयक्तिक भावनांशी संबंधित नाही. या शतकातल्या तिसऱ्या दशकांत सुशिक्षित महाराष्ट्रीय समाजात जे वैचारिक वारे वहात होते, ज्या साहित्यिक - सामाजिक घडामोडी चालू होत्या, त्यांची प्रत्यक्ष अनुभवलेली झलक ताईच्या लेखांमधून प्रत्ययकारी रीतीने व्यक्त झाली आहे. तसेच तिच्या इतर काही लेखांमधूनही त्या आधीच्या, विसाव्या दशकातलं सामाजिक जीवन, विशेषत: मुली आणि स्त्रिया यांचं जीवन, त्यातल्या निरनिराळ्या तपशीलांसकट समोर उभं राहिलं आहे.

भाऊंच्या आत्मपर लेखनालादेखील तत्कालीन सामाजिक पार्श्वभूमी आहे, ती ताईच्या लेखांना पूरक आहे. भाऊंचे लेख संख्येनं मुद्दाम कमी ठेवले आहेत, त्यांचं स्वरूप एकसंध न ठेवता, भाऊंच्या एकूण लेखनप्रकृतीचं प्रतिनिधित्व करील असं ठेवलं आहे. त्या उभयताचं एक एकत्रित स्मरण म्हणून आणि ज्या काळात त्यांनी आपल्या थोड्याफार जगावेगळ्या सहजीवनाला सुरुवात केली, त्या काळची आठवण उजळण्यासाठी ही संग्रहयोजना. माझ्या स्वत:च्या दृष्टीने याचा आणखी एक उद्देश असा की, या सर्व पार्श्वभूमीवर, भाऊंची सहचारिणी असण्याबरोबरच लेखिका म्हणूनही ताईचा साहित्यक्षेत्रात वावर पुस्तकरूपात नोंदला जावा.

मी लहान असतानाची मला आठवणारी ताई घरात काम करताना निरनिराळ्या कवींच्या कविता चालीवर गुणगुणत असायची. तिच्या एका आवडत्या, माधव ज्यूलियन यांच्या कवितेची पहिली ओळ या संग्रहाचं शीर्षक म्हणून दिले आहे.

"एकत्र गुंफून जीवित धागे"

ते समर्पकही आहे असं वाटतं.

हा संग्रह प्रकाशात आणण्याचे संपूर्ण श्रेय "अश्वमेध" प्रकाशनाचे श्री. रमेश वाडेकर आणि आमचे नातेवाईक व भाऊंचे चाहते प्रा. विजय आपटे यांच्याकडे आहे. त्यांनी अतिशय आपुलकीने आणि तत्परतेने या पुस्तकाचे काम हातात घेतले. मुद्रणप्रत तयार करण्यापासून ते पुस्तक तयार स्वरुपात हातात येईपर्यंतची सर्व जबाबदारी त्यांनी पार पाडली आहे. त्याबद्दल मी आणि माझे कुटुंबीय त्यांचे कायमचे ऋणी आहोत.

**नीलिमा भावे**

# अनुक्रमणिका

## सुगीचे दिवस - सुधा जोशी


१) तो काळच फार सुंदर, चैतन्यदायी होता (१२ एप्रिल १९७५) ९

२) स्त्री साहित्यातील एक वेधक वादळ (२० एप्रिल १९७५) १३

३) खास भारतीय महिला विद्यापीठाच्या आश्रयाखालील एक फिरता रंगमंच अर्थात् आमची नाटक मंडळी (२७ एप्रिल १९७५) १६

४) नवमतवाद का 'मन:पूतं समाचरेत' ? (२५ मे १९७५) २२

५) आमचे काही आदर्श (१ जून १९७५) २६

६) आमच्या जीवन प्रवाहातील किती एक लहान मोठे भोवरे (१५ जून १९७५) ३०

७) लेखक असतो तरी कसा ? (१) (६ जुलै १९७५) ३४

८) लेखक असतो तरी कसा ? (२) (१३ जुलै १९७५) ३७

९) लेखक असतो तरी कसा ? (३) (२० जुलै १९७५) ४०

१०) आमच्या जीवनातील काही सुख सोहाळे (३१ ऑगस्ट १९७५) ४५

११) पळसाळा पाने किती ? (१४ सप्टेंबर १९७५) ५०


## संबळी - रा.भि. जोशी


१२) संबळी ('छंद' १९५५) ५५

१३) आपण त्यांच्यासमान व्हावे ('अनुराधा' दिवाळी १९५७) ६०

१४) चिंचेचा खाणार... ('सत्यकथा' दिवाळी १९५९) ६५

१५) अवघे पाऊणशें वयमान ('अनुराधा' दिवाळी) ७२

१६) वावड्या ('साहित्य' दिवाळी १९८२) ७६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
विशेष
दा. क्र. ३४२६
२६८८२
९/३/९३
ग्रंथ : शाखा (स्थल प्रत)

# तो काळच फार सुंदर, चैतन्यदायी होता

जवळ जवळ - जवळ - जवळ का, नक्कीच पूर्ण ४० वर्षापूर्वीची गोष्ट. त्यावेळी मुंबईत दादरमध्ये 'सुधांशु - मंडळ' या नावाची एक वाङमय प्रेमिकांची छोटीशी संस्था स्थापन झालेली होती. वाङमय किंवा वाङमय सेवकांना साहित्य किंवा साहित्यिक हे प्रतिशब्द तेव्हा कुणाला ठाऊक नव्हते - निदान मी तरी ते सर्रास वापरताना ऐकलेले नव्हते. आम्ही म्हणजे आम्ही दोघे आणि आमची मित्रमंडळी या संस्थेचे काही सभासद नव्हतो, पण तिच्याबद्दल म्हणजे तिच्या वाङमयीन कार्यक्रमाबद्दल आम्हाला नक्कीच ओढ होती. हे लिहीत असताना आता असं आठवत की, 'समता' किंवा असंच काहीस नाव देऊन आणखीही एक छोटसं असं आमचं एक वर्तुळ होतं. हेतु हा की ८ - १५ दिवसांनी आमच्या काही मित्र - मैत्रिणींनी जमून काही थोड्या 'बौद्धिक' गप्पा माराव्यात.

तशी त्याकाळी, किंवा त्याच्या आधीच्याही वेळेपासून तरुण सुशिक्षित मंडळीत ही अशी मंडळ काढण्याची एक टूमच होती म्हणाना. 'रवि किरण - मंडळ' हे खरखुरं मंडळ. पण त्याच्या आसपास तुतारी मंडळ, भ्रमर मंडळ, हुरहुर मंडळ अशी कितीतरी मजेमजेशीर मंडळं निघाली. काही दिवस चालली, - आणि अखेर कालौघात विलीन झाली ! - त्याच्या चित्तथरारक आठवणी मात्र आजही माझ्यासारखा माझ्या पिढीच्या काही जणांच्या मनांत कधीकधी उजळून उठतात, चैतन्य निर्माण करतात आणि आजचे वे वयातीतत्व खरोखरच विसरायला लावतात !

'सुधांशु - मंडळाची' स्मृती अशीच आहे. नुकतच लग्न होऊन आम्ही पार्ल्यास बिऱ्हाड केले होते. दोघेही सुशिक्षित म्हणजे पती सुशिक्षित असायचाच, - पण मीही सुशिक्षित म्हणजे अशी तशी नव्हे, तर अट्टाहासाने वऱ्हाडातील सुखकर वातावरणात शिक्षणाची सोय नाकारून पुण्यास एरंडवण्याच्या कॉलेजात दाखल होण्याकरिता वडिलांना खर्च करायला लावणारी आणि ''कर्व्यांची मुलगी'' म्हणून गृहीतागमा पदवी मिळविणारी. 'स्त्रियांनी नोकरी करावी की करू नये' - हा त्या काळी सर्वतोमुखी चर्चिला जाणारा आणि मुलींना, विशेषत: भेडसावणारा ज्वलंत प्रश्न होता. उमरावतीहून( आताची तुमची अमरावती ) मी कर्व्यांच्या संस्थेत पाऊल टाकले ते 'गृहीतागमा' हा झेंडा मिरविण्याकरिता आणि त्याचबरोबर स्वतंत्र विचाराची पताका फडकावीत मी विवाहोत्तर नोकरी चालू ठेवली. वास्तविक नोकरीच्या दृष्टीने जी.ए. ही पदवी तशी निरुपयोगीच. पण बोलून चालून आम्ही 'कर्व्यांच्या मुली !त्यांचे चालते, बोलते विचार !' मनाला पटेल ते स्वार्थत्यागपूर्वक करण्याचा निर्धार, वयानुरूप विचार आणि जोडीदाराचा आधार. मग मागे वळून पाहणे नाहीच. 'कदम - कदम बढाये जा.' हे गीत सुभाषबाबूंनी रणांगणावर म्हटले, पण आम्हा सुशिक्षित विवाहित

महिलांचा जीवनसंग्राम त्यापूर्वीच सुरू झालेला होता.

पण काय नुसती नोकरी करून बौद्धिक भूक भागते? पतीच्या ६० रुपयात ४० रुपयांची जी भर पडून भाकरी - बरोबर भाजी मिळते, पण मग काय एवढ्याचकरिता नोकरीची धडपड? छे. वाचन केले पाहिजे. चांगली पुस्तके वाचून समविचारांच्या मंडळींशी विचारविनिमय केला पाहिजे, ठिकठिकाणी होणाऱ्या चर्चा, वादविवाद, भाषणे, व्याख्याने ऐकायला गेले पाहिजे. आणि हो! वेळ पडल्यास, नव्हे चालून आल्यास व्यासपीठावर चढून 'चार शब्द' बोललेही पाहिजेत. केवढ्या माझ्या त्या काळच्या आकांक्षा!

माझा स्वभाव लक्षात घेतला तर या आकांक्षा खरोखरच ख -पुष्पाच्या प्राप्तीसारख्या होत्या. कारण, मी स्वभावत:च अतिशय भित्रीबुजरी होते. न्यूनगंडाने पछाडलेली अजूनही आहे. त्यावेळी तर काही विचारूच नका! मी पदवीधर होऊन वऱ्हाडला गेले - त्या शाळेतील मी पहिली सुशिक्षित महिला. आमच्या बाईंनी माझ्या सन्मानार्थ बोलाविले या सर्व मुलींच्या - मुलींच्या बरं का! - मेळाव्यात माझ्या तोंडून एक अक्षरही बाहेर पडले नाही! पुढे एकदा एका खासगी सभेत सारे १० - १२ लोक असतील, मला आभार मानायला सांगितले तर चक्क, मी, 'मला आज बरे नाही' म्हणून खोटेच सांगितले व खाली मान घालून बसले! तेव्हा अशी आमची ही स्वारी, - एकदा कोहिनूर थिएटरमधील व्यासपीठावर टेबलावर डावा हात टेकून बोलायला की हो उभी राहिली!

पुण्या - मुंबईकडील मराठी विश्वात अभूतपूर्व खळबळ माजवणारा विषय फारच चांगला होता. 'कळ्यांचे नि:श्वास' हे पुस्तक. लेखिकेचे नाव, पुस्तकाचे मलपृष्ठ, आतील विविध गोष्टी, 'बाबांचा संसार माझा कसा होणार? 'अंत:करणाचे रत्नदीप', 'रिकाम्या भांड्याचे निनाद' - इत्यादी एकाहून एक सरस मनोविश्लेषणात्मक स्पष्ट, सरळ, सुंदर भाषेत लिहिलेल्या गोष्टींवर चर्चा 'सुधांशु - मंडळा'ने ठरवलेली होती. मला कोणी, कसे व केव्हा आमंत्रण केले, आणि मी ते कोणत्या बेसावध क्षणी स्वीकारले - मला आज काही म्हणजे काही आठवत नाही! आठवते ते इतकेच की, आदल्या रात्री माझ्या डोळ्याला डोळा लागला नाही आणि कार्यक्रम तर सकाळचाच होता. अध्यक्ष मला वाटते, त्या काळचे फर्डे नामांकित वक्ते प्रो. माधवराव आळतेकर होते. अवतीभोवती कमलाबाई देशपांडे, ना. म. जोशी इत्यादी थोर आदरणीय गुरूजन होते. - आणि थिएटर अगदी तुडुंब भरलेले होते. पण मी काय बोलले मला काही एक आठवत नाही, इतकेच नव्हे, तेव्हाही घरी आल्यावर मी अगदी सुन्न झाले होते. हां, एक मात्र अगदी स्पष्ट छान आठवते - ती म्हणजे माझी त्या वेळची वक्ती म्हणून पोझ (Pose) नऊवारी बैंगणी लुगडे, लांब दंडापर्यंतच्या बाह्याचे पांढरे, घट्ट गळ्याचे पोलके, - आणि बोलताना दोन्ही खांद्यावरून घट्ट पदर ओढून घेऊन उजव्या हाताच्या तर्जनीने तो पोलक्याच्या गळ्यात अगदी दाबून धरलेला हात तसाच. ती आठवण आजही तीव्रतेने यायचं कारण म्हणजे, आजच्या मुली किंवा तरुण स्त्रिया आपला पदर फक्त डाव्या खांद्यावर अगदी एका लहानशा जागी छोटा टाका मारून ठेवतात हे दृश्य नेहमी दिसते हेच होय. ४० वर्षात एवढा फरक म्हणजे काहीच नाही!

तेव्हा अशा थाटात आमचे झालेले भाषण ज्यावेळी अध्यक्षांनी वाखाणले, तेव्हा त्यावेळी तरी त्याचा खरा अर्थबोध मला झाला नाही. पण नंतर श्रोतृवर्गातून किंवा मागाहून काही दिवसांनी माझ्या कानावर असे येऊ लागले की, 'कळ्यांचे नि:श्वास' यांतील चित्रे ही प्रातिनिधिक स्वरूपाची आहेत, अशाप्रकारचे सुधा जोशी यांनी जे विवेचन केले ते सर्वथैव विचारणीय आहे.'' असो. ते काही असेल. तो काळच फार सुंदर, चैतन्यदायी होता. नवीन बघण्याचा, नवीन शिकण्याचा, नवीन जीवन जगण्याचा होता.

त्या दिवशी मी काही विशेष वक्तव्य केले असेल किंवा नसेल. पण एक गोष्ट निश्चित की, माझ्या 'सुधा' या नावावरून ''सुधांशु मंडळ'' हे नाव ठेवण्यात आले. त्याचा माझ्याशी साक्षात संबंध आहे. असे लोक बोलू लागले होते. त्यात टिंगलीचा भाग नसेलच असे नाही. त्यातील तथ्य मी जाणत नाही. पण माझे ''सुधा जोशी'' हे नाव त्यावेळी एकमेवाद्वितीय होते, हे नि:संशय! काही चांगले एम. ए. पीएच. डी. म्हणायचे, 'अरे हापूसचा आंबा तसं हे 'सुधा जोशी' नाव वाटत!' आता 'सुधा जोशी' खूप झालेल्या आहेत.

परंतु काही म्हणजे, अनेक वर्षांपूवी मी थोडंबहुत लेखन केलेलं आहे. मी आपणहून दिले आणि केवळ स्त्री दाक्षिण्य म्हणून संपादकांकडून ते स्वीकारले गेले, असे कधीही झालेले नाही. अगदी मागून आणि मानाने 'ते' प्रसिद्ध केले गेलेले आहे. ती सगळी वृत्तपत्रे, साप्ताहिके आणि मासिके खरोखरच विद्वन्मान्य होती. त्यांतील काहींवर आता काळाचा पडदा पडलेला आहे. आणि माझ्याही जीवननाट्यातील तो स्फूर्तिप्रद भाग खुद्द माझ्याच स्मृतीतून नामशेष झालेला आहे, हा भाग वेगळा. लेखनाप्रमाणेच किंबहुना म्हणूनच किंवा त्याचबरोबर, वक्तृत्वाचा विलास दाखविण्याची संधीही माझ्याकडे अनेकवार चालून आलेली होती. मी काही सुशिक्षित स्त्रियांच्या पहिल्यावहिल्या पिढीतील खासच नव्हते. तरीही मॅट्रिक झालेली मुलगी म्हणजे सुशिक्षित, विद्वान असाच समाज तेव्हाही रूढ होता. आणि मी तर पदवीधर! जी.ए. असले म्हणून काय झाले? त्यातून माझ्या भोवतालचे वातावरण विशेष उल्लेखनीय होते. आमचे मित्रमंडळ मोठे हौशी, चळवळे, व्यासंगी, कलावंत, आणि कल्पक असे होते. इतर जणांच्या दृष्टीने त्यांच्या मेळाव्यात मी वेळी अवेळी वावरत असे. खरं सांगायचं म्हणजे थोड्या संकोचानेच, कारण माझं बालपण व मॅट्रिकपर्यंतच शिक्षण हे एकत्र कुटुंबात आणि शुद्ध बालबोध वळणात पार पडलेलं होतं. तरीही काही काही गटागटातून माझी चेष्टा, नालस्ती चालेच. हा उघड उघड त्या काळाचा महिमा होता. पण माझ्या दृष्टीने माझे जीवन सरळ नाकासमोर पाहून चालत असे.

ही एवढी पार्श्वभूमी सांगण्याचे एक विशेष कारण आहे. ते नुकतेच काही वर्षांपूर्वी घडले. माझे भले - बुरे लेखन आणि वक्तृत्व याचा पगडा म्हणा, परिणाम म्हणा किंवा

प्रतिध्वनी म्हणा, अजून तत्कालीन काही विद्वज्जनांच्या मज्जाकेंद्रावर अगदी खोलवर भिनलेला आहे. तो कसा त्याची आजच्या भाषेत एक 'झलक' सांगण्यासारखी आहे.

'सुधा जोशी' या नावाने अलिकडे काही टीकात्मक लेखन प्रसिद्ध झाले. आकाशवाणीवर कित्येक वेळा काही भाषणे व चर्चा याही वेळी 'सुधा जोशी' या नावाचा पुकारा केला गेला.

झाले !मघाशी उल्लेखलेल्यापैकी काही विद्वानांची आणि रसिकांची मला छान छान, गुणगौरवपर पत्रे आली. ( खरे सांगते, माझे मन आतल्या आत आक्रंदले ! ) - पण त्या माझ्या चाहत्यांना मी अत्यंत नम्रतापूर्वक कळविले की, 'सन्मित्रांनो ! 'ती' मी नव्हे ! !'

◆

# स्त्री साहित्यातील एक वेधक वादळ

वादळापूर्वीची शांतता ही आपण अनेक वेळा, अनेक प्रसंगी अनुभवलेली असते. भौगोलिक दृष्ट्या उद्भवणारे वादळ नेहमीच आपल्याला पूर्वसूचना देतेच असे नाही. वादळच ते बोलून चालून. कुठूनतरी येणार आणि कोठे तरी जाणार! अगदी आजच्या वैज्ञानिक प्रगतीच्या काळीसुद्धा हवामान खात्याचे अदमास हमखास चुकतात आणि आपण आपले जीवन शांत वातावरणात व्यतीत करीत वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या तद्विषयक भविष्याची टर उडवीत असतो! त्या दृष्टीने वैचारिक किंवा साहित्यिक क्षेत्रातील वादळ हे तर किती तरल, अनाकलनीय आणि तितकेच आकस्मिक! कारण त्याचे अधिष्ठान आणि उगम म्हणजे अतींद्रिय असे आपले मानवी गहन गूढ असे मन! 'शांत सागरी कशास उठवलीस वादळे। गायिले तुवां कशास गीत मन्मनांतले।।' असे एक कवयित्री अत्यंत आर्त सुरांत गाताना आपल्यापैकी काहींनी रुद्ध अंत:करणाने ऐकले असेल. एखादा नाजुक सुंदर तन्मय स्वर मनात विलक्षण वादळ निर्माण करू शकतो - तर कधीकधी काही काही मनांच्या सभोवती रुढी आणि परिस्थिती यांची इतकी काही कठोर काटेरी जबरदस्त दुर्लंघ्य कुंपणे घातलेली किंवा स्वत:च निर्माण केलेली असतात की, बाहेरून कितीही गदागदा हलवले, तरी या सर्वांच्या तुरुंगवासात कोठल्या कोठे लुप्तप्राय झालेल्या त्या मानवी जिवंत मनाला एवढा धक्का पोचत नाही, जाणीव होत नाही की, बाहेर आपल्याला आवाहन करणारे, जागवणारे, जोजवणारे, जवळ करणारे काही विशेष मानवी जीवन आहे!

इ. स. १९३२-३३ च्या सुमारास आपल्या महाराष्ट्रात सुशिक्षित प्रौढ कुमारिकांची प्राय: परिस्थिती आणि मन:स्थिती अशीच झालेली होती. त्यांची मने आतल्या आत खदखदत होती. आक्रंदत होती! पण आपले मन, विचार, विकार त्या व्यक्त कशा करणार? अगोदर रुढी आणि परंपरा यांच्या चिकटपट्ट्या त्यांच्या मुखावर समाजाने लावलेल्या होत्या. त्यातून कित्येक सामाजिक संकेत स्त्री सुलभ ( खरी - खोटी ) लज्जा, विनम्रता व जननिंदेची भीती!

या विशिष्ट काळापूर्वी आणि नंतरही अनेक लेखकांनी स्त्री जीवनाची सुखदु:खमय चित्रे अत्यंत परिणामकारक रीतीने वाङमयात रंगविली; इतकी की, प्रत्यक्ष स्त्रीसुद्धा इतके प्रत्ययकारी लिहू शकली नसती. अर्थात त्याला कारणे आहेत ती सबळ आणि सर्वस्वी वेगळी तशीच खरोखरच विचारणीय आहेत. पण तो सध्याचा विषय नव्हे. साळू - मैनाच्या कथा लिहिणारे म्हणून हरिभाऊ आपटे यांचा तत्कालीन विद्वानांनी कितीही

अधिक्षेप केला तरी स्त्रियांच्या दु:खाने खरेखरे व्यथित होणारे आणि त्यांच्यामागे प्रत्यक्ष भावासारखे उभे राहणारे हरिभाऊ आम्ही स्त्रिया कधीही विसरू शकणार नाही. त्यांच्याबद्दलची कृतज्ञतेची भावना आमच्या मनात सदैव नंदादीपाप्रमाणे तेवतच राहील. वा. म. जोशी यांनीही काव्य - शास्त्र - विनोदात रमणारी नवी स्त्री आमच्यासमोर आदर्श म्हणून उभी केली. सर्वस्वी रोमँटिक जगात जगणारी प्रेमी, प्रेमाविरुद्ध आणि प्रेममीलनात विलीन झालेली स्त्री, हेही स्त्रीचे एक कोमल भावविश्व ना. सी. फडके यांनी आम्हाला दाखवले आणि आमची मने पर्युत्सुक आणि पुलकित केली. खांडेकरांनी स्वदेश, त्याग, सेवा आणि ध्येयासक्ती यांची जाणीव स्त्रीवर्गास करून दिली तर माडखोलकरांनी 'नवे संसार' कसे असतील या दृष्टीने आमची मने जागृत केली. कमलाबाई बंबेवाले, कमलाबाई टिळक या तर बोलून चालून स्त्रियाच, - स्त्रियांच्या प्रतिनिधी. अशा कितीतरी, समाजाकडे डोळसपणे पाहाणाऱ्या स्त्रियांनी आपापल्या परीने स्त्री जीवनाचे अनेक पैलू रंगवले. नव-नवीन प्रकाशात आणले.

अनेक लेखक-लेखिकांचे ऋण घेऊन आम्ही आमचे बौद्धिक जीवन जगत होतो. यामध्ये मासिक मनोरंजनाचे रंगविलेल्या स्त्रीजीवनाचाही मोठा वाटा होता. ते पाथेय आमच्याबरोबर होते; म्हणूनच आम्ही त्या वादळापूर्वीच्या शांततेत अभावितपणे प्रसन्न मनाने वावरत होतो.

पण काळ झपाट्याने बदलत होता. जागतिक मंदी भेडसावीत होती. नोकरी - धंदा मिळविण्यास पुरुष वर्गास विशेष प्रयास पडत होते. परिणामी पुरुषांचे विवाहाचे वय वाढू लागले तसे समाजात प्रौढ कुमारिकाची संख्याही एक 'सामाजिक प्रश्न' बनू लागली !

नकळत एक वैचारिक प्रक्रिया सुरू झाली. साहजिकच समाजाभिमुख सुधारकांच्या मनांत समाजातील हा नवीन बदल हळूहळू प्रवेश करू लागला. ज्योतिबा फुले, आगरकर, महर्षी कर्वे इत्यादी स्त्रीशिक्षण आणि स्त्री - समाजोन्नती यांना सर्व जीवन अर्पण केलेल्या व्यक्तींच्या प्रत्ययास काय आले कुणास ठाऊक ! त्याचे कार्य अविरत, अविश्रांत चालू होते. स्त्रियांना शिक्षण देणे, त्यांना स्वावलंबी बनवणे, पुनर्विवाहास उत्तेजन देणे, धीट बनवणे. एकूण जीवन संग्रामास तोंड देण्यास सज्ज करणे, असेच या थोर स्त्रीहितचिंतकांचे ध्येय होते. आणि समाजात घडणाऱ्या कित्येक धोरणांवरून आपले ईप्सित साध्य होत आहे हे पाहून त्यांचे दिवंगत आणि वर्तमान आत्मे संतुष्ट होत होते. आणि त्यात आश्चर्य ते कोणते ?

आश्चर्य कोणते ? आश्चर्य ते हेच की, स्त्री-शिक्षणाच्या या लाटेबरोबर स्त्री जीवनाच्या किनाऱ्यावर अधूनमधून किंवा इतःस्ततः पडलेले पसरलेले प्रौढ कुमारिकांचे बंद किंवा उघडे शिंपले हे चटकन् या सज्जन समाजसुधारकांच्या लक्षात आले नाहीत, हेच होय ! अर्थात् त्यात त्यांचा काहीच दोष नव्हता. किंवा प्राप्त परिस्थितीत यासंबंधी हे सुधारक काही इलाजही करू, सुचवू शकत नव्हते. त्याबद्दल त्यांना कोणीच जबाबदार धरले

नाही.

नवीन कल्पना, विचार किंवा वैज्ञानिक सुधारणा यामध्ये असाच काही अंतर्विरोध असतो की, तो चांगल्याबरोबर वाईटालाही स्वीकारायला लावतो !

साधी गोष्ट : प्रकाश हवा ना, मग अंधार सहन केलाच पाहिजे. त्याबद्दल विचारी माणसे तक्रार करताना आढळत नाहीत.

तथापि ज्यांना केवळ अंधारातच जीवन कंठावे लागते, त्यांची दु:खे ही खरी नव्हेत काय ? ती कोण व कशी दूर करणार ?

सुशिक्षित प्रौढ कुमारिकांचा प्रश्न आजही सर्वत्र सुटलेला नाही. मानवी जीवनातील अनेक समस्या आजही पूर्वीइतक्याच निश्चल उभ्या आहेत. एवढे तत्त्वज्ञान कशाला ? खुद्द स्त्रीजीवनातील अनेक प्रश्न आजही अनुत्तरित आहेत. कारण विवाहिता, अनेक नात्यांनी गुरफटलेली गृहिणी, माता - या तर एकाहून एक वरचढ पायऱ्या तिला आनंदाने ओलांडाव्या लागतातच, पण प्रत्यक्ष मातेपुढे तिच्या बाळाच्या बाबतीत अखेरपर्यंत तिची ती जबाबदारी व ते प्रश्न सुटत नाहीतच, - उलट उत्तरोत्तर कधीकधी ते अधिकाधिक जटिल होत जातात !

मग प्रौढ कुमारिकांचा तर पहिलाच प्रश्न केवढा जीवघेणा ! काही घरांतून सर्वात मोठी मुलगी म्हणून पुढील भावंडाची सर्व जबाबदारी अंगावर घेणारी, मिळवती प्रौढा तर काहींचे काही कारणाने लग्न जमत नाही म्हणून ती अविवाहित, पण अर्थात मिळवती प्रौढा, काहीजणी विशिष्ट ध्येयाच्या मागे लागून अखेर मस्तकावर रूपेरी तारा चमकू लागल्यामुळे तशाच पिचत राहिलेल्या, तर काही कुरूपतेचा शाप मिळालेल्या, काही या तर काही त्या कारणाने प्रौढपणी सक्तीचे कुवारपण जपणाऱ्या ! अशा परिस्थितीत काही जणींच्या वाट्याला कोणते दैव किंवा दुर्दैव येते, हे काय सांगायलाच पाहिजे ? काही मुख्याध्यापिका हाताखालच्या गायनाच्या किंवा चित्रकलेच्या शिक्षकाशी वैवाहिक तडजोड स्वीकारतात, तर काही हाताखालच्या कारकुनाशी विवाहबद्ध होऊन स्वत:च्या संसारात त्याच्या आधिपत्याचा स्वीकार करतात !

कुरूप स्त्रीलाही सोळाव्या वर्षी निसर्गाने बहाल केलेले मोहकत्व ३५ - ४० वर्षानंतर पार ओसरून जाते. त्यावेळी तिच्यावरची भावंडाची आर्थिक जबाबदारी संपुष्टात आलेली असूनही तिला योग्य जोडीदार मिळत नाही. तिला 'ताई', 'आत्या' किंवा 'मावशी' हीच भूमिका वठवावी लागते आणि ती तशीच वठून, वाकून, सुकून जाते ! कित्येक प्रसंगी आई-वडील जाणूनबुजून, स्वार्थैक्य बुद्धीने आपल्या पोटच्या पोरीचा असा अंत घडवून आणतात ! आणि काही प्रेमाच्या गोड भूलथापांना भुलून जीवनातून कायमच्या उठतात ! त्यांच्या पैशावरच एक डोळा ठेवून दुसरा डोळा दुसऱ्या तरुण सुंदर मुलींकडे लावलेल्या तरुण पुरुषाचे लाघव बिचाऱ्या जाणत नाहीत ! कुरूप चेहऱ्याखालचे अंत:करण कुरूपच असते काय ?

◆

# खास भारतीय महिला विद्यापीठाच्या आश्रयाखालील एक फिरता रंगमंच अर्थात् आमची नाटक मंडळी

आपण या वैशिष्ट्यपूर्ण नाटक मंडळींचे नाव कधी तरी ऐकले होते काय ? मुलींचे मेळे निघाले, मुलांचेही निघाले. चांगलेच गाजले ! शांता आपटे किंवा आजचे सुधीर फडके हे अशाच नामांकित मेळ्यातले लोकप्रिय सुरेल गायिका-गायक ! दामूअण्णा जोशींनी बाल मोहनांची कंपनी काढून खूप लौकिक संपादन केला. संगीतरत्न हिराबाईंची स्त्री प्रमुख नाटक मंडळीही आपण अजून विसरलेलो नाही - आणखी अशाच कितीतरी ! मला तरी सगळ्या कुठे आठवत आहेत म्हणा ! पण भारतीय महिला विद्यापीठाच्या पदवीधर सुकन्यांनी, गृहीतागमा अशी 'गृह'प्राधान्य वृत्ती स्वीकारून स्टेजवर नाटके किंवा नाट्यप्रवेश करून दाखवण्याइतके धैर्य दाखवले, पुढाकार घेतला आणि काही काळ वृत्तपत्रे किंवा तत्कालीन, त्यांना ओळखणारा समाज अक्षरश: हलवून हरखून टाकला. ही घटना ऐतिहासिक आहे, - म्हणूनच अक्षरश: सत्य आहे.

त्याच असं झालं. श्री. धोंडो केशव कर्वे यांचं आत्मवृत्त आम्हाला अमरावतीस असताना मॅट्रिकच्या अभ्यासक्रमात सूक्ष्म ( intensive study ) वाचनाकरिता नेमलेले होते. तेव्हा मी तरी त्यांना 'गुरुवर्य' वगैरे म्हणत नसे. 'महर्षी' तर ते नंतर खूपच वर्षांनी झाले. तथापि त्यांचे आत्मवृत्त आणि ते तन्मयतेने शिकविणाऱ्या त्यांच्या एक सुकन्या ( कु. कृष्णाबाई खरे ) या समसमासंयोगामुळे माझे त्यावेळचे सगळे बौद्धिक आणि मानसिक विश्व कर्व्यांनी स्त्रियांकरिताच केवळ स्थापन केलेल्या महिला विद्यापीठाकडे आकर्षित झाले. स्वार्थत्याग, सेवा, आत्मविश्वास, सद्विचार, नवनवीन प्रयोग, आश्रमीय जीवनातील पावित्र्य, प्रचलित सामाजिक मोह सन्मानांकडे सरळ पाठ फिरवून स्त्री शिक्षणास तन, मन आणि धन या सर्वांसह अत्यंत निरपेक्ष भावनेने वाहून घेतलेली आणि भारून व भारावून गेलेली थोरथोर विचारवंत मंडळी, या सर्वांनी अत्यंत पावन झालेली ती हिंगणे आणि एरंडवणे येथील तपोभूमी प्रत्यक्ष पाहावी, तिथे राहावे, त्या वातावरणातील विशुद्ध हवा भरभरून देहात साठवावी आणि निरामय वैचारिक जीवन हृदयसंपुटात सदैव धारण करावे - या दुर्दम्य इच्छेने मी एरंडवण्याच्या वसतिगृहात दाखल झाले होते. गुरुवर्य अण्णा कर्वे, परमपूज्य वा. म. जोशी, कविवर्य मायदेव, साहित्याचार्य हरिभाऊ दिवेकर, सुलक्षणी कोमल हृदयी कमळाबाई देशपांडे, त्यावेळच्या श्री. दि. धो. कर्व्यांची 'इरू' पण नंतरच्या

थोर विदुषी इरावती कर्वे - किती किती म्हणून नावे घ्यावी ! या प्रात:स्मरणीय व्यक्ती माझ्या नित्य दृष्टीस पडत, त्यांच्या बोलांचे अमृत - तुषार देह आणि मन पुलकित करीत आणि रूक्ष वऱ्हाड सोडून आपण खरोखरी या रमणीय नंदनवनात आलो या उदात्त भावनेने अंथरुणारवर पडल्यावर रात्री छान झोप लागे ती पुन्हा सुभग दर्शने सकाळी पुनरपि घडतील याच आशेने. मी 'नंदनवनात' म्हटले ते उगीचच नव्हे, आमच्या वऱ्हाडच्या मानाने पुण्याची विशेषत: एरंडवण्याची आणि हिंगणे व त्या वाटेवरची वनश्री खरोखरच अप्रतिम होती. माझ्यातरी मनाला किंवा दृष्टीला ती सतत सुखावीत असे !

वर वर्णिलेला गुणांचा किंवा वातावरणाचा भाग आत्मसात करण्यात - छे ! 'आत्मसात' हा शब्द चुकलाच, माझ्यावर त्या सर्वांचा किती व कसा परिणाम जाला; हे मला काहीच सांगता येणार नाही. किंबहुना माझ्या स्वयंभू अपरिपक्व बुद्धीमुळे मला त्या विशिष्ट गोष्टींचा थोडा स्पर्शही झाला नसावा हेच शक्य आहे. सांगते ना, मला माझ्या आतापर्यंतच्या आयुष्यात अनेक सुवर्णसंधी प्राप्त झाल्या, स्फूर्तिदायक व्यक्तींचा जवळून सहवास घडला, कधीही काही चांगले मागावे - मागून घ्यावे लागले नाही, - आपल्या पायाने माझ्याकडे बरेच काही श्रेयस्कर चालत आले, - पण कांच आणि चिंतामणी यांतील फरक ओळखणारे मन निसर्गाने मला दिलेले नाही, - थोडे पंख दिले पण त्यात भरारी मारण्याचे सामर्थ्य दिले नाही, - असेच मला नेहमी वाटत आले आहे. असो !असते 'एखाद्याचे नशीब' -

पण एक मात्र गोष्ट खरी की, या स्वार्थत्यागपूर्वक चालवलेल्या, केवळ स्त्री शिक्षण व स्त्रियोन्नती यांना वाहलेल्या या संस्थेस आपण काहीतरी आर्थिक मदतही करायचीच ! मनाशी अगदी ठाम निश्चय केला. अर्थात त्याकरता स्वत: नोकरी करून स्वकष्टाने मिळालेले चार पैसे तेच गुरुवर्य आण्णांच्या चरणी अर्पण करायचे ! गुरुदक्षिणा वगैरे भ्रामक कल्पना नक्कीच नव्हत्या. नोकरी करावयाची ती शिक्षिकेचीच. म्हणजे त्या काळी तीच सुकर व सुलभ होती. शिवाय माझ्या कानावर असे आलेले होते की, गुरुवर्य अण्णा कर्वे 'आपल्या मुलीं'ना पुण्याबाहेर, वऱ्हाडातसुद्धा शैक्षणिक पात्रता मोहिमेवर पाठवीत. बी. ए. पेक्षा आमच्याही जी. ए. काही कमी नाहीत. त्यांना कमी लेखू नका. ते चालणार नाही. इतकेच नव्हे तर माझ्या मुली या बी. ए. पेक्षाही श्रेष्ठ ठरतील. पाहा, अनुभव घ्या. इतरत्र कुणाला काय अनुभव आला, या अहंकारातून किंवा आव्हानातून काय काय गदरोळ उठला, त्याच्याशी आज आपल्याला काहीच कर्तव्य नाही. पण वैयक्तिक दृष्टीने माझाच अनुभव सांगायचा झाला तर मी नि:संदिग्धपणे आत्मविश्वासाने आणि निरहंकारवृत्तीने म्हणेन की, जी. ए. ( गृहीतागमा ) किंवा पी. ए. ( प्रदेयगमा ) या मला बी. ए. किंवा एम. ए. यांच्यापेक्षा त्यांच्या ज्ञानाच्या आणि कर्तृत्वाच्या क्षेत्रात यत्किंचितही उण्या आढळल्या नाहीत !

तात्पर्य, मी मिळेल त्या शाळेत, प्रथम सरकारी हायस्कूलात पदवीधर होताच कामास

लागले. मुलींनी आणि स्त्रियांनी नोकरी करावयाची नाही, त्यांनी नोकरी करणे सर्वस्वी आत्मघातकी व पर्यायाने समाजघातकी आहे, असे घरची मंडळी म्हणे, यात काहीच नवल नव्हते. ते १९३२ हे साल होते. पण आमच्या हेडमिस्ट्रेस व इतर शिक्षिका ( विवाहित - अविवाहित ) सारखे हेच मनावर बिंबवीत असतानाही मी वर्गात शिक्षिका म्हणून मुलींसमोर उभी राहिले. १ तारखेस दुसऱ्या महिन्याची एक तारीख कधी उजाडते याची मनोमन वाट पाहात! म्हणजे शिकवण्याकडे माझे लक्ष नव्हते, असे कसे शक्य आहे ? मी आता 'साठ्यां' ची नसून 'कर्व्यांची मुलगी' होते आणि माझे 'गृहीत आगमतत्त्व मला प्रभावीपणे शाळेतील सर्वांसमोर यशस्वी करून दाखवायचे होते.

झाले. नोकरीचा पहिला महिना संपून पुढील महिन्याची १ तारीख उजाडली आणि त्या दिवसाच्या त्या धन्य सूर्य प्रकाशात माझ्या हातात माझा पहिला पगार रुपये ५०/- पडलेला मी पाहिला. ताबडतोब माझ्या प्रतिज्ञेची आठवण झाली आणि माझी ती अल्पशी देणगी, माझा पहिला पगार, पहिल्या फुला - मुलापेक्षाही प्यार वाटणारा - मी गुरुवर्य अण्णांच्या नावे पुण्यास रवाना केला!

तेव्हापासून सतत रुखरुख, एकच ध्यास, काही नाही तरी थोडेसे पैसे संस्थेला मिळवून द्यायचे. विवाहानंतर मी मुंबईस आले आणि मला वाटते, १९३४ साल उजाडले. एका सुप्रभाती एक मैत्रीण एक सुंदर कल्पना घेऊन दारात उभी राहिली. तिचा चेहरा विशेषच उजळला होता. तशा आम्ही कर्व्यांच्या मुली एकूण दिसायला सामान्यच. सर्व सुंदर, श्रीमंत नाजुक - साजुक मुलींचा ओढा किंवा भरणा फर्ग्युसन किंवा तत्सम B.A. डिग्री देण्याच्या कॉलेजाकडे, असे त्यावेळी म्हणत, पण कर्तव्य भावना, धडाडी, नवीन चमकदार कल्पना आणि पृथगात्मता या गुणांनी प्रेरित झालेली( अर्थात हे विधान सरसकट घ्यायचे नाही. ) कर्व्यांची मुलगी त्या त्या क्षणी भारी आकर्षक दिसे! मी म्हटले, "काय ग, काही वेगळा विचार घेऊन आलेली दिसतेस! बस ना." "छे: छे. आता बसायला वेळ नाही. आता तूसुद्धा उठ. आपल्याला कामाला लागलं पाहिजे."

तिने मला हात धरून बाहेरच काढले. लग्न झालेले असले तरी आम्ही दोघेच होतो. आणि एका प्रसिद्ध लेखकाने लिहिलेल्या कादंबरीप्रमाणे आमचा 'नवा संसार' होता. मी परवानगी गृहीत धरून निघाले. आमची ही दोघांची गंगोत्री वाहात वाहात वाटेत आम्हाला चांगल्या ८ । १० कन्यावाहिनी मिळाल्या. बेत ठरला की, महिला विद्यापीठाला काही भरीव मदत करायची असेल तर उपाय एकच, स्टेजवर नाचणे! प्रेक्षागृह, रंगमंच वगैरे शब्द आजचे. तेव्हा म्हणजे थिएटर आणि स्टेजवर 'नाचणे' म्हणजे काहीतरी नाटक किंवा नाटकातील प्रवेश करून दाखवणे! कल्पना सर्वांना एकदम पसंत! ते वयच तसे होते. शिवाय माझ्याखेरीज सर्वच जणी अविवाहित म्हणजे एका अर्थी बंधनविरहित अर्थात त्या वेळच्या 'नवऱ्या' पेक्षा घरच्या माहेरच्या वडीलधाऱ्या मंडळीचाच कोण धाक असे पण त्या वेळी तरी आमच्या त्या धीट, धडाडीच्या मुलींनी कुणाला

जुमानले नाही. ( असे आता वाटते. ) एक - दोघी कर्व्यांच्या मुंबईच्या कन्याशाळेतील विद्यार्थिनीच होत्या. हो ! आणखी एक पेटीमास्तरसुद्धा.

आमच्या कंपनीचे नाव ठरले - काय ठरले कुणास ठाऊक ! पण त्या कार्यक्रमाची जाहिरात मात्र मोठ्या ठसक्यात होत असे. आणि ती कोण करीत असेल म्हणाल. तर कु. बाळूताई खरे ! त्या नुकत्याच P.A.उत्तीर्ण होउन आपली बुद्धी, कर्तृत्व व वक्तृत्व याच्या जोरावर दादर येथील एका शाळेच्या मुख्याध्यापिका नेमल्या गेल्या होत्या. पण त्यांना शैक्षणिक म्हणजे S.T.C., B.T.वगैरे असा काही डिप्लोमा किंवा पदवी नव्हती. ती कधीच मिळणे शक्य नव्हते. कारण, शिक्षणक्षेत्रांत, सरकारमान्य शिक्षणक्षेत्रात कर्व्यांच्या मुलींना ही दारे तेव्हा आणि ( पुढेही अनेक वर्षे ) बंद होती ! तथापि त्यांनी आपल्या वैयक्तिक गुणांच्या सामर्थ्याने एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये चालणाऱ्या या विषयांच्या पदवी परीक्षेच्या वर्गांना बसण्याची परवानगी सहज मिळवली होती.

आधी बाळूताई ! आणि त्यांत त्या वेळच्या तरुण, तल्लख, चपळ, बुद्धिमान, वक्तृत्वसंपन्न, अभिनयपटू आणि एकंदरीत नवनवीन कल्पनांनी झपाटलेल्या बाळूताई खरे ! त्या आमच्या अध्वर्यू ! कंपनीच्या प्रमुख चालक, कर्तुमकर्तुम अधिदेवता ! 'भारतीय महिला विद्यापीठाच्या माजी पदवीधर कन्यका नाट्यप्रवेश सादर करीत आहेत - ' अशा अर्थाचे काहीतरी बोधवाक्य धारण करणारे निशाण हातात घेऊन त्या आमच्या सर्वांच्या पुढे निघाल्या. अर्थात यातील बरेचसे अलंकारिक म्हणजे नवीन गावात गेले की, अशा अर्थाची घोषणा त्या देत. मला वाटते, त्या काळी कदाचित् दवंडीही पिटली गेली असावी !

गावोगाव हिंडून नाट्यप्रवेश करायचे तर ठरले. पण कोणत्या नाटकातले प्रवेश निवडायचे ? बाळूताई आणि एक दोघींचा पुढाकार आम्ही तिघी-चौघी मागे मागे होस हो करणाऱ्या. They also ranपैकीच ! अहो ! अशा गर्दीचीही आवश्यकता असतेच. त्या काळी वर्तकांचे 'आंधळ्यांची शाळा', 'तक्षशीला' ही नाटके गाजलेली. आणि गडकऱ्यांची मोहिनी तर काळावर मात करणारी, अवीट आणि अजोड झाले. - सर्वानुमते ठरले की, 'मनोहर, सुशीला, बिंबा' हा प्रवेश, 'तक्षशिले'तला एक प्रवेश, प्रेम - संन्यासातील गोकुळ - मथुरेचा तो हमखास हसवणारा प्रवेश आणि असेच एक दोन प्रवेश नक्की केले. खरे पाहता संपूर्ण नाटक करण्याची आमची महत्त्वाकांक्षा होती ! पण एवढे पाठांतर व प्रॅक्टिस कोण, केव्हा आणि कुठे करणार ? तरी आम्ही दोन दिवस - रात्री मुंबईच्या कन्याशाळेत मुक्काम ठोकला. गळे मोकळे केले. मोठ्याने, स्पष्ट बोलण्याची तालीम केली. आमच्यापैकी दोघींचे गळे, म्हणजे आवाज बरा. पैकी एक अस्मादिक. मला वाटले, आपण बिंबाचे काम करावे, या उद्देशाने मी 'एकलेपणाची आग' ही कविता म्हणण्याचे धाडस चालवले होते. ते जमेना तेव्हा, मध्यंतरात एखादी कविता गाऊन दाखवावी म्हणून "सोड सोड आता आपुल्या गोड मोहिनीला" हे गिरीशांचे

गीत हळुवारपणे आळवू लागले. इतक्यात कोणीतरी, - म्हणजे आमच्याच हितचिंतकांपैकी म्हणाले की, 'तूच आता हा नाद सोड.' अर्थात हिरमुसली झाले पण ते तेवढेच. मग मीच म्हटले, 'मी सुशीलेची भूमिका करीन' ही माझी सूचना एकदम विधायक ठरली, कारण निसर्गाने बहाल केलेले माझ्या चेहऱ्यावरचे गांभीर्य! काहीच हालचाल करायला नको की, बोलायला तोंडही उघडायला नको! आपले ठोकळ्यासारखे उभे राहायचे! बरोबरच आहे, म्हणूनच मनोहरला पत्नीबद्दल विशेष प्रेम होते! असो. ती भूमिका निसर्गत: बरी वठली. मात्र बाळूताईंनी मनोहरच्या भूमिकेत खरोखर कमाल केली! साध्या नऊवारी लुगड्यावर त्यांनी open collar चा एक shirtकोट चढवला होता आणि आपले लहान कुरळे केस मागे घेऊन घट्ट कोटात खोचले होते. बस्स! हाच मनोहरचा make upपण काम , अभिनय, काय अप्रतिम! आवाज, उच्चार किती विलक्षण धारदार, परिणामकारक आणि रूप सौंदर्यही वेड लावणारं! पद्मा असयेकर हिने 'बिंबा' सुंदर वठवली आणि मनोहरच्या नेत्रांतून घळघळा अश्रू वाहू लागले! टाळ्यांचा कडकडाट झाला आणि पडदा पडला!

गोकुळ - मथुरेचा प्रवेशही प्रेक्षकांना फार आवडला. तसेच इतरही नाट्यप्रवेश टाळ्यांच्या गजरात पार पडले. गावातल्या लोकांनी अपरिमित कौतुक केले. प्रत्येक ठिकाणी ही गर्दी लोटायची! पण ती कशाकरिता म्हणता? तर या कर्व्यांच्या माजी विद्यार्थिनी "आननी दिसतात तरी कशा?" हे पाहण्याकरिता. पण एवढे खरे की, आम्ही कितीही साध्या वेशात वावरलो; सामान्य दिसलो, चाचरत बोललो, तरी आमचा अधिक्षेप कोणी केल्याचे मला आठवत नाही. सर्वांनी कौतुकच केले. अगदी तोंड भरून कौतुक केले. आणि योग्य ती प्रसिद्धी पण दिली.

पण आमची ही मुळामुठेकाठची तट्टे अशी मोहिमेवर गेली होती तरी कोणकोणत्या गावी? - अहो! सरड्याची धाव कुंपणापर्यंत. मुंबईबाहेर आणि मुंबईजवळच आमचं रणमैदान. अलिबागेतील देऊळ, ठाणे, कल्याण, डोंबिवली इत्यादी छोटेखानी गावातील सभागृहे किंवा क्वचित् थिएटर. याचे कारण अगदी साधे आणि एक बाळूताईची ठिकठिकाणची ओळखीची मंडळी आणि त्यांच्या काही विद्यार्थिनी यांच्या मदतीच्या भरवशावर आम्ही ही गावे मुक्रर केली. अर्थात ठाणे, कल्याण येथील काही प्रतिष्ठित डॉक्टर लोकांनी खूपच प्रेमाने स्वागत केले, पाठिंबा दिला आणि प्रसिद्धीसकट सर्वतोपरी साहाय्य केले. अलिबाग ते डोंबिवली झेंडे फडकावण्यात लोकांचा वाटा फारच मोठा आहे.

हो, आणखी एक ऋण मान्य केलेच पाहिजे. कारण, इतकी यातायात करून सामान डोक्यावरून वाहून नेऊन आणि डोक्यात नाटकातील एकही वाक्य न ठसवून आम्ही एकूण किती पैसे मिळविले म्हणता? केवळ रुपये ५००। - आणि हे पैसे आमच्या अभिनयकलेस मिळाले म्हणता की, काय? नावच नको! नावच घ्यायचे झाले तर

माझे बंधू जी. एन. जोशी याचेच घ्यावे लागेल. आमच्या म्हणा, माझ्या म्हणा विनंतीवरून हे संगीतपात्र आमच्यात सामील झाले आणि त्याने ही ५०० रुपये कमाईची किमया केली!

म्हणजे अखेर शेवटी हा विजय माझाच म्हणायला पाहिजे. कर्व्यांच्या संस्थेला काहीतरी आर्थिक मदत करावयाची हा जो माझा आंतरिक हेतू होता तो अशा रीतीने रुपये ५० + ५००रुपये = ५५० सिद्ध झाला. !

कर्व्यांची मुलगी किंवा जी. ए. म्हणून नंतर त्या संस्थेच्या एकंदर लौकिकात माझ्याकडून काय भर पडली, मला ठाऊक नाही!

# नवमतवाद का 'मन:पूतं समाचरेत' ?

गांधीवाद, समाजवाद, साम्यवाद, - हा 'वाद' आणि तो 'वाद'! राजकीय जीवनात कितीतरी वाद, वादस्थळें आणि वादग्रस्त व्यक्ती!

पण 'नवमतवाद' हा शब्द आपल्या कधी कानांवर आला आहे काय? कदाचित काहीजणांना लांबून येणाऱ्या आवाजासारखा तो कधी - काळी जाणवला असेल, - किंवा जाणवत असेल. पण पूर्ण दोन पिढ्यांपूर्वी या 'नवमतवाद' शब्दाने आणि त्याने निर्माण केलेल्या तरुण मनांतील विविध आंदोलनाने तत्कालीन सुशिक्षित स्त्री - पुरुष समाज अगदी जणू हवेत तरंगत होता! पिसासारखा हलका, हळवा, नाजुक होऊन त्यांचे पाय या रूक्ष गद्यामय भूमीवर ठरत नव्हते. एका वेगळ्याच विश्वात ती तरुण मने स्वच्छंदाने आणि आनंदाने विहार करीत होती.

कारण, त्या काळी फ्रॉईड, मार्क्स, लेनिन, रसेल, अशा थोरथोर मानसशास्त्रज्ञांचा, राजकीय नव - तत्त्ववेत्त्यांचा आणि शिक्षणशास्त्र - नव - नीती विचारवंताचा प्रभाव त्या काळच्या स्वत:ला "नवी" म्हणवणाऱ्या तरुण - तरुणींच्या मनावर विलक्षण रीतीने पडलेला होता. फ्रॉईडचे 'लिबिडो' - वगैरे सर्व sexसंबंधी विचार, लेनीनची glass of water theory रसेलची रूढ नीतिनियमांविरुद्धची बंडखोरी या गोष्टी तरुण मनाला एक प्रकारे आव्हान आणि आवाहन करणाऱ्या होत्या. मला फक्त मुंबईचे आमचे मित्रमंडळ आणि नागपूर - वऱ्हाडकडील काही लेखक - मंडळी, एवढीच या ठिकाणी विशेषकरून अभिप्रेत आहेत. वऱ्हाडसारख्या मागासलेल्या, - पण खानदानी वातावरणातून आलेल्या जुन्या वळणाच्या एकत्र कुटुंबात लहानाची मोठी झालेल्या माझ्यासारखीला येथील "हवामानाने" प्रथमत: अक्षरश: गुदमरून टाकले! येथील मुंबईची गर्दी (त्यावेळची हं! - किती? अवघी १३। १४ लाख!) विजेच्या गाडीचा प्रवास, - स्त्री - पुरुषांनी एकत्र हसणे - बोलणे - सहल करणे - अशा एकेक गोष्टींनी मला जणू विजेचे धक्क्यावर धक्के बसत होते! "काय ही बावळट आहे" एकाने म्हणावे, तर दुसरीने दुजोरा द्यावा, "अगदीच काकूबाई!" 'जरा वर मान करून बसायला काय झालं? - हिचं बोलणं अगदी तोळामासा" - सारखे शेऱ्यावर शेरे - एकसारखे ताशेरे माझ्यावर झाडले जात!!

मला कळेना, मी कुठे आले? कुठे येऊन पडले? माझे कसे होणार? - पण हे चित्र हळूहळू रंग बदलू लागले, पालटू लागले, आणि मी धीट होऊ लागले. शाळेतील नोकरीकरिता करावा लागणारा रोजचा गाडीतील गर्दीतून प्रवास, गाडी पकडण्यास करावी

लागणारी नित्याची धावपळ व विजेच्या चपळाईने करावी लागणारी चढ - उतार, मुंबईच्या मुली व शिक्षिका, सोसायटीच्या मुला - मुलींच्या हायस्कूलची एकत्र स्नेहसंमेलने, भोजने आणि काव्य - गायने, - आणि या सर्व प्रसंगी, अस्मादिकांस नोकरीत 'चिकटवून' देणारे आमचे पाठीराखे बंधुराज जी. एन. जोशी - या सर्वांच्या अनुभवाने, सहानुभूतीने आणि सहकार्याने माझ्या अंत:करण प्रवृत्तींत निश्चितच कायापालट झाला. 'आमचे' बाह्यदर्शन काही फारसेफारसे का, मुळीच बदलले नाही. पण आचार - विचार - उच्चार यांमध्ये पडलेला फरक माझा मलाच जाणवू लागला. - आणि एके दिवशी मी खरोखर दचकलेच!

त्याचे असे झाले. जिने कॉलेजच्या पहिल्याच वर्षात शिक्षणास रामराम ठोकून आरामशीर संसारात प्रवेश केला होता, अशा माझ्या एका मैत्रिणीने मला चक्क असे प्रश्न विचारला की, "काय ग, तू नवमतवादी का?"

तोवर या शद्बाचा मी काहीच विचार केला नव्हता. नवीन संसार थाटलेल्या इतर मुलींपेक्षा माझे जीवन काही वेगळे आहे, असे मला कधीच वाटले नव्हते. कारण, तशी तुलना करण्याचा प्रसंगच उद्भवला नव्हता. शाळेत पूर्ण वेळ नोकरी करीत असल्यामुळे सकाळचा वेळ घरकामात आणि संध्याकाळी पुन्हा चुलीची आराधना! थोडा वेळ मिळाला की, शिकविण्याच्या विषयाची तयारी, वह्या तपासणे, - सहामाही, वार्षिक प्रश्नपत्रिकांचे गठ्ठे भराभर हातावेगळे करणे, - बहुतेक सारे दिवस याच कामात जात. नाही म्हणायला, शनिवारी - रविवारी सिनेमा, चर्चा किंवा व्याख्यान, - अशा प्रकारच्या मनोरंजनाच्या किंवा बौद्धिक कार्यक्रमास आम्ही अगदी ठरवून जात असू - पण कधी कोणाकडे गप्पा मारायला किंवा चकाट्या पिटायला गेल्याचे मला मुळीच आठवत नाही. पहिल्यापासून मला या "अशा" हिंडण्या - फिरण्याचा नाद तर नाहीच - असलाच तर थोडा तिटकाराच आहे! त्यामुळे अगदी लहानपणापासून मला "मुखस्तंभ" "शिष्ट" "माणूसघाणी" इत्यादी शेलक्या आणि दुर्मिळ पदव्या अगदी सहजपणे मिळालेल्या आहेत! - तेव्हा माझा हा तऱ्हेवाईक स्वभाव तर या "नवमतवादात" मोडत नसेल ना? - असे एकदा वाटले; पण नाही. ते पुरेसे पटेना. आमच्या 'नव्या संसारातील मित्रमंडळीत स्त्रीपुरुष या दोघांचाही समावेश होता. कित्येक वेळा मी एकटीच मित्रांबरोबर करमणुकीच्या बैठकीस हजर राहात असे. तिथे साहाजिकच हास्यविनोद चाले. रस्त्याने कोणी ओळखीचे भेटले - त्यातून ती स्त्री असली तरी तिच्याशी बोलण्याचे भान मला राहात असेच, असे आता आठवत नाही. शिवाय कितीक वर्षे मी मंगलसूत्रही वापरीत नसे. त्यामुळे माझ्याबरोबरीच्या किंवा काही प्रौढ स्त्रियांचाही माझ्या एकूण वागणुकीबद्दल गैरसमज होणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. त्यात भरीस भर म्हणजे नवीन वेगळे वाटावे, असे दादरचा आमचा Block, अगदी आजकालच्या या नावाला शोभेसा, आवश्यक ते सामान नवीन, कोरे, - जिथल्या तिथे ठाकठीक ठेवलेले. बसणे - उठणे पलंग किंवा खुर्च्या यावरच. जेवणखाण अर्थातच खुर्चीवर बसून. टेबलावर चहाच्या वेळी "पंच"

मधील विनोदी चुटक्यांचे वाचन, नंतर काही वेळ खाली अंगणात बॅडमिंटनचे फूल इकडून - तिकडे उडविणे - की मग स्वयंपाकास लागणे! साहजिकच कधी कधी उशीर व्हायचा. मग घरातील "पुरुषाने बायकोला" स्वयंपाकास मदत करणे - तीही अगदी आनंदाने! एकतर जोश्यांचा मूळ स्वभाव व पिंड आगरकरांच्या - सुधारकी आणि उदारमतवादावर पोसलेला आणि तो काळच मूर्तिमंत स्त्री दाक्षिण्याचा. स्वत:चे विचार दुसऱ्या वरच काय - पत्नीवरही कधी लादायचे नाहीत, तिला आचार - विचारांचे पूर्ण स्वातंत्र्य द्यायचे, कसलाही 'धाक' म्हणून दाखवायचा नाही, परस्पर विश्वासाच्या बळावर स्वतंत्र पण एकत्र जीवन जगायचे - अशा प्रकारची त्यावेळी, "नवे नवरे" असे म्हणता येईल, अशी एक अभिनव नवऱ्यांची जात निर्माण होऊ पाहात होती. हे 'नवजीवन' निर्वेध जगता येईल, अशी काहीशी पोषक गृहस्थितीही आमच्यासारख्यांच्या घरातून होती. बालपणी घेतलेला एकत्र "मोठ्या" कुटुंबातील कटू अनुभव आणि पुढील काळात "समाजस्वास्थ्य"कारांच्या विचारांचा प्रभाव यामुळे माझ्या पायात "बेडी" लवकर पडली नव्हती!

अशा माझ्या जीवनाच्या अनेकविध पैलूंमुळे मी "नवमतवादी"आहे - असा वास माझ्या त्या आणि इतरही मैत्रिणींना आला असावा.

स्वत:ची वैचारिक निष्ठा आणि मनोनिग्रह यांचे योग्य पाठबळ नसेल तर नव - विचाराच्या वाऱ्याबरोबर वाहात जाण्याने सुखापेक्षा दु:खच अधिक वाट्याला येते! पण ते त्यावेळी जाणवत नाही, कोणी परावृत्त करू लागले तरी धारेला लागलेले मन आवरता येत नाही! - म्हणूनच बंधनाचे महत्त्व आहे. अति बदमाष किंवा अति सज्जन यांच्यापुढे सगळी बंधने खळाखळ तुटून पडतात - पण सामान्य बुद्धीच्या व्यक्तीला विशिष्ट बंधने अत्यंत आवश्यक आहेत, असे आता अनुभवांनी वाटते आणि सर्वथा पटते.

'सुधारक' या शद्बानंतर 'नवमतवादी' ही संज्ञा प्रचारात आली, - आणि नंतर 'पुरोगामी' हे विश्लेषण शिष्टसंमत झाले, - पण ते बहुतांशी राजकारणाच्या, राजकीय विचारांच्या क्षेत्रात. 'पुरोगामी' नव्हते ते 'प्रतिगामी' ठरले - असे बरेचसे नवे नवे शद्ब, अभिधा, लक्षणा, व्यंजना इत्यादी अर्थांनी सामाजिक व इतर क्षेत्रांत त्या काळी प्रचारात आले आणि कमी अधिक मान्यता पावले.

सामाजिक आणि विशेषकरून वाङ्मयीन वातावरणात गडकऱ्यांचा 'प्रेमपाठ' - ते 'प्रेमसंन्यास' या प्रणयाकुल भावनांचा पगडा बरेच दिवस जाणवत होता. 'बंधनाच्या पलिकडे', 'सदाफुली' या कादंबऱ्यांनी नवीन रक्त सळसळत होते - तशीच, रविकिरण मंडळाने निर्माण केलेली रोमॅन्टिक, प्लेटॉनिक लव्ह, इत्यादी विचारविकारांची नव्हाळीही जीव धरून होती. तरीही अधूनमधून "हिज हवा ग आयू.सी.एस्.ऽ"किंवा "रिकामी मी कोठली !आता तर नौकरि बरि लागली" - या कवितांतून कवी मायदेवांनी वर्णिलेल्या तरुणींच्या आशाआकांक्षांचे पडसाद उठत होतेच.

एकंदरीत हा काळ मोठा मजेशीर तसांच अतिशय मायावी असाही होता. डोळे आणि मन जागृत असलेली व्यक्ती या कालप्रवाहाच्या काठावर बसून नवविचार सारासार विचारशक्तीने ग्रहण करीत होती, - तर हळवी, लाघवी अजाण मने त्या ओघात स्वत:ला झोकून देत होती!

म्हणूनच म्हणायचे की, ‘‘नव - मत -वाद’’ की, ‘‘मन:पूतं समाचरेत् ?’’ - ‘‘मन:पूतम्’’ म्हणजे मनाला पवित्र वाटणारे. या संस्कृत वचनाचा अर्थ मनास वाटेल तसा, लक्षणेने किंवा व्यंजनेने घ्यावयाचा नसून तो केवळ अभिधेनेच मान्य करावयाचा आहे. मनास जे पवित्र वाटेल तसेच आचरण करावे, - हा याचा सरळ आणि खरा अर्थ, तथापि ‘‘मन’’ म्हणजे या ठिकाणी कोणाचे मन, हा महत्त्वाचा प्रश्न शिल्लक राहातोच.

‘‘एते सत्पुरुषा: परार्थघटका: स्वार्थान् परित्यजे ये’’ - या वचनात वर्णन केलेले सत्पुरुष किंवा, ‘‘सतां हि संदेह पदेषु वस्तुषु प्रमाणमंत:करणप्रवृत्तय: ’’- यात उल्लेख केलेले ‘सज्जन’, - अशासारखा थोर उदात्त, संस्कारी ‘मनालाच प्रमाण मानणे, - म्हणजेच ‘मन:पूतम् समाचरेत्.’

◆

# आमचे काही आदर्श

'आमचे काही आदर्श' असे मोठे गंभीर, घवघवीत नाव मी लेखास दिले खरे, - पण तो आपला एक आकर्षक मुखवटा, बरं का ! खरं म्हणजे, "आमच्या काही आवडी - निवडी" असंच मला मनातून म्हणायचे आहे. "आवडी"चाच पुढे "आदर्श" होतो - पण तो पुढे, - म्हणजे फारच पुढे. विचारप्रवण किंवा विचारशील मनाने स्वतःच्या जीवनध्येयाची केलेली निवड म्हणजे तो खरा आदर्श !

आम्ही काय तेव्हा शाळकरी परकऱ्या पोरी होतो. तेव्हा वाटे, घरकाम तेवढे एकटे आम्ही मुलींनीच का करावे ? भाऊ शिकतात, तसेच आम्हीही शिकतो, अभ्यास करतो, वार्षिक परीक्षेत पहिला नंबर मिळवून भावांना सहसा न मिळणारी बक्षीसेही पटकावतो, - मग त्याने का कधी पाने मांडू नयेत ? आपल्या कपबशा आपण का विसळू नयेत ? घरातले केरवारे एक वेळ केले नाहीत तरी रात्री आंथरुणे घालण्यास भावांनी मदत का करू नये - असे कितीतरी प्रश्न जिभेवर येत, पण ते आतल्या आत गिळावे लागत कारण, घरातील वडील माणसे - विशेषत: आई, आजी, काकू - वगैरे कोणीच या बाबतीत कधी चकार शब्द काढीत नसत ! भावांनी आपणहून आम्हाला घरकामात मदत केली असती किंवा वडील मंडळींनी त्यांना तसे करायला लावले असते तर ते आम्हाला नक्कीच फार फार आवडले असते ! पण 'मुलींना विचारतो कोण ?' त्यामुळे नेहमी वाटे, आपण मुलाच्या जन्मास का बरे आलो नाही ? साहजिकच मुलाचा जन्म हा आमचा त्यावेळचा एक महान् आदर्श होता ! अर्थात हा 'आदर्श' कधीतरी फलद्रूप होणे शक्य होते काय ?

मग आम्ही आपला त्यातल्या त्यात विचार करून मोठ्या समजूतदारपणे स्वतःची केशभूषा आणि वेषभूषा इकडेच अधिक लक्ष पुरवू लागलो. अर्थात हे म्हणजे काही सोपे काम नव्हते ! आमच्या वेण्याफण्या सकाळी अगदी लवकर उरकाव्या लागत आणि आजी, आई किंवा काकू - कोणीतरी मोठी नातेवाईक बाई तिच्या पुढ्यात बसवून, आमचे केस बारीक फणीने खसाखस विंचरी आणि खूप घट्ट असा आवळून अंबाडा बांधून टाकून इतर घरकामास मोकळी होई. बसल्या जागी पडलेले सगळे गुंतवळ उचलून, त्याची गुंडाळी करून ती लांब फेकून द्यावी लागे - आणि ती उडून इकडे तिकडे जाऊ नये म्हणून हलकेच तिच्यावर थोडे थुंकावे लागे. आजचे गृहजीवन सगळे उभ्याचे आणि घाईगर्दीचे - त्यांना आमच्या या दरबारी बैठ्या थाटाची काय कल्पना येणार ?

मोठ्या बायका स्वयंपाकात गुंतल्या की, इकडे आमची फॅशन सुरू होई. कधी समोरून चापून खाली केस वळवून घे - नाहीतर अंबाडा खूप सैल करून त्याला कमळातील बाळकृष्णासारखा

बसवून ठेव. पर्यायानं कानाच्या वरच्या पाळ्या केसांनी झाकल्या गेल्याच ! कधी असा थाट तर कधी तोंडावर दोन्हीकडून केसाच्या बटा लोंबत ठेव ! - एक ना दोन - पण बहुधा 'बालगंधर्वा चा आदर्श समोर असे. कधी कधी "उलटा अंबाडा" घालून चाफेकरांचेही अनुकरण केलेले आठवते. पिळाचा अंबाडाही आवडे. आकडे मात्र जळक्या फुलबाजाचे, तारेचे करीत असू. पण ते मात्र सगळे शाळेत गेल्यावर - आणि शाळा सुटण्याच्या बेताला ! घरी येताना पुन्हा त्या काकूबाई ! नऊवारी लुगडे नेसण्यातही या दोन स्त्री - पार्टी नटांना आम्हा गुरुस्थानी मानले होते. एरवी आमचा डावा ओचा उजव्या ओच्यापेक्षा नेहमी खाली असे. दोन्ही ओचे सारखे पायघोळ नेसणे 'वाईट' समजले जाई. छचोरच म्हणा ना ! आणि हो - तो ओचा खोचतानासुद्धा पोकळ ठेवावा लागे. शाळेत जाताना आम्ही तो 'शेणव्यां'सारखा खोचू लागलो ! घरी येताना पुन्हा खालच्या मानेने नेहमीच्या बाळबोध पोशाखात आमचा प्रवेश सुरू ! आजच्या मंडळीला यातील कावा आणि काव्य कसे बरे आकलन होणार ?

पोलक्यांच्या तऱ्हांबद्दल मात्र कधी फारसा वाद किंवा मतभेद झालेला आठवत नाही. घरीच कपडे शिवत असू. कमरेच्या खाली पोचणारी लांब, कोपरापर्यंतच्या बाह्यांची खिसे असलेली पोलकी असली तरी, गोल गळ्यांबरोबर चौकोनी गळ्यांचीही आवड त्यावेळी विशेष होती - आणि कॉलरीही गळ्याला शोभा आणीत होत्या ! पुढे - पुढे मटन - चॉप, कोंबड्याच्या बाह्या, Flabsकिंवा झग्यासारख्या फुग्याच्या बाह्या असलेली पोलकीही आम्ही वापरली आहेत. मॅगिया म्हणूनही पोलक्याचा एक प्रकार होता. पण हे सर्व कपडे शिवीत असतानाच पाहायचे. एकदा का ही पोलकी अंगात चढविली की, बाहेर पडताना ती पदराआड अगदी गडप होऊन जात. कधीकाळी एखादेवेळी एखादीचा पदर उजव्या खांद्यावरून सरकून किंचित पाठीवर आला की, आम्ही मैत्रिणीसुद्धा त्या 'दृश्या'कडे आश्चर्याने 'आ'वासून पहात असू. कॉलेजमध्ये शिकलो - सवरलो, नोकरीला लागलो तरी आमचा पोषाख हा असाच ! आताच्या दृष्टीने गावंढळच म्हणायचा ! नेसायला रोजची दोनच धडोती - पैकी एक काळे आणि दुसरे बैंगणी रंगाचे. तिसरे असलेच तर बासनातले - सणासुदीला नेसायचे ! नाहीतर आईच्या कोऱ्या लुगड्याची घडी हळदीकुंकवाला हटकून मोडायची - आम्हाला वाटे, वडिलांनी आणखी दोन तरी लुगडी घ्यावीत. एखादे पांढरे पातळ तर फार फार हवेसे वाटे. पण पांढरी पातळे गरती स्त्रियांनी म्हणे नेसायची नसत ! पोलकी मात्र अद्ययावत् सगळी पांढऱ्या कापडाची. काळ्या रंगाच्या लुगड्यावर काळे पोलके कधीही घालायचे नाही. ही आमची माफक रंगसंगतीची कल्पना होती. काही वर्षानंतर काळे पोलके फारच 'फॅशन' मध्ये आले ! आम्ही सभांना काळी पोलकी घालून जाऊ लागलो. आजची स्त्रियांच्या ( पुरुषांच्याही ) अनेकविध कपड्यांतील रंगसंगती म्हणजे विविध रंगाची आणि रंगछटांची केवळ उधळण आहे ! इंद्रधनुष्यातील नैसर्गिक सात रंग, - शत, सहस्रगुणित झाले आहेत की काय, असा संभ्रम आजच्या स्त्रिया आणि मुली यांचे पोषाख पाहून मनात निर्माण होतो. "दुनिया रंग रंगेली" हेच खरे.

आमचे कपडे जसे मोजके तशा आमच्या मैत्रिणीही अगदी मोजक्याच असायच्या. मुलींनी ऊठसूठ गप्पा मारायला गेलेले घरच्या मंडळीला खपत नसे. काय नाटक, मेळे, सर्कस बघायची ती खास घरच्या मोठ्या माणसांबरोबरच. आईच्या परवानगीनेच मी एकदा मैत्रिणीबरोबर सर्कस पहायला गेले होते, - पण त्यावेळी तिचा भाऊ सोबत म्हणून आला होता. मला ही गोष्ट अगोदर ठाऊक नव्हती, - पण ही हकीकत घरी आल्यावर आईला कळली मात्र, - तिने माझ्याशी आठ दिवस अबोला धरला होता! असा हा आमचा माहेरचा सासुरवास होता! आम्हाला वाटे, मोकळेपणी हिंडावे, फिरावे, शाळेतील गमतीजमती मैत्रिणींशी नाहीत, तरी भावाशी बोलाव्यात - सांगाव्यात! - पण 'मुलांशी' कसले बोलायचे असे म्हणून घरच्या मोठ्या बायका सतत रागे भरायच्या! - मग आम्ही काय करीत असू, माहीत आहे? घरची मोठी माणसे काही खाजगी गोष्टी बोलत बसली असली तर त्यांच्या आसपास, त्यांना कळणार नाही, अशा तऱ्हेने, - आम्ही सारख्या घोटाळत असू. अशा गप्पा चोरून ऐकणे हाच आमचा आदर्श होऊ पाहात होता!

तशा आमच्या आई - काकू वगैरे त्या काळच्या मानाने पुढारलेल्या. र ला र आणि ट ला ट जुळवून कवने रचणाऱ्या आणि अधून - मधून गावातील 'ब्रह्म - विद्या मंदिरात' भरणाऱ्या सभेला हजर रहाण्याइतक्या धीट होत्या. शाळेत शिकणाऱ्या काही मुलीही तेथे निबंध - वाचन करीत किंवा कधी कधी नाट्यप्रवेशही रंगवीत. कथाकीर्तनाचेही कार्यक्रम तेथे होत. पण हे आपले केवळ सांगण्यापुरते. म्हणजे आम्हा मुलींच्या दृष्टीने. पुण्यास कॉलेजमध्ये गेले आणि सार्वजनिक सभा म्हणजे काय याचा खरा आणि पहिला अनुभव घेतला. तसाच तो हिराबाईचा गायनाचा जलसा. मुलींनी असे गाणेबजावणे हॉलमध्ये बसून ऐकणे आणि त्याचा आनंद लुटणे हा माझ्या तत्कालीन जीवनातला केवढा दुर्मिळ अनुभव! आमचे कॉलेज गावापासून बरेच लांब होते. पण न कंटाळता आम्ही पायी अशा सभासमारंभांना जाऊ लागलो. एकदा तर चक्क प्रिन्सिपॉलांची आज्ञा धाब्यावर बसवून आम्ही मुलींनी कॉलेज ओस पाडले होते! संपाच्या स्वरूपाचेही तेच पहिले दर्शन! - मात्र त्याही परिस्थितीत एक कॉलेज कन्या वर्गात बसून होती - तीही आज ठळकपणे मनासमोर दिसते आहे! तिचे मनोधैर्य खरोखरच वाखाणण्यासारखे होते!

'ते ही नो दिवसा' - या जातीतीलच कॉलेजमधील तो काळ - बालगंधर्व, हिराबाई, बापूराव पेंढारकर इत्यादी गायकगायिकांच्या कर्णमधुर स्वरांनी जसा निनादत होता, - तसाच तो रविकिरण मंडळाच्या पुण्यातील काही किरण सदस्यांमुळेही सदैव उज्ज्वल असा वाटत होता. आमचे एक प्रोफेसरच मुळी कवी होते. - वा. गो. मायदेव. आपल्या दिवंगत छोट्या बालकास उद्देशून केलेली कविता म्हणताना त्यांच्या नेत्रातून अश्रूंच्या धारा स्रवू लागत! पुरुषाच्या डोळ्यात प्रथम अश्रू पाहिले ते मी इथेच, - कॉलेजच्या वसतिगृहात या कवीचे काव्यगायन चालू असताना! - आणि कवी यशवंतांनी आपली 'आई' ही कविता गाताना स्वत:बरोबर आम्हालाही हुंदके द्यायला लावले, तेही इथेच!

नर्मविनोदाचे मर्म आम्हाला गुरुवर्य वा. म. जोशी यांनीच ग्रहण करायला शिकवले. आणि इंग्रजी भाषेचे सौंदर्य - विशेषत: तिच्यातील विशेषणे आणि क्रियाविशेषणे यांचे औचित्य आमच्या मनावर ठसवले ते प्रो. लागू यांनीच, - अर्थात् कर्व्यांच्या कॉलेजमधीलच हे काव्यशास्त्रविनोदाचे पाथेय आम्हाला आमच्या सुगीच्या दिवसात उपयोगी पडले, - आदर्शभूत ठरले.

त्यामुळे या संस्थेतून शिक्षण पूर्ण करून बाह्य जगात पदार्पण करणाऱ्या पदवीधर कन्यकांच्या मध्ये, बारकाईने निरीक्षण करणाऱ्या चोखंदळ वृत्तीच्या लोकांना एक प्रकारचे आंतरिक साम्य आढळू लागले. तशा अर्थाचे उद्गार माझ्या कानावर कितीतरी वेळा पडलेले आहेत. अंत:करणातील विचारभावनांचा परिणाम बाह्यरूप आणि इतर वागणूक यांवरही अपरिहार्यपणे होतो - म्हणूनही G.A.मुली ( P.A.त्यामानाने थोड्या ) अनेकांना एकदम 'एका जाती'च्या वाटत. "सुगीच्या दिवसातील हा आमचा अनुभव आम्हाला निदान मला तरी एकंदर जीवनाच्या दृष्टीने जसा पोषक तसाच प्रेरकही ठरला, हे नमूद करताना मला मोठा अभिमान वाटतो.

दुराभिमान खासच नव्हे, - पण अभिमान वाटावा असे काही प्रसंग माझ्या व्यावसायिक जीवनात मला अनुभवण्यास मिळाले, ही गोष्ट मात्र मला इथे आवर्जून नमूद करावीशी वाटते. त्यांपैकी एकच सांगते, - आणि तो म्हणजे इंग्रजी भाषेच्या बाबतीतील. कर्व्यांच्या मुलीचे इंग्रजी हा तर अखंड चेष्टेचा विषय ! "चला, आपण व्हिक्टोरिआ करून जाऊ या." - असे म्हणायचे असले तर G.A.काय म्हणतील ठाऊक आहे ? -'Let us make a Victoria' -आणि पुरुषवर्ग 'खो - खो' करून हसायचा ! मी मनात म्हणे, B. A.मुली 'make'या क्रियापदाऐवजी do हे क्रियापद घालतील ! माझ्या या मुद्द्याला सबळ पार्श्वभूमी आहे. हायस्कूलमध्ये मुलींना इंग्रजी माहितीपट दाखवीत. सर्वांनाच काही त्यातले सर्वच समजत नसे. पण त्या इंग्रजी मजकुराचे मराठीकरण करण्याचे ( हलक्या दर्जाचे ) काम माझ्याकडे येई, कारण, - पहिली काही वर्ष मराठी बऱ्यापैकी जाणणारी अशी G. A. मी एकुलती एकच शिक्षकवर्गात होते. मला अगदी चांगले आठवते की, मी मुलींना झटपट मराठी भाषांतर करून सांगत असे आणि मुलीही हसून - खेळून ते ग्रहण करीत असत. "आम्हाला नाही मराठी येत" बाकीच्या तोऱ्याने बोलत. मी मोठ्याने म्हणे, - अर्थात् सारे मनातल्या मनात - "इंग्रजी कळल्याशिवाय का मराठी भाषांतर जमणार आहे ? दोन्ही भाषांवर प्रभुत्व आवश्यक नाही काय ? - " पण मी कधी प्रगट उत्तर दिले नाही. शाळेचे 'वरिष्ठ' काय ते सारे समजून होते, यातच सारे आले -मी म्हणे.

काही लहान - मोठे आदर्श समोर ठेवून मनाची मशागत पूर्ण झाल्याशिवाय का सुगीच्या दिवसातील भरघोस पीक लाभणार आहे ?

◆

# आमच्या जीवन प्रवाहातील किती एक लहान मोठे भोवरे

बालपणाबद्दल मला वाटते, कवींनीच काव्ये गुंफावीत! 'बालपणीचा काळ सुखाचा' किंवा 'रम्य ते बालपण देइ देवा फिरूनि' वगैरे वगैरे. आमच्या लहानपणी मला असे हेवा वाटण्यासारखे बाल्य कुणाच्या वाट्यास आलेलं आठवत नाही. निदान आमच्यासारख्या मोठ्या एकत्र कुटुंबातील पहिल्या एक-दोन मुलांच्या जीवनात बहुधा बाल्याची ही सुखाची फुलबाग दरवळलेली नसावी. माझे लहानपण तरी मला कित्येक वेळा नकोसेच वाटलेलं आहे. तसे आमचे कुटुंब सुखवस्तू, खेरीज पहिल्या हव्या - हव्याशा वाटणाऱ्या म्हणजेच पुत्ररत्नाच्या पाठीवर तितकीच स्वागतार्ह वाटणारी आमची कन्यारूपी धनाची पेटी. सर्व काही सर्व वडील मंडळीच्या मनासारखे, आजीचीच नव्हे, तर आई - वडिलांचीही मी फार लाडकी होते - पण तो काळ 'अष्ट'च काय, कितीतरी पुत्र - पुत्रीभव, असा होता. त्यामुळे दर वर्षा-सव्वा वर्षाने बहुधा घरात पाळणा हालत असे. ही गोष्ट नैसर्गिक आणि बहुधा म्हणूनच नकोशी मानली जात नसावी. पण त्यामुळे होई काय की, माझ्यासारख्या सर्वात मोठ्या मुलीचा डाव्या कडेवर नेहमी एक तान्हुले आणि उजव्या हाताच्या बोटाला धरूनि नेहमी एक पाठचे भावंड, असा आमचा थाट असे. घरात नोकर - चाकर असले तरी काही कामे ही मुलींनीच करायची, हा अलिखित दंडक. घरातले केरवारे, जेवणाच्या वेळी पाट - पाणी घेऊन मीठ - चटणी वाढून घेणे. जेवणे आटोपल्यानंतर उष्ट - शेण करणे, ही कामे झाल्याखेरीज शाळेतील अभ्यास किंवा शाळेत जाणे मला कधीही ठाऊक नव्हते. माझे भाऊ तर शाळेत जातच, पण मलाही मोठ्या हौसेने वडिलांनी सरकारी हायस्कूलमध्ये घातले होते. त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे लांब हाताची पोलकी मुद्दाम शिंप्याकडून शिवून घेतली होती. आमची शाळा होती खरी अगदी एक दोन हाकांच्या अंतरावर, तरी सुद्धा त्यावेळी गावातील मुलींच्याकरिता म्हणून शाळेने बैलगाड्या नव्हे धमण्या ठेवल्या होत्या. मला वडील नेहमी धमणीतून शाळेत पाठवायचे. लांबून येणाऱ्या मुलींचे ठीक होते. पण मला गाडी कशाला असे आईला ( आणि इतरही काही मुलींना वाटे ) पण वडीलांना..., - विशेषत: आजींना माझे फारच कौतुक! आपली पहिलीच नात शाळेत 'शिकते', 'संस्कृत' पाठ करते. या गोष्टी त्या मोठ्या आनंदाने आणि अभिमानाने आपल्या समवयस्क बायकांजवळ बोलत. पण आश्चर्य हे की, याचे अप्रूप आमच्या आईस मात्र कधी वाटलेले मला तरी जाणवले नाही. उलट घरकामात हिचा, म्हणजे माझा व्हावा तसा उपयोग होत नाही, याबद्दल तिच्या माझ्याशी असलेल्या वागण्या - बोलण्यात एकप्रकारचा राग दिसे. तीही बहुधा 'वाढत्या' संसाराला कावली असावी. पण माझे आपले जीवन मुकाट्याने एकामार्गी चालू होते. मी कधी

घरकामाचा कंटाळा केला नाही, आणि शाळेतील अभ्यास तर माझ्या अतिशय आवडीचा. तोही मी घरकामाच्या आड कधीच येऊ दिला नाही.

त्यामुळे आज एक गोष्ट विशेष तीव्रतेने जाणवते. आजकाल मुली संध्याकाळी किती मजेने इकडे तिकडे फिरतात. खेळतात, धावतात, पळतात! सुटी लागली की, सायकली फिरवतात, नाहीतर बॅडमिंटन खेळतात! त्यांच्या आयाच त्यांना खेळायला प्रोत्साहन देतात. आमच्या लहानपणी ही दृश्ये दुर्मिळच नव्हेत तर जवळ जवळ अशक्यच होती.

पुढे कॉलेजामध्ये गेल्यावर या बाबतीतले वातावरण चांगलेच बदलले. आम्ही लाठीकाठी शिकलो, लेझिम-बॅडमिंटन खेळू लागलो, थंडीच्या दिवसांत पहाटे उठून लांबवर पळत जाण्याच्या व्यायामातील आनंद लुटू लागलो. आणि काही जणींना फोटोग्राफीचाही छंद जडला! - याच्याही पुढली एक गंमत आजही सांगण्यासारखी आहे. मी पदवीधर होऊन शाळेत शिकवू लागले, - त्यानंतर ३।४ वर्षांनीच शाळेतर्फे एक नृत्य शिक्षक 'नृत्य' शिक्षणाचा वर्ग चालवू लागले आणि आम्ही त्यात मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने सामील झालो! नृत्यातील पदन्यासाने जणू आम्ही 'सुगीच्या दिवसांत' पदार्पणच करीत होतो!

अर्थात शाळेत शिकत असताना या सुदिनांची गंधवार्ताही आम्हाला लागणे शक्य नव्हते. जातिभेदाच्या काटेरी कुंपणात आमची मने वावरत होती.

शाळेत जात असलो तरी, - रंगारी, 'परभट', धनगर, कुणबी, अशा जातीजमातीच्या मुलींशी आम्हाला मोकळेपणाने वागण्याची मुभा नव्हती. शाळेतून घरी आल्यावर आम्हाला शाळेतील कपडे बदलावे (पांढरी पातळे वेढून घेऊन) लागत. एकदा आम्हाला आमच्या एका आवडत्या बाईंनी सहज आपल्या घरी बोलावले होते. आजींनी विचारले, 'जाताहात पण त्या बाईंची 'जात' काय? मी म्हटले, 'मला ठाऊक नाही, पण त्या आमच्याशी फार चांगलं वागतात',' 'ते नको सांगूस - तिचं आडनांव काय ते सांग आधी.' मी चांचरत बोलले, 'कदम' 'अग, मग ती रंगारी, - आता तू जा तिच्याकडे, पण खाऊ-पिऊ काही नकोस. चटकन परत ये. आणि घरी आल्यावर लुगडं बदल! कुठल्या कोण महाराणी शाळेत मास्तरणी नेमतात कोण जाणे! - 'वगैरे वगैरे आजींचे बोलणे ऐकून मी अगदी शरमून गेले - आणि केवळ कबूल केले होते म्हणूनच इतर जणींबरोबर त्या बाईंकडे गेले आणि गेल्या पावली परत आले! 'परभटा'चाही आम्हाला विटाळ होई. आता ते कायस्थ किंवा प्रभू झाले तसेच ते 'शेवणी', खरे तर त्यांना सारस्वत 'ब्राह्मण' म्हणतात आणि आम्हा ब्राह्मणांना ते लोक 'भट' म्हणतात! अस्पृश्यांची तर गोष्टच सोडा! आता ते दलित पँथर आणि तेव्हा? अरे बापरे! नावच नको. आमच्या वर्गात भरीस भर एक मुसलमान मुलगीही होती. अतिशय गोड व सुंदर. तिचं नाव रियाझ. 'रि या झ' ही तीन अक्षर मी चुकूनही कधी एकत्र अशी घरी उच्चारली नाहीत! आमच्या घरात देवधर्म, सोवळे-ओवळे आणि जातिभेद विशेष मानला जाई. जातिदृष्ट्या शूद्र, अतिशूद्र, अस्पृश्य मानल्या गेलेल्या लोकांपेक्षाही घरच्या विवाहित, - विशेषत: अविवाहित सुना - लेकींना महिन्याकाठी ३ दिवसांत अत्यंत अमानुषतेनं वागवण्यात येई. त्या ३ दिवस 'बसत' असत. त्यांनी कोणालाही, कोठेही शिवायचे नसे, इतकेच नव्हे तिन्ही दिवस अंधाऱ्या

खोलीच्या कोपऱ्यात बसून काढावे लागत. आज ही गोष्ट कुणाला सांगूनही खरी वाटणार नाही, या मासिक पाळीतील मुलीचे दैन्य बघवत नसे. सोवळे म्हणजे आरोग्य व स्वच्छता यांचा मूलभूत पाया, याची यत्किंचितही कल्पना त्या काळी कर्त्यासवरत्या, पोक्त्या पुरवत्या शहाण्या - सुरत्या स्त्रियांना नसे! घरोघर हाच 'छळ' चालू असे आणि त्याचा वडीलधाऱ्यांना कोण अभिमान वाटे! मात्र एका गोष्टीचे आजही आश्चर्य वाटते, की, आम्हाला 'त्या' दिवसांत शाळेत जाण्याची परवानगी होती. अगदी लहानपणी मात्र आठवते की, आमच्या बाई दर महिन्याला तीन दिवस गैरहजर असत. पुढे पुढे त्या वर्गावर येऊन शिकवू लागल्या. पण त्या आम्हाला त्यांच्या टेबलाला हात लावू देत नसत. आणि आमचे काही चुकले की, बसल्या जागेवरून दुरून आमच्या अंगावर पट्ट्या फेकून आम्हाला मार देत! असे प्रसंग आठवले की, आज कोण हसू लोटटते!

आजच्या पिढीला काल्पनिक केवळ कपोलकल्पित वाटतील अशा या आमच्या पिढीच्या आठवणी, एकेक वेचक, जाचक, पण आज हास्यकारक वाटणाऱ्या! हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्यात रंगवलेलं स्त्री-जीवनच आम्ही जगत होतो, असं मी म्हटलं तर त्यांत कुणालाही आश्चर्य वाटायला नको.

अर्थात काळ बदलत चालला आणि 'सुगीचे दिवस' दृष्टिपथात येऊ लागले, त्यावेळेच्या काही आठवणीही आज ऐकताना जरा चमत्कारिक वाटल्या, तरी, एका दृष्टीने त्यात सनातन सत्य दडलेले आहे असे जाणवेल. उदाहरणच द्यायचे, तर परवाच सांगली इथे गाजलेले एका तरुण विधवेचे केशवपन! त्या प्रकरणाची धार्मिक, सामाजिक किंवा मानसिक पार्श्वभूमी तपासून पाहाण्याचे हे स्थळ नव्हे. तथापि आजही पण वरील वातावरण नव्या संदर्भात का होईना, पण विचारी मनाला अस्वस्थ करते! तसाच प्रकार 'सजातीय' किंवा 'समलिंगी' आकर्षणाचा ( प्रेमाचा ) अशी प्रकरणे मला शाळा किंवा कॉलेजमध्ये शिकत असल्यापासून आढळलेली आहेत. यालाच लैंगिक मानसशास्त्रीय परिभाषेत 'लेस्वियनिझम्' असं म्हणतात, असं मला बरेच पुढे कळले, वसतिगृहात राहाणाऱ्या मुलींच्या बाबतीत ही शक्यता अधिक असली, - तरी एक बोर्डर व एक डे - स्कॉलर यांचेही प्रेमालाप वेळी अवेळी, एकांत गाठून चालत, हे मी स्वत: पाहिले, अनुभवलेले आहे. कालांतराने त्या दोघींतील दुर्बल मनाची मुलगी बावरलेली, मानसिक समतोल ढळलेली किंवा किंचित वेडसर झालेलीही मला ठाऊक आहे. तथापि गंमत अशी की, आमच्या वेळी मुलीची वये जसजशी लग्नाची होऊ लागली तसतशा त्या मुली, 'मला मुळी लग्नच करायचं नाही' असं अगदी ठासून सांगू लागल्या. एकदोन पिढ्यानंतर ही विचारसरणी बदलली. मुली लग्नाला अतिशय उत्सुक झालेल्या दिसल्या नाहीत, तरी विवाहबद्ध होण्यास त्यांचा विरोध राहिला नाही. याला कारण, मला वाटते, दिवसानुदिवस प्रचारात येणारी विभक्त कुटुंबपद्धती आणि 'लाल त्रिकोणांच्या अंतर्गत असलेला विचारसरणीचा आदर्श! 'कुटुंब लहान सुख महान' हा सुख मूलमंत्र कधीकाळी नि:संकोचपणे प्रत्यक्षात उतरेल, याची काहीच कल्पना नसल्यामुळे त्या प्रेमांत पडणाऱ्या किंवा न पडणाऱ्या मुलींनाही एकत्र आणि 'मोठ्या कुटुंबाचा' मनातून मोठाच धाक वाटत असावा. 'असावा' का? धाक वाटत होताच, हे मी माझ्या आणि माझ्या काही मैत्रिणींच्या अनुभवावरून

निश्चितपणे सांगू शकते.

त्यामुळेच लग्न करायचेच तर ते शिकलेल्या, नव-विचाराच्या आणि शक्यतो ओळखीच्या तरुणाशी परस्पर संमतीने व्हावे, असे आम्हास वाटे. आर्थिकदृष्ट्या तो तरुण कितीही गरीब असला, आपल्या माहेराच्या तोलाचा नसला, तरी होतकरू, कर्तबगार, आणि महत्त्वाकांक्षी असावा, अशी त्यावेळी तरुण सुशिक्षित पदवीधर मुलींची मनापासून इच्छा असे. भिन्न जातीय विवाहही त्यावेळी गाजले! आजही असे प्रीति - विवाह, मिश्रविवाह होत नाहीत, असे थोडेच आहे? पण सायंप्रकाशात काही तारेच ठळकपणे लक्ष वेधून घेतात, तसे पूर्वीचे ते प्रेम किंवा मिश्रविवाह साऱ्या समाजाचे आकर्षण केन्द्र ठरत. अनंत तारांनी लखलखणारे आकाश सुंदर खरे, पण त्याची नवलाईही जशी थोडी कमीच, नाही का? म्हणूनच 'कुसुमानिल' या नावाचे, विवाहाचे आणि पुस्तकाचे चिरसौंदर्य आजही मनाला आनंदित करते, आकर्षित करते आणि आदर्शभूत वाटते!

'सुगीच्या दिवसानंतर अपरिहार्यपणे अर्थयुग अवतरले आणि सामाजिक, वैचारिक, विशेषत: आर्थिक परिस्थितीमुळे स्त्री-पुरुष दोघांच्याही जीवनदृष्टीत जाणवण्याइतका फरक पडला. 'ध्येये म्हणजे दु:खे' असं आमच्या वेळचे विचारवंत लिहून - बोलून गेले. 'ती' दु:खे कित्येक स्त्री -पुरुषांनी आनंदाने स्वीकारली, आणि आपली जीवननौका ध्येयाच्या ध्रुवताऱ्यावर लक्ष केन्द्रित करून वल्हवीत नेली. आजच्या तरुण - तरुणींना ध्येये किंवा श्रद्धास्थाने नको आहेत, असे निश्चितच म्हणता येणार नाही. तथापि ध्येयाचा मार्ग आर्थिक हिरवळीवरून जावा, असे मात्र त्यांना वाटते, यात संशय नाही. त्यात चूक किंवा अश्लाध्य असे काय आहे?

एक मात्र मनात येते की, ही आर्थिक प्रलोभने निरोगी, निर्लेप आणि निर्मत्सर असावीत असे म्हणण्यात आमच्यासारख्यांची काही गल्लत तर होत नाही ना?

◆

# लेखक असतो तरी कसा ? ( १ )

आमच्या लहानपणी बौद्धिक जीवनात एकूण दोन व्यक्तींबद्दल विशेष कुतूहल वाटत असे. एक म्हणजे लेखक किंवा कवी ही व्यक्ती आणि दुसरी म्हणजे 'प्रोफेसर' ही असामी ! पैकी 'प्रोफेसर' लांबून का होईना, पण १९२८ - २९ च्या सुमारास एकदा केव्हातरी दृष्टिपथात आलेले आठवतात. त्याचे असे झाले की, आमच्या गावात नुकतेच किंग एडवर्ड मेमोरियल कॉलेज स्थापन झाले होते. त्यालाच आता 'विदर्भ महाविद्यालय, उमरावती' असे म्हणतात. पण ते कॉलेज व त्याचा सुंदर भव्य परिसर गावापासून फार म्हणजे - फारच लांब आहे. अगोदर आमची शाळाच मुळी गावाबाहेर लांब गावापासून अडीच - तीन मैलावर, - आणि हे कॉलेज तिच्याही पुढे आणखी २ - ३ मैल, - अशा परिस्थितीत 'प्रोफेसरां'चे दिव्य दर्शन आम्हास व्हावे असे ? हे लोक एवढे विद्वान. उंची सूट आणि टाय घालणारे आणि फाड फाड इंग्रजी बोलणारे - कसे बरे दिसत असतील ? कसे वागत असतील, बोलत असतील ? असे काही विचार मनात येत असतानाच एके दिवशी लांब कुठेतरी फटफटीवरून एक गोरटेलीशी तरुण प्रोफेसरांची मूर्ती भरकन रस्त्याने जाताना दिसली. आणि आमच्यापैकी कोणीतरी उद्गारले, 'अग, तो - तो पहा - इंग्लिशचा प्रोफेसर - आपल्या या हिचा नवरा' - आम्ही फटफटीच्या दिशेने डोळे वळवतो तो आम्हाला फक्त धूळच उडताना दिसली ! तथापि जिचे त्याच्याशी नुकतेच लग्न झाले होते ती मुलगी मात्र आमच्या परिचयाची होती. त्यामुळे तिच्याकडे पहाताना किंवा तिच्याशी बोलताना आम्हाला तिचा प्रोफेसर नवराच जणू समोर दिसे. - आणि आता सांगायला हरकत नाही, काही मुलींना त्या प्रोफेसरच्या पत्नीचा मनातून फार फार हेवा वाटे !

दुसरे अत्यंत आदरणीय व्यक्तिमत्व म्हणजे लेखक किंवा कवी. निदान माझ्या बालबुद्धीला तरी असे वाटे की, या शब्दसृष्टीच्या ईश्वराचे दर्शन प्रत्यक्ष परमेश्वरालाही दुर्लभ असावे! तर अनेकांसारखीच मला लहानपणापासून वाचन - लेखनाची फार फार आवड. या माझ्या छंदाला आमच्या घरचे वातावरण मोठेसे अनुकूल होते, असे नव्हे. त्याचा अर्थ असा नव्हे की, वाचनापासून आम्हाला कोणी परावृत्त करीत असे. पण एकत्र कुटुंबात फुरसत अशी नसेच. त्यावेळी वाचनालये वगैरे एवढी लोकप्रिय नव्हती, शिवाय नेहमी गावाबाहेरच वास्तव्य असल्यामुळे तिथे किंवा तिथून पुस्तके मिळवणे सोपे नसे. घरीही म्हणण्यासारखा ग्रंथसंग्रह नव्हता. काही पोथ्या - पुराणे, स्तोत्रे वगैरे असत. अगदीच 'नाही' म्हणायला, बरीचशी नाटकांची पुस्तके मात्र आमच्या वडीलांच्या संग्रही होती. कारण, त्यांनाच मुळी नाटके पाहणे फार आवडे.

शिवाय त्या काळी काही प्रसिद्ध नाटक - कंपन्या अगदी वैभवाच्या शिखरावर होत्या. 'गंधर्व नाटक - मंडळी,' 'ललित कलादर्श', 'महाराष्ट्र नाटक मंडळी' 'यशवंत संगीत मंडळी', 'शाहू नगरवासी नाटक मंडळी' 'रंगबोधेच्छू नाटक मंडळी' 'बळवंत संगीत मंडळी' इत्यादी कितीतरी कंपन्यांची नाटके आम्ही अगदी पुढील रांगेत बसून पाहिली होती. त्यांच्या लोकप्रिय खेळांची पुस्तके जशी वाचली, त्याचप्रमाणे 'विमलेची ग्रहदशा' 'इंदिरा' 'एकत्र की विभक्त' 'दुःखा अंती सुख' इत्यादी काही कादंबऱ्याही वेळात वेळ काढून, - अगदी एकीकडे बसून एकाग्र चित्ताने वाचल्याने आठवते. हरिभाऊ आपटे अतिशय आवडीचे लेखक - आमच्या वेळी आम्ही त्यांना 'कादंबरीकार' असे परक्यासारखे वाटणारे नाव देत नसू! त्यांच्या कादंबऱ्या कोठून तरी मिळवायच्या आणि वर्गात मागल्या बाकावर बसून अधाशाप्रमाणे वाचून काढायच्या. पण त्या ठेवायच्या कुठे? तर, डेस्कमध्ये किंवा मांडीवर, अगदी कुणाला, म्हणजे शिक्षिकेला संशय येऊ नये, अशा रीतीने त्या जपायच्या!

त्यावेळच्या 'आधुनिक कविपंचका'ची अगदी जवळून ओळख झाली आणि त्यांच्या कविता वारंवार वाचून तोंडपाठ होऊ लागल्या. ही कथा-कादंबऱ्यांची आणि काव्याची जादूगरी जमिनीवर पाऊल ठरू देईनाशी झाली. उत्तरोत्तर कवि-लेखकांबद्दलचे हे आकर्षण अधिकाधिक बेचैन करू लागले. आपल्या अंत:करणातील विचार-विकारांना, नाजूक भावनांना, आशा-आकांक्षांना अगदी जवळून स्पर्श करणारा हा लेखक असतो तरी कसा? हे पहाण्याची दुर्दम्य इच्छा माझ्या मनात निर्माण झाली. शाळेतील मासिकातून लेख किंवा कविता लिहिणाऱ्या माझ्यासारख्या मुलींचे चेहरे मी न्याहाळत होतेच. आमच्या काही शिक्षिकाही आपले लेख-कविता हस्तलिखितात लिहायला देत. त्यावेळी अक्षरांच्या ऐवजी त्यांचेच चेहरे तिथे दिसू लागत आणि त्यांच्याबद्दलचा आदर शतगुणित होई. शाळेत असतानाच 'बंधनांच्या पलिकडे' पुस्तक वाचले होते, - आणि मला वाटते, 'सदाफुली'सुद्धा पण. एवढ्या मातब्बर लेखकाचे दर्शन आम्हाला कुठून होणार? त्याला फारच मोठे नशीब हवे, असे वाटे. मात्र एक गोष्ट छान झाली. आणि ती म्हणजे 'बंधनाच्या पलिकडे' आणि 'सदाफुली' या पुस्तकांच्या लेखकांच्या प्रिय पत्नीच (यांचाही प्रेमविवाह फार गाजला होता, - वधू कोकणस्थ आणि वर देशस्थ म्हणून) आम्हाला इतिहास शिकवीत असत, ही होय. त्यांच्याकडे पाहिले रे पाहिले की, आम्हाला जणू पु. य. देशपांडे यांचे दर्शन होई!

पु. य. देशपांडे यांच्याप्रमाणेच वऱ्हाडची दुसरी प्रसिद्ध व्यक्ती म्हणजे कवी आ. रा. देशपांडे ऊर्फ 'कवी अनिल'. मी त्यावेळी इंग्रजी ३ री किंवा ४ थी मध्ये शिकत असेन. 'हिवाळा' वगैरे त्यांच्या बऱ्याच कविता आम्ही पाठ म्हणत असू. वरच्या, म्हणजे ६ वी ७ वीतल्या एक दोन मुली वरचेवर पेटीवर 'आशागीत' ही अनिलांची कविता वाजवीत आणि गळ्यावर म्हणतही असत.

'दूर दूर कितितरी।एक तारका वरी।।
मंदिरास लागली।आग सर्व भडकली' -वगैरे

समग्र कविता आम्ही मोठ्या एकतानतेने ऐकत असू. पण आमच्या, विशेषत: माझ्या बालबुद्धीला त्यातल्या एकही शब्दाचा सुसंगत अर्थ लागत नसे. तेव्हा मी त्या 'मोठ्या' मुलींना त्या कवितेचा

अर्थ विचारी. त्यावेळी त्या असे काही गंभीर चेहरे करीत की, आपण काहीतरी भयंकर, विचारू नये असा प्रश्न विचारला की काय असे वाटून भीती वाटे. (त्याकाळी वरच्या वर्गातील मुलांना खालच्या वर्गातील मुली बिचकून असत!) जरा वेळाने त्या तितक्याच गांभीर्याने उत्तर देत, 'हे पहा, या कवितेचा अर्थ विचारीत जाऊ नका.' का, कुणास ठाऊक, पण यामुळे या कवी भोवतीचे गूढ वलय अधिकच गडद होत असे. मग कोणी सांगे, 'अग, तू आ. रां. ना पाहिलस का? त्यांचे ते डोळे किती उदास आणि भावदर्शी आहेत नाही? जणू डोळ्यांनीच ते बोलतात!' आम्हा लहान मुलींना त्यातला गर्भितार्थ तर सोडाच, पण शब्दार्थही धड समजत नसे. त्यांची धोतर आणि काळा शॉर्ट कोट घातलेली व शिरोभूषण नसलेली मध्यम बांध्याची मूर्ती त्यांच्या समवयस्क आणि समविचारांच्या मित्र-मैत्रिणींच्या मेळाव्यात अंतर्मुखतेने शांत बसलेली असे, असे ऐकिवात होते. नंतर काही वर्षांनी सौ. कुसुमावती देशपांडे यांना पाहाण्याचा आलेला योग हुकला! त्यामुळे फार हुरहुर लागून राहिली. नाहीतर 'अनिल' कवींना पाहण्याचे भाग्य लाभले नव्हते तरी, त्यांच्या 'कुसुमा'ला तरी डोळे भरून पाहता आले असते. आणि मग, 'अजुनि मूर्ति आंतली। नसे मुळीही भंगली' - ही 'आशागीत' या कवितेतील 'अभंग मूर्ति' प्रत्यक्ष पाहाता आली असती.

नंतर १९३२ च्या सुमारास 'आला खुशीत समिंदर' 'चल ग सजणे रानामध्ये' 'किती गोड गोड वदला' या कविता जोत्स्नाबाई भोळे यांच्या तोंडून प्रत्यक्ष ऐकल्या. त्या वेळचा आनंद काय वर्णावा? तो केवळ शद्वातीत - वर्णनातीतच म्हणावा लागेल. कुठेही गेले तरी, 'अशनी, शयनी, भोजनी - ' म्हणतात त्याचप्रमाणे ज्योत्स्नाबाईंचे ते स्वर आणि कवितांचे ते शद्व कानात सतत घुमत असत - कधीही पिच्छा सोडत नसत. माझे मानसिक आणि भौतिक वातावरणसुद्धा या स्वरशद्वांनी पूर्णपणे भरून आणि भारावून टाकले होते.

अशी किमया करणारे कवी हे दिसतात तरी कसे? ते कुठे रहातात? काय खातात -पितात? हे कुणी शापित गंधर्व तर नव्हेत?

अश्वमेधाचा घोडा पाहून 'घोडा घोडा म्हणतात, तो हाय काय?' असा बालसुलभ प्रश्न विचारणाऱ्या लव-कुशाप्रमाणे माझे हे लेखकाबद्दलचे कुतूहल बालिश होते काय? - छे! मुळीच नाही. ललित लेखकाला, कवीला पाहाण्याची जिज्ञासा जबरदस्त होती - आणि ती पूर्ण होऊ न शकल्यामुळे दिवसेंदिवस वाढत होती, हे मात्र खरे.

वऱ्हाडची भूमी सुपीक खरी, पण ती बऱ्हंशी पिकांच्याच बाबतीत. पुण्या - मुंबईप्रमाणे लेखकांचे भरघोस पीक त्यावेळी निदान मला तरी तिथे आढळले नाही.

◆

# लेखक असतो तरी कसा ? ( २ )

येरंडवणे येथे कर्व्यांच्या कॉलेजमध्ये प्रवेश केल्यावर पहिल्याच दिवशी प्रथम दर्शन घडले. ते प्रो. वा. म. जोशी यांचे ! 'रागिणी' 'नलिनी' 'आश्रमहरिणी' 'सुशीलेचा देव' इत्यादी कादंबऱ्यांचे जनक प्रत्यक्ष समोर उभे होते. पोषाख किती साधा. थोडा गबाळाच म्हणा ना ! धोतर, कोट, फेटा, आणि पायात जाड जाड वहाणा, फेटा कसा तरी गुंडाळून डोक्यावर ठेवलेला आणि धोतर अशा पद्धतीने नेसलेले की, घोट्याच्या बरेच वर, आणि गुडघ्याच्या थोडेसे खाली असलेले किंचितसे कोड स्पष्टपणे दृग्गोचर व्हावे. शिकवताना वक्तृत्वही जाणवत नसे. पण एकंदर विषयाचे विवेचन सांगोपांग आणि मूलगामी. असे शिकवताना हातात पुस्तक घेऊन ते स्टेजवरून खाली उतरत आणि प्रथम वर्षातील विद्यार्थिनीला साधेपणाने प्रश्न विचारीत 'काय हो, केशवसुतांच्या वडिलांचे नाव काय ?'

तात्यांनी विचारलेला हा प्रश्न, त्याचे उत्तर कठीणच असणार, असे वाटून प्रश्न विचारलेली मुलगी गोंधळून उभी राही व कावरीबावरी होऊन इकडे तिकडे पाहू लागे ! क्षणात तात्यांचा चेहरा उजळून उठे. डोळे चमकू लागत आणि त्यांच्या मिस्किल हास्याने वर्गातील वातावरण चैतन्यमय होई ! ती बिचारी मुलगी मात्र लाजेने चूर होऊन जात असे ! मुलींना चकवायचे, सारख्या लहान मोठ्या कोट्या करायच्या आणि आपणच हसायचे, - 'रागिणी'तील काव्य-शास्त्र-विनोद साक्षात वर्गात अवतरून - तात्यांचा एरवीचा बाह्य 'अवतार' केव्हाच दृष्टिआड होत असे.

काही कामामुळं वर्गात यायला एखादीला थोडा उशीर झाला की, ते लगेच म्हणत 'या, या लाजू नका. कामातुराणां न भयं न लज्जा' आणि आपणच हसू लागत. अभ्यासाला नेमलेल्या पुस्तकातील विषयाला धरून ते एखादा निबंध लिहायला सांगत, मुली विचारीत, 'म्हणजे कसा लिहायचा, ते नाही कळलं' तर अगोदर हसत आणि मग उत्तर देत, 'अहो, पुस्तकाला धरून म्हणजे पुस्तक हातात धरून निबंध लिहा.' हे उत्तर ऐकताच त्या मुली खालच्या मानेने आल्यापावली परत फिरत असत.

एकदा मात्र वर्गात एक गंमत झाली. म्हणजे तात्यांची थोडी फसगत झाली. एके दिवशी वर्ग पहायला काही पाहुणे आले होते आणि त्यावेळी तात्या मानसशास्त्रातील ॲटेन्शन किंवा असाच काही मुद्दा शिकविण्याच्या तयारीत होते. 'वस्तू हलली की, ती लक्ष वेधून घेते', असे उत्तर यावे या अपेक्षेने त्यांनी बुद्धीने वचा असणाऱ्या एका विद्यार्थिनीला एक सूचक प्रश्न विचारला ! पण कसले काय ? ती मुलगी घाबरली आणि तिने इम्प्रेशन पडते असे उत्तर दिले ! तात्यांचा चेहरा

खर्रकन् उतरला! याच विद्यार्थिनीच्या हुशारीवर खूश होऊन पूर्वी त्यांनी भर वर्गात तिला प्रश्न विचारून म्हटले होते - 'द्या उत्तर. त्वमेव शरणं मम आणि त्यांची अपेक्षा सफलही झाली होती. तीच मुलगी आज गडबडली - तरी तात्यांनी तेव्हाच काय, पण पुढेसुद्धा केव्हाही या गोष्टीची जाणीव त्या विद्यार्थिनीला दिली नाही. त्याची वृत्ती अतिशय समतोल आणि अनाग्रही होती. कोणतेही विधान ते फार जपून करीत. 'मला असे वाटते' 'असे म्हणायला हरकत नाही. अशाप्रकारचे विवेचन ते करीत असल्यामुळे त्यांना कोणी कोणी 'संशयात्मा' असेही म्हणत. ठासून किंवा निश्चित मत न देण्याचा या त्यांच्या बौद्धिक सवयीमुळे कित्येक वेळा विद्यार्थिनीच त्यांची अशी चेष्टा करीत की, 'तात्या असेही म्हणतील - शिवाजी कदाचित् जन्मला आणि बहुतेक मेला असावा.'

पण सात्विकता, सौजन्य आणि साधेपणा हे गुण त्यांच्यात एकवटले होते. तर्कनिष्ठ बुद्धिमत्तेमुळे 'जादूगार' कादंबरी शिकवताना त्यांनी फडक्यांचे गुणग्रहण केले, तसेच 'सुशीलेचा देव' ही कादंबरी शिकवताना स्वत:चे दोषदिग्दर्शनही नि:संदिग्धपणे आम्हाला घडवले. या त्यांच्या व्यक्तिमत्वाला नर्मविनोदाची एक अतिसुंदर महिरप होती. 'मडगावच्या' साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष निवडले गेले तेव्हा त्यांच्या साहित्य सेवेवर शिक्कामोर्तब झाले आणि ते पाहाण्याचे महद्भाग्य आम्हाला लाभले.

त्यावेळच्या आमच्या काव्यसृष्टीतला बुलबुल म्हणजे कवी वा. गो. मायदेव. जवळ जवळ रोज आणि इतक्या जवळून पाहिलेला असा हा पहिला कवी. मायदेवांची मूर्ती अगदी छोटी आणि कृश. त्यांचा पोषाख मात्र अगदी साधा, पण स्वच्छ आणि नीटनेटका असे. ते धोतराचा काचा घालीत, डोक्यावर काळी टोपी, शॉर्ट कोट व पायात वहाणा, असे ते झपाझप चालत. त्यांचा चेहरा अतिशय रेखीव, खरोखर सुंदरच होता. बोलके टपोरे नेत्र, तरतरीत नासिका, छोटीशी जिवणी आणि सुरेख दंतपंक्ती, हे त्यांचे अवयव ते बोलू गाऊ -लागले की, प्रेक्षक श्रोत्यांच्या मनावर एकदम छाप पाडीत. मराठीचे ठाशीव, सुस्पष्ट, आघातयुक्त उच्चार करावेत तर ते मायदेवांनीच. त्यांचे मराठी बोलणे ऐकले तेव्हा आम्हाला कळले की, आमची मायबोली ही इतकी श्रवणसुमग असू शकते! त्यांनी पहिल्याच तासाला गोपीनाथ तळवलकर यांची

'बाळ जातो दूर देशा मन गेले वेडावून। आज सकाळपासून - '

ही कविता अगदी साध्या चालीने, पण सुस्वर गाऊन दाखवली. आम्ही ४ - ५ दिवसांपूर्वीच आपापल्या 'माय - घरा'हून पुण्य -पतनात पाऊल टाकले होते. ते आईचे गीत ऐकताना आमचे मन भरून आले, - आणि आश्चर्य असे की, कवीनेही अखेरीस आपले डोळे रुमालाने टिपले!

इतर अनेक प्रसंगी त्यांच्या कविहृदयाचा प्रत्यय आम्हाला येत असे. व्हरांड्याच्या कडेला एखादी विद्यार्थिनी उभी असलेली दिसली की, मायदेव लगेच तिच्याजवळ जाऊन तिला अलिकडे येण्यास सांगत. कधी कोणी उपवधू होतकरू तरुण त्यांना आढळला तर आपल्या विद्यार्थिनींपैकी कुणाची तरी ते कल्पनेने निवड करीत आणि तिच्या पालकांना गाठून आपला विचार त्यांना कळवत असत. याच प्रेमळ स्वभावामुळे, निवृत्तीनंतर त्यांनी संस्थेच्या कल्याणार्थ देणग्या मिळविण्याचे काम स्वखुशीने पत्करले. आणि आपले 'मायदेव' हे नाव सार्थ केले.

कवी मायदेवांच्यानंतर कॉलेजच्या शेवटच्या वर्षात शिकत असताना, एक दिवस कवयित्री कमलाबाई देशपांडे या संस्कृत शिकविण्याकरिता वर्गात आल्या. 'या जीवाला जीवित कोडे जन्मांतरी सुटेल का' हे काव्य कमलाबाईंचे आहे, हे त्यांच्या सुंदर पण उदास डोळ्यांकडे पाहूनच कळत असे. मधोमध भांग काढून किंचित् कुरळ्या असलेल्या केसांची साधी वळण, त्यांचा गौरवर्णीय मोहक अशा मुखाला फारच शोभून दिसत असे. बांधा तसा ठेंगणा-ठुसका आणि काहीसा गुबगुबीतच, पण हालचालीत नैसर्गिक चपळाई असे. विशेष म्हणजे त्यांचे बोलणे, आवाज किंचित् बसका आणि एक दोन वाक्यानंतर थोडा ठसका, - खोकलाच म्हणना ! अगदी थेट वडिलांची, न. चि. केळकरांची आठवण करून देणारी ती लकब ! आम्हाला फार गंमत वाटे.

प्रल्हाद केशव अत्रे, - बी. ए. बी.टी. टी. डी. (लंडन) यांना प्रथम पुण्यातच पाहिले, ते नुकतेच इंग्लंडहून परत आले होते. रूप, बांधा, एकंदर आविर्भाव आणि चपळ हालचाली यांमुळे ते अत्यंत आकर्षक दिसत. 'लिड' या एकाच इंग्लिश शद्बावर त्यांनी आदर्श पाठ घेऊन दाखवला. आणि आधुनिक काव्यावर अप्रतिम व्याख्यान दिले. त्यांची बुद्धिमत्ता, स्मरणशक्ती आणि रसिकता यांचे मनोज्ञ दर्शन त्या दिवशी आम्हाला झाले. त्यानंतर त्यांनी संपादित केलेला 'वासंती' हा काव्यसंग्रह त्यांच्या मार्मिक प्रस्तावनेसह जेव्हा पाहाण्यात आला, त्यावेळी त्यांचे पहिले दर्शन आणि पहिले व्याख्यान पुन्हा मनोमन अनुभवले.

इंग्रजी पहिलीपासूनच मी हिंगण्यास शिकत असते तर किती तरी नामवंत लेखक-लेखिका मला अगदी जवळून पाहाता आल्या असत्या. कारण पुण्यास येणारी बहुतेक प्रसिद्ध मंडळी हिंगण्यास आवर्जून भेट देत असे. तरीसुद्धा कॉलेजाच्या तीन वर्षात पाहिले - ऐकले ते मनात कायमचे ठसले आहे.

◆

# लेखक असतो तरी कसा ? ( ३ )

लग्नानंतर मी प्रथमच माहेरी गेले होते. मोठ्या मंडळींना खाली वाकून नमस्कार केला आणि मग आजोबांनी वगैरे 'सासर'बद्दल कुशल प्रश्न विचारणे सुरू केले. त्यांचा पहिलाच प्रश्न हा - 'काय ग, तुझ्या नवऱ्याचे कोण कोण मित्र आहेत ?' मी म्हटले, 'आहेत ना, - काणेकर, दौंडकर, - ' माझे वाक्य पुरे होण्यापूर्वीच मला मध्येच अडवून माझे आजोबा एकदम मोठ्याने उद्‌गारले, 'म्हणजे ते काही ब्राह्मण नव्हेत, शिवाय लेखक की काय म्हणतात, तसलेच ना ? आणि बाकीचेही असेच असतील. काही पोटभर जेवता-खाता की नाही ? आमचे वडील आम्हाला म्हणत, भिक्षा मागायची असेल तर लेखक व्हा - ' ही सरबत्ती ऐकून मी तर अगदी थक्क होऊन गेले. एकतर जाती-पातीचे मला कधीच कसले सोयर-सुतक नव्हते आणि नाही. कुणाच्याही आडनावांवरून त्या व्यक्तीची जात मला अजूनही ओळखता येत नाही. मला या गोष्टीत यत्किंचितही रस नाही. पण लेखकाला एवढे हीन लेखणे म्हणजे हा फार फार मोठा गुन्हा आहे, अशी माझी पहिल्यापासून मनोधारणा आहे. 'पिपासितै: काव्य रसो न पीबते' हे वचन खरे आहे. पण नुसत्या भाकरीवरच जग जगू शकणार नाही, हेही तितकेच खरे आहे. मी त्यावेळी आजोबांना काहीच प्रत्युत्तर दिले नाही. देणे शक्य नव्हते, कारण, ते योग्य झाले नसते, तथापि मनात हा विचार जरूर आला की, संपत्ती आणि सरस्वती या कधी एकत्र नांदू शकणारच नाहीत का ? आणि त्या एकत्र नांदू शकणार नसल्यास आपण या दोघीतून कुणाची संगत धरायची ?

पण माझ्यापुढे हा 'डायलेमा' केव्हाच नव्हता. लेखक आणि लेखन यांच्या बाजूने माझ्या मनाने केव्हाच कौल दिलेला होता. 'पुअर रिलेशन्स' हा 'लॅम्ब' चा निबंध वाचताना मात्र आतल्या आत कुठेतरी जाणवे की, आपले श्रीमंत नातेवाईक आपल्याला कठोरपणाने दूर ढकलीत आहेत. पण ही भावना क्षणभरच टिके न टिके, एवढीच. एरवी मी लेखक मित्र-मैत्रिणींच्या मेळाव्यात अगदी खूष - रमून गेलेली असे !

मुंबईस स्थायिक झाल्यावर बौद्धिक क्षेत्रातील माझी पहिली ओळखही 'प्रतिभा' पाक्षिकाशी झाली. या पाक्षिकाचे प्रकाशक श्री. हरिभाऊ मोटे हे वऱ्हाडातील खुद्द आमच्या उमरावतीचे आणि त्यांच्या सहाय्यक त्यांच्या पत्नी सौ. कृष्णाबाई मोटे ( पूर्वाश्रमींच्या कु. कृष्णाबाई खरे ) या तर उमरावतीच्या हायस्कूलमधील आमच्या मराठीच्या शिक्षिका. या दोघांचाही माझा जवळून परिचय होताच. पण 'प्रतिभे' मुळे त्याला विशेष उजाळा मिळाला. त्या वेळचे हरिभाऊंचे दर्शन मोठे सुभग होते. ते शॉर्ट कोट आणि धोतर परिधान करीत. विशेष म्हणजे त्यावेळचे बहुतेक कवि - लेखक

हे 'धोतरा'तच मिरवीत. कोणी नेहमीसारखे साधे नेसत तर कोणी चापून - चोपून काचा मारीत. हरिभाऊंची पद्धत थोडी वेगळी होती. धोतराचा उजवा सोगा ते कोटाच्या डाव्या खिशांत खोचल्यासारखा धरीत. त्यामुळे ते खानदानी रसिक वाटत. यात भर म्हणूनच की काय, त्यांचे ते घारे डोळे पहाणाराचे लक्ष एकदम वेधून घेत. शिवाय त्यांच्या जिवणीभोवती नेहमी मिस्किल हास्याचे वलय असे. एवंरूपविशिष्ट त्यांची मूर्ती जेव्हा बोलू लागे, तेव्हा आपण काहीतरी अगदी निराळेच एकेत आहो असे वाटण्यासारखे त्यांच्या विषयाचे विवेचन लैंगिक आणि मानसशास्त्रीय दृष्टिकोनांतून केलेले प्रत्ययास येई. त्यांच्याबरोबर नेहमी असणाऱ्या कृष्णाबाई ( आमच्या ताई ) अशाच नेहमी उच्च पातळीवरून चर्चा करीत. आवाज खणखणीत, पण गोड, त्यामुळे त्यांचे बोलणे नेहमी ऐकावेसे वाटे. पण आपली काही महत्त्वाची वाक्ये अर्धवट सोडण्याची त्यांची एक खास लकब होती. अजूनही मला वाटते ती तशीच आहे. 'विशाखा', 'लीला - चिंतामणी', 'कटुसत्य-वाहिनी' इत्यादी नावांनी त्यांनी केलेले लिखाण मी आवडीने वाचीत असे. त्यांचे वक्तव्यही सुश्राव्य असे आणि आहे. त्यातील नाट्यगुणामुळेही ते अधिक आकर्षक वाटे. कृष्णाताई आणि बाळूताई दोघीही बहिणी जिव्हेने चपळ आणि अभिनयकुशल. केश-वेषभूषा अगदी जुन्या धर्तीची असूनही त्या स्त्रियांचे आणि पुरुषांचे लक्ष झटकन वेधून घेत. बाळूताई रूपाने उजव्या, तसे त्यांचे लेखन, निदान पहिल्या ३-४ कादंबऱ्या, - त्यांचे विषय विवेचन आणि अवलोकन या गुणांनी खूपच गाजल्या. भाषासौंदर्याबद्दल निराळे सांगायला नकोच. कृष्णाबाई मोटे यांचे 'दृष्टिआडच्या सृष्टीत' हे पुस्तकही विषयाचे नावीन्य, शद्बयोजना आणि स्त्रीसुलभ दृष्टान्तादि अलंकार यामुळे आजही वाचनीय वाटते. 'कळ्यांचे नि:श्वास', 'हिंदोळ्यावर' आणि 'विरलेले स्वप्न' या एकाहून एक सरस पुस्तकांनी आमचे सारे बौद्धिक जीवन त्यावेळी व्यापून टाकले होते. असले अद्‌भुत लेखन करणारी अद्‌भुतरम्य लेखिका रस्त्यात कधी भेटलीच तर अतिशय चपळाईने हसून बोलून झटकन मार्गस्थ होई, - त्या क्षणी लख्‌कन् वीज चमकून गेल्यासारखे वाटे! नुकतीच परवा मी 'हिंदोळ्यावर' ही कादंबरी वाचीत होते, त्यावेळी हेच चमकदार व्यक्तिमत्व मी पुन्हा एकदा मनोमन अनुभवले. त्याचे असे झाले, 'विषय-साधर्म्यामुळे' संदर्भाकरिता म्हणून ( आणि तुलना म्हणूनही ) मी जेव्हा 'हिंदोळ्यावर' वाचू लागले त्यावेळी अचलेचे व्यक्तिमत्व, वैशाखाची स्वभावरेषा, घटस्फोटाची आवश्यकता, वेळोवेळी प्रगट केलेली पुरोगामी मते आणि तत्कालीन, सामाजिक परिस्थितींचे मूलगामी विश्लेषण, - इत्यादी लेखनगुणांमुळे ती कादंबरी आजही मला श्रेष्ठ दर्जाची वाटते, - विशेषत: तत्सम विषयांवर लिहिलेल्या आजकालच्या कादंबरीच्या दृष्टीने.

'प्रतिमा' पाक्षिकाच्या संपादक - मंडळात गं. दे. खानोलकर आणि वि. ह. कुलकर्णी हे आणखी दोन लेखक होते. आम्ही पार्ल्यास राहात असताना, बहुतेक दर शनिवारी संध्याकाळी गं. दे. खा. आमच्याकडे मुक्कामाला असत. ते कधी फारसे बोलत बसल्याचे मला आठवत नाही. आमचे बिऱ्हाड दोन खोल्यांचे होते. जोशी घरी येईपर्यंत ते वाचीत बसत आणि मी स्वयंपाकघरात कामात असे. मान पुढे झुकवून थोडे खाली पाहात ते चालत, तसेच आजही जातात - येतात, पण पोषाखात मात्र बदल झाला आहे. तसा विठ्ठलराव कुलकर्ण्यांच्या वेषातही फरक पडला आहे.

त्यावेळी कोट, टोपी, सोग्याचे धोतर असा बाळबोध पोषाख ते करीत, पण मस्तकावरची काळी टोपी मात्र किंचित तिरपी असे त्यामुळे ते रसिक आणि मिस्किल दिसत. (असे आपले मला वाटे) त्यावेळी ते फार छान दिसत. प्रतिपक्षावर आडून आडून हल्ला करण्याची त्यांना फार हौस. बोलणे एकूण वकिली थाटाचे. कोल्हटकरी पद्धतीने कोट्या करण्याची हौस दांडगी. नेहमी हसून खेळून आणि विशिष्ट लकबीने बोलणे. त्यांची ती लकबच श्रोतृवर्गात हास्याचे फवारे निर्माण करी. त्यांचे आणखीही एक स्वभाव वैशिष्ट्य होते. शाळेतील वरच्या वर्गातील मुलींना किंवा काही तरुण स्त्रियांना ते आपले मित्र वाटत, अशा प्रकारचे त्यांचे त्यांच्याशी वागणे - बोलणे जिव्हाळ्याचे, आपलेपणाचे असे. एकूण त्यांच्याबद्दल विश्वास वाटावा अशी ती व्यक्ती होती. अगदी अलिकडे त्यांच्या स्वभावात काही फरक पडला आहे, असे काहींना बोलताना ऐकते. परिस्थितीमुळे असेल. पण आजची शर्ट - पँटमधली वि. ह. कु. ही मूर्ती पहिली उरली नाही, हे मात्र खरे.

मला वाटते, बहुतेक जुने लेखक - कवी यांनी इंग्रजी पोषाखच पसंत केला आहे. आमच्यावेळी हमखास सभा गाजवणारे रा. म. आठवले यांना मी अलिकडे पाहिलेले नाही. ते टोपी, सदरा व धोतर नेसूनच खणखणीत भाषणे करीत. त्यांच्या झुबकेदार मिशा, भव्य चेहरा आणि गौरवर्ण आजही नजरेसमोर तो काळ उभा करतात. फौजदारासारख्या ऐटीत फिरणाऱ्या कोंबड्याचे वर्णन करणारे कवी दत्तप्रसन्न कारखानीस आज कुठे बरे आहेत? आकाशात एकेकट्याने फिरावे लागत असल्यामुळे 'सूर्य भडकला आणि चंद्र खंगला' ही अभिनव कल्पना याच कवीची. कविता, कादंबरी कशावरही चर्चा असो, त्यात अस्मादिकांची हजेरी लागायचीच.

एकदा काणेकरांच्या 'चांदराती' वर बोलण्याचा प्रसंग आला तेव्हा मात्र मी खरोखर घाबरलेच! काणेकरांची कीर्तीच तशी होती. रशियाला भेट देऊन आलेला हा तरुणांचा मार्क्सवादी पुढारी, पुरोगामी लेखक, लघुनिबंधकार आणि अगदी वेगळ्या प्रकारच्या कविता लिहिणारा प्रतिभाशाली कवी! त्याच्या कविता आपल्याला कशा कळणार? त्यातून त्यांचे ते नेहमी ऐटबाज उंची सुटा - बुटात हिंडणे -फिरणे! त्यांच्याजवळ जावे असे वाटायला लावणारी पण तितकाच वचक निर्माण करणारी त्यांची ती दाट कुरळे केस उंच मागे वळवलेली मूर्ती. त्यांचे बाह्यत: साम्य दौंडकरांशी बरेच दिसत असे. दोघे भाऊ भाऊच वाटत. या दोन लेखकांना मात्र मी कधी धोतर नेसलेले पाहिले नाही. अगदी नाही म्हणायला, आमच्या मुलीच्या लग्नात जेवणाच्यावेळी काणेकर धोतर नेसून आल्याचे मला स्मरते. त्या वेशातला त्यांचा फोटोही आमच्याजवळ आहे. मर्ढेकरसुद्धा नेहमी साहेबी पोषाखातच वावरत. त्यांचे बोलणे हळू आणि सौम्य असे. वागणे फार साधे असे. एकदा टिळक पुलावरून जाताना ते दिसले. जून महिना होता. पाऊस पडत होता, पण त्यांच्या अंगावर फक्त रेनकोट होता. मस्तकावर वरून अभिषेक चालला होता. आणि हा कवी आपल्याच तंद्रीत चालत होता! त्यांची दृष्टी अंतर्मुख पण चेहरा मात्र प्रसन्न दिसला. त्यांचा 'शिशिरागम' हा पहिला काव्यसंग्रह. त्यातील काही कल्पना न कळल्यामुळे आणि काही शब्द क्लिष्ट वाटल्यामुळे त्यांच्या समग्र काव्याचीच चेष्टा करायला आमच्यासारखी नवख्या उत्साहाची थोडी मंडळी उच्छृंखलपणे उद्युक्त झाली. पण

विचारांती हा वेडेपणा सोडून देण्याचा शहाणपणा दाखवला आणि तेच योग्य झाले नाहीतर 'वाङमयीन महात्मता' लिहिणाऱ्या या महान लेखकाची चेष्टा करण्याचा तो केवढा पोरकटपणा झाला असता !

आणखी एका लेखकाचा उदय अगदी जवळून न्याहाळायला मिळाला. तो लेखक लवकरच एका साप्ताहिकाचा संपादक झाला. त्यापूर्वीच तो लेखक म्हणून ओळखला जाऊ लागला होता. अत्यंत महत्त्वाकांक्षी असल्यामुळे 'स्ट्राईक टेरर' या ब्रीदाला अनुसरून तो अतिशय हिरीरीने लेखन करी. वाचन जबरदस्त आणि कष्ट घेण्याची विलक्षण तयारी. कामाचा झपाटा आणि नेहमी झपाटल्यासारखे वागणे बोलणे! काम म्हणजे लेखन चोख. त्यामुळे कमीत कमी कष्ट करून अधिकाधिक लोकप्रिय होणाऱ्या आणि असणाऱ्या लेखकांबद्दल मनातून भयंकर तिटकारा. डोक्यात एखादी कल्पना आली की, तिला पोषक असणाऱ्या ग्रंथांचे वाचन सुरू. वाचन संपताच भराभर एकटाकी मजकूर तयार. मध्ये काही अडथळा आला तरी पुन्हा बैठक मारून मागील शब्दावरून पुढील शब्द, शब्दापुढे शब्द - लेख तयार! 'विनोद जमत नाही तुम्हाला', असे कोणी म्हटले की, विनोदी लेखनास सुरुवात! तुम्हाला काय गोष्टी लिहिता येणार? असे कोणी डिवचले की, एकदम १ - २ - ३ कथासंग्रह छापून तयार! अशी एकूण जिद्द आणि लेखनाचा सपाटा! तशीच वृत्ती अतिशय लहरी - मुडी, बरीचशी माधव ज्यूलियन यांच्याप्रमाणे. अंगात पिशाच्च किंवा समंध संचारल्याप्रमाणे माधवराव जसे दिवसन् दिवस डोक्यावरून पांघरूण ओढून घेऊन झोपून राहात, कुणाशीही काहीही बोलत नसत त्याच जातीची 'लहर' याही लेखकाला बरेच वेळा येत असे! उत्साह असला तरी जशी सीमा नसे तशी त्यांच्या औदासीन्यालाही मर्यादा ठाऊक नव्हती! लघुकथा, टीका, प्रवासवर्णन, तत्त्वचिंतनात्मक लेखन, व्यक्तिविषयक लेख आणि इतर अनेक प्रकारचे ग्रंथ किंवा पुस्तके लिहिणारा हा लेखक आज एक मान्यवर ज्येष्ठ आणि श्रेष्ठ पत्रकार व ग्रंथकार आहे. याचे नाव अर्थातच प्रभाकर पाध्ये.

आत्ताचे आपणा सर्वांना ठाऊक असणारे टीकाकार परिणतप्रज्ञ 'वा. ल.' आणि तेव्हाचे थोड्याच व्यक्तींच्या ओळखीचे असे श्रीयुत वामन लक्ष्मण कुलकर्णी ही अगदी दोन भिन्न व्यक्तित्त्वे वाटावीत इतके अंतर त्यांच्या बहिरंग अंतरंगात होते! धोतर, कोट असा अगदी साध्या वेषातले वा. ल. कुलकर्णी गप्पा मारायला किंवा वाङमयीय चर्चा करायला येत - पण बहुधा ते श्रोत्याचीच भूमिका बजावीत असत. आणि त्यांच्या मुद्रेवरचे भाव अबोल, गंभीर व उदास असत. हे वाचून आश्चर्य वाटेल, नाही?

आणखीही काही लेखक-लेखिकांबद्दल लिहिण्याजोगे बरेच आहे. पण लेखिकांपेक्षा लेखकांसंबंधी मला जो एक निराळाच अनुभव आला, तो सांगण्यासारखा आहे. कदाचित कुणाला तो मनोरंजकही वाटेल! मला माहीत असलेल्या लेखकांपैकी बहुसंख्य लेखकांना अश्लील बोलण्याची 'खुमखुमी' असे. त्यांची बैठक जमली रे जमली की, चविष्ट चावट गप्पा किंवा कोट्या - प्रतिकोट्या अहमहमिकेने सुरू होत. असे कितीतरी किस्से किंवा विनोद मला अजूनही आठवतात. असल्या गावगप्पात रस घेऊन हास्याचे मजल्यावर मजले उठवणारे हे लेखक आपापल्या क्षेत्रात अतिशय नावाजलेले आणि लोकप्रिय होते. तसेच ते आजही आहेत. पण आज मात्र ते स्कॅन्डल्समध्ये

फारसे रमताना दिसत नाहीत. विशिष्ट वेळी विशिष्ट स्कॅन्डल त्यांना जरूर आठवते, 'पण जाऊ द्या झालं.' असे म्हणून किंवा असा भाव चेहऱ्यावर आणून हे वयस्क लेखक सात्त्विक गोष्टी करू लागतात.

माझ्यासारख्या अवलोकन करणाऱ्या व्यक्तीला मात्र या एकूण बदलाची गंमत वाटते. आणि असे मनात येते की, कदाचित हा या लेखकांच्या वाढत्या वयाचाही परिणाम असेल.

# आमच्या जीवनातील काही सुख सोहाळे

''आमच्या जीवनातील'' या शब्दप्रयोगामागे कोण आणि कोणता काळ उभा आहे, हे स्पष्ट करण्याची आता काही तशी आवश्यकता नाही. 'लाल त्रिकोणा'च्या फार फार पूर्वीचा तो काळ, ज्या काळी, ऐस-पैस चौसोपी वाड्यात मुलींचा सारा जन्म व्यतीत होई, त्या वेळच्या या गोष्टी. 'मुलगी' काही अगदीच नकोशी झालेली नव्हती त्यावेळी. विशेषत: पहिल्या मुलीच्या पाठीवर मुलगा झाला किंवा पहिल्या मुलीचा जन्म पहिल्या मुलाच्या मागोमाग झाला तर ती मुलगी साऱ्या घरा-दाराच्या कौतुकाचा विषय होऊन राही. या 'दोन्ही प्रकारच्या' मुलींच्या भाग्याचा अनुभव मी आमच्या एकत्र कुटुंबात घेतलेला आहे आणि माझ्या या साक्षात प्रतीतीस मी प्रातिनिधिक मानले तर, मला वाटते, ते फारसे चूक होणार नाही.

'पहिल्या वहिल्या' मुलीस - 'पहिली बेटी धनाची पेटी' समजले जाई. तिला 'धनाची पेटी' का म्हणत, ते मला मात्र अजूनही नीटसे उमगलेले नाही. तथापि तिचे गृहातील आगमन फारसे दु:खदायी नसे, हे नक्की. पहिली मुलगी आईच्या हाताखाली काम करण्यास लौकरच उपयोगी पडेल आणि 'दाम करी काम' या चालीवर पण उलट, 'काम वाचवी दाम' असा काही हिशेब त्या काळी घरच्या वडीलधाऱ्या स्त्रिया करीत असत किंवा काय, कोण जाणे! पण तिच्या पाठीवर मातेला जर का पुत्ररत्नाचा लाभ झाला, तर मात्र त्या प्रथम कन्यारत्नाला कुठे ठेऊ अन् कुठे नको असे साऱ्यांना होऊन जाई!

त्याच्या उलट, प्रथम पुत्ररत्नाच्या पाठीवर कन्यारत्नाचा लाभ झाला तरी घरी - दारी आनंद होत असे. आणि तिच्या पाठीवर पुन्हा पुत्रलाभ झाला तर मग काय विचारता? सर्व कुटुंबाची ती 'ताई' म्हणवून मिरवू लागे. तिच्या कोड-कौतुकास कसलीच सीमा राहात नसे! 'ताई' कशी हसते, कशी चालते, कशी बोलते - डोलते, कशी सुरावर रडते - असेसुद्धा तिचे नाव सर्वांच्या तोंडी असे. या 'बालनायिकेचे' सुख मीच स्वत: प्रत्यक्ष उपभोगलेले आहे. 'अष्टवर्षा भवेत कन्या' या न्यायाने ही बालिका 'कन्या' या पदवीस पाहोचेपर्यंत तिच्या चिमुकल्या जीवनात एक सुंदर वसंतकाल डोकावत असे. त्यावेळी तिचे वय तीन वर्षे इतके होऊन तिला एक प्रकारचे गोंडस रूप प्राप्त होई आणि ते विशेष खुलवण्याचे खास कार्य त्या बालिकेच्या आत्याबाईकडे येई. अतिशय उत्साहाने आणि आनंदाने आत्याबाई या कामास लागे आणि लवकरच जरीच्या हिरव्यागार खणाची परकर - चोळी, गळ्यात हिरव्या काचेच्या मण्यांची, मध्ये सोन्याचा करमरा मणी असलेली दूड, कानातले डूल आणि काजळ-कुंकवाच्या डब्या घेऊन ती आपल्या लाडक्या भाचीच्या भेटीस

येई. हे सगळे वस्त्रालंकार लेवून ही छोटी मूर्ती वडीलधाऱ्यांना खाली वाकून नमस्कार करायला इकडून तिकडे दुडूदुडू धावत सुटे. तिला सर्वजण आळीपाळीने उचलून कडेवर घेत आणि संध्याकाळी तिची आजी - आई किंवा आत्या तिच्यावरून मीठ - मोहऱ्या उतरवून चुलीत टाकीत आणि तो अंगारा तिच्या कपाळाला लावीत. सर्व घरांत 'दृष्टीचा' कोण वास सुटलेला असे! जो तो म्हणे, 'काय वास सुटलेला आहे! खरंच हो - बछडीला दृष्ट लागलीच असती. बरं झालं, दृष्ट काढली ते - '

'ताई' च्या बालजीवनातील हा अगदी सोनेरी सुखसोहळा. ती आठ वर्षांची झाली की, तिला तिची आजी किंवा आई सुंदरशी साडी नेसवीत आणि नाकात डाव्या बाजूला एक मोरणी किंवा चमकी चमचम करू लागे. माझ्या बाबतीत माझे हे सोपस्कार चालू असताना माझ्या आईने माझ्याबद्दल काढलेले प्रसंशोद्गार मला आज स्पष्टपणे कानात घुमल्यासारखे वाटत आहेत. 'आमच्या ताई आज काय पण छान दिसत आहेत' - हे ते आमच्या आईचे वाक्य, - मला वाटते, ते वाक्य पहिले, तसेच शेवटलेही असावे. कारण, आपल्या मुलांच्याबद्दल 'बरे' असे काही उघडपणे बोलण्याचा तो काळ नव्हता. एकत्र कुटुंबात आपल्या सगळ्यांसमोर मुलांना वेळी - अवेळी धपाटे घालणे, रागावणे, किंवा शिव्या देणे हेच योग्य किंवा हेच आईचे आपल्या मुलांच्या बाबतीत एकमेव कर्तव्य त्या काळी समजले जाई. साहजिकच, आईचा गोड शब्द चारचौघांसमोर कानावर पडणे ही मुलांना मोठी पर्वणी वाटे!

त्याकाळी आणि अजूनसुद्धा काही ठिकाणी ब्राह्मणांच्या, - विशेषत: कोकणस्थ ब्राह्मणांच्या घरी, लग्न - कार्यानंतर किंवा मुंजबारसे असले काही समारंभ झाले म्हणजे 'बोडण' भरण्यात येत असे. त्यावेळी तीन किंवा पाच सवाष्णी आणि एक कुमारिका यांना आमंत्रणे देत. या प्रकारात कुमारिकेचा मान मोठा. कारण तिला देवीची प्रतिमाच समजत. बोडण कालवताना घरची कर्ती सौभाग्यवती एकामागून एक असे दही, दूध, मध, साखर अशी पंचामृताची भरलेली भांडी मधल्या परातीत रिकामी करी आणि अखेर त्या कुमारिकेला विचारी की, 'धालीस का ?' कुमारिकेला या प्रश्नाचे उत्तर होकारार्थीच द्यावे लागे, म्हणून घरून निघतानाच तिची आजी किंवा आई तिला बजावून सांगत असे की, 'तुला धालीस का ?' असे विचारले तर 'हो' म्हण, बरं का!' - बरोबरच आहे. ती जर तृप्त झाली नाही तर घरातले सगळे 'पंचामृत' संपून शेजारून ते मागून आणण्याची वेळ घरच्या मालकिणीवर येईल ना!

या वेळचा कुमारिकेचा थाट आणि महत्त्व सर्वांना जाणवे. सोवळ्यातला म्हणून रेशमी परकर चोळीचा पोशाख आदी कुमारिकेची लेणी लेवून हातात पाण्याची पंचपात्री घेतलेली ती बालदेवतेची मूर्ती फारच सुंदर दिसे. आता हा थाट एक वेळ पहायला मिळेल. पण ते सोवळे ?

यावरून आठवले, खरे म्हणजे, 'हरतालका' हा व्रत - सोहोळा वास्तविक कुमारिकांचाच. पण 'सखी पार्वती' यांच्या पूजेमध्ये त्यांना पूर्ण मज्जाव असे. सुवासिनींची पूजा आटोपल्यानंतर मागाहून कुमारिकांनी त्या चौरंगावरील पाना - फुलांच्या राशीवर केवळ हळद - कुंकू आणि तेही दुरून वाहण्याची उदार परवानगी असे. अद्यापिही हीच परंपरा चालू असावी! पण माझ्या मताने

कुमारिकांचा या बाबतीत एक फारच मोठा फायदा असे. आणि तो म्हणजे त्यांना फराळाचे खाण्याची पूर्ण मुभा असे हा. सुवासिनी मात्र सबंध दिवस निर्जळी उपास करीत आणि रात्री १२ वाजता रुईचे पान चाटून हरतालिकेच्या व्रताची सांगता करीत. खारकांची खीर, शहाळ्यांचे पाणी, इतर बरीच फळफळावळ वाटल्यास साबुदाण्याची खिचडीसुद्धा कुमारिकांना मनसोक्त खाता येई. हा एक त्यांच्या जीवनातील सुग्रास खाद्य - सोहोळाच म्हणता येणार नाही का ?

लहानपणीच्या भाऊबीजेची तर कोण गडबड आणि गंमत. छोटीशी बहीण आपल्या पाठच्या किंवा वडील भावाला सकाळपासून सारखी खुशीत ठेवण्याचा प्रयत्न करीत असे. त्या दिवशी साखरझोपेतून त्याला जागवण्याचे काम तिचे. मग त्याला रंगीत पाटावर बसून, त्याच्या सर्वांगाला सुगंधित तेल लावून ती त्याला लहानशा तांब्यातून अभ्यंगस्नान घाली. गोड-धोडाचे जेवण अर्थात आईच्या हातचे. पण संध्याकाळी पुन्हा भाऊरायाला सभोवती रांगोळी घातलेल्या पाटावर बसवून त्याला ती हसत - हसत ओवाळी आणि बंधुराज वडिलांनी दिलेला रुपया ताईच्या तबकात टाकून उठून चालायला लागे. अर्थात ताई - भाऊ दोघांचाही पोषाख नवा आणि छानदार असे आणि ओवाळणीचा समारंभ बहुधा देवघरात साजरा होई. भावाबहिणीचे हे प्रेम स्त्री-गीतात अमर झालेले आहे. भाऊबीजेच्या दिवशी आजही भावा-बहिणीतील भौगोलिक अंतर पोस्टखाते क्षणात दूर करते.

करवली किंवा पाठराखीण म्हणूनही कुमारिकेचा बहुमान असे. अजूनसुद्धा मला वाटते, कुठे कुठे 'करवली'ची उपस्थिती असते, पण 'पाठराखीण' म्हणून नववधूबरोबर जाण्याचे आता काही कारणच नसते.आजची प्रौढ नवरी सासरच्या नव्या जमान्यात स्वत:चे रक्षण करण्यास पूर्ण समर्थ असते. माझ्या लहानपणी मी माझ्या चुलत बहिणीचा पाठराखीण म्हणून तिच्याबरोबर तिच्या सासरी गेले होते. त्यावेळी माझा झालेला सन्मान व कौतुक मला अजूनही आठवतो. तिच्या सासरहून परत येताना मला एक सुंदर साडी-चोळी मिळाली होती.

कुमारिकेच्या जीवनातील हे काही सोनेरी सुखसोहळे हळूहळू कमी होऊ लागले. कारण समाजातील वैचारिक बदल आणि कुमारिकांचे वाढते वय. लग्नानंतर तरुण स्त्री अनेक सुख - सोहळ्यात रमून जाई. व जवळजवळ लग्नानंतरचे पहिले संपूर्ण वर्ष सासरी आणि माहेरी तिची हिरवी साडी, हिरवा चुडा आणि तिचे आगमन सुचविणारी, मृदुनाद उत्पन्न करणारी जोडवी यांचे कोडकौतुक होत असे. शिवामूठ आणि मंगळागौर यांच्या वेळी होणारे तिचे सुभग दर्शन, तसेच संक्रांतीला सुगडे घेऊन घरोघरी जाणारी तिची लाजरी कमनीय मूर्ती २५ - ३० वर्षापूर्वी दुर्मिळ होऊ लागली होती. वैचारिक क्रांतीच्या लाटेवर आम्ही त्यावेळी आरुढ झालेलो होतो. या सर्व गोष्टीतील अंध धार्मिकता आम्हाला सहन होत नव्हती. तसेच नवपरिणीत वधूच्या जीवनात लवकरच अवतीर्ण होणाऱ्या बालकांचा आगामी सन्मान ऊर्फ डोहाळ-जेवण किंवा नंतरचे बारसे, यावेळी त्या नूतन गर्भवतीचा किंवा मातेचा सोनेरी सुख - सोहळा काय वर्णावा ? हे लिहीत असताना ४० - ४५ वर्षापूर्वी पाहिलेला एक न्हाणवलीचा 'मखरातील सोहोळा' आज नजरेसमोर येत आहे. शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून तिच्यासाठी ताटे भरभरून खाद्यपदार्थ येत. मुलींचे विवाहाचे वय वाढले आणि हा साहोळा काहीही

खळखळ न करता नामशेष झाला !

पण त्यावेळचे मुली आणि स्त्रिया यांचे सार्वजनिकरित्या मिरवण्याचे सोनेरी सुख-सोहोळे मुख्यत: दोन; एक घरची कोणाची तरी मुंज आणि दुसरा म्हणजे कोणाचे तरी लग्न हे होते. मुंजी मध्ये अक्षत, मातृभोजन प्रत्यक्ष व्रतबंधन आणि रात्रीची भिक्षावळ या चारी - पाची प्रकारांत मुली, प्रौढा आणि वृद्धा अगदी रंगून गेलेल्या - खूश असत. लग्न - समारंभात तर या सर्व वयोमानाच्या स्त्रिया आपले वय विसरून प्रसन्नतेने, उत्साहाने आणि उत्सुकतेने अगदी फुलून गेलेल्या असत, आणि या भावनांनी त्या साऱ्या आसमंतही भरून टाकीत. काय तो 'विहिणीचा कलकलाट' गोविंदाग्रजांना उगीच नाही या विषयावर कविता सुचली !

चार-चार, आठ-आठ दिवस चाललेल्या या लग्न-समारंभाची सांगता मांडव-परतण्याने होत असे आणि सुरुवात 'मुलगी पाहण्यापासून होई. मला माझ्या काकांचे लग्न आठवते. बी. ए. एलएल. बी. देखण्या आणि घरंदाज अशा आमच्या बाळकाकांना शेकड्यांनी मुली सांगून आल्या; त्यातील काही जणींनाच 'पाहाण्याचा' कार्यक्रम आमच्या घरी पार पडला. एक - दोघीच बऱ्या होत्या. बाकी आपल्या होत्या अशा-तशाच. त्या दोघींपैकी एकीला वडील मंडळींनी पसंत केले. ती ब्रिचारी उकीडवी अशी खाली मान घालून आणि पदर पुढे ओढून घेऊन बसली होती. आम्ही मुली दाराआडून वाक-वाकून तिच्याकडे पाहात होतो. ती घाबरली आहे की, लाजली आहे, याबद्दल एकमेकीत कुजबूज करीत होतो. आपल्यावरही हा असा प्रसंग लवकरच येणार म्हणून घाबरलो होतो ( की आनंदलो होतो ? ) इतक्यात 'मुलीच्या' हातात माझ्या आईने पेढ्याचा पुडा दिला आणि अशा रीतीने सर्वांची संमती प्रदर्शित केली. ती मुलगी आणि तिच्याबरोबर आलेली तिची नातेवाईक मंडळी उल्हासाने उठली आणि मार्गस्थ झाली.

पण त्या काळच्या मानाने आमच्या काकांनी एक अपूर्व धाडस करून या सर्व सुंदर प्रसंगावर बोळा फिरवला आणि स्वत:च्या पसंतीची गावातलीच एक मुलगी निश्चित केली ! काही असो. आमच्या काकांचे लग्न तर अखेर ठरले ! आता सारी मजाच मजा ! पहिला समारंभ देवाला अक्षत देण्याचा. ११ - १२ वर्षांची आमची स्वारी नाकात नथ घालून सर्वांच्या अग्रभागी विराजमान झाली आणि मिरवणूक निघाली. समोर ताशे - वाजंत्रीतर सर्व लहानमोठ्या नवीन लुगडी नेसलेल्या व अलंकारांनी सजलेल्या स्त्रिया आणि मागे उपरणी सावरणाऱ्या पुरुषांचा घोळका आणि एकसारखा गलका. दणक्यात निघणाऱ्या वरातीमध्ये आणि लग्न - मुंजीतल्या इतर मिरवणुकीत याचीच खूप मौज लुटावयास मिळे. आम्हा लोकांचे हे स्त्रीदाक्षिण्य जन्मजात आहे. Ladies firstअगोदर बायका मागाहून पुरुष ही रीत आमचीच आहे. ब्रिटिशांकडून आम्ही ही पद्धत स्वीकारली नसून त्यांनीच ती आमच्याकडून आत्मसात केली असली पाहिजे.

प्रत्यक्ष लग्नसमारंभात लग्न लावून 'वाजवा रे वाजवा' झाले की, खऱ्या 'मानापमान' नाटकाचा प्रयोग सुरू होई. रुसवे - फुगवे, वेळेवर जेवायला न येणे, कुणाचे तरी काहीतरी चोरीस जाणे, टोमणे मारणे इत्यादी लहान - मोठे प्रवेश वर-पक्षाकडून सादर केले जात; आणि अजीजी, धावाधाव, प्रसंगी डोळ्यात अश्रू इत्यादी प्रकारांनी वधूपक्ष त्यांचे स्वागत

करी. विहिणींना तोंड धुण्याचे पाणी, त्यांची रास - न्हाणी, त्यांना पायघड्यांवरून मिरवीत नेणे, - असले आदर-सत्कार वधूपक्ष वरपक्षाचा करीत असे. दरम्यान इकडे वधू-वर ( लवंगांच्याही ) विड्या तोडणे, सुपाऱ्या लपविणे इत्यादी ( शृंगार ) खेळात, - भोवताली गर्दी असतानाही मग्न असत. एकमेकांच्या अंगावर चुळा टाकून मजेत चाललेले वधूवरांचे ( खाजगी ) स्नान पहाण्यास आबालवृद्धांची झुंबड लागे. वधूच्या अंगाची ओली हळद आणि तिच्यावर पडलेले तेज:पुंज कळसवणी अनेकांच्या डोळ्याचे पारणे फेडीत असे. अशा प्रकारच्या लग्नकार्यातील ही गोष्ट मोठीच लक्षणीय मानावी लागेल. काम - क्रोधादी सगळ्या षड्‌रिपूंचे प्रदर्शन चार - चौघांच्या साक्षीने होई आणि त्यात कुणाला काही म्हणून गैर वाटत नसे. तिथे कसलाही आडपडदा नसे. घराच्या दारे - खिडक्या यांना झुळझुळीत पडदे लावण्याची कल्पना प्रौढ वधू - वरांबरोबर जन्मास आली असावी. आगरकरांनी प्रौढ आणि प्रीति-विवाहाचा पुरस्कार केला तसे, हे सगळेच सुख - सोहोळे संपुष्टात आले !

सुधारणेचा सूर्य सामाजिक क्षितिजावर तळपू लागला आणि त्याच्या प्रकाशात, - बालिका, कुमारिका, नववधू, गर्भवती, माता आणि सासू अशा विविध रूपांनी नटलेले त्या वेळच्या स्त्री - जीवनातील दवबिंदू हळूहळू वातावरणात विलीन होऊ लागले.

◆

# पळसाला पाने किती ?

वसतिगृहात राहाण्याची मला लहानपणापासून कोण आवड ! आमच्या गावातील काही मुलींना त्यांच्या आई-वडिलांनी शिक्षणाकरिता परगावी वसतिगृहात ठेवले होते. मला वाटे, या मुली किती भाग्यवान् ! आमचे आई - वडील कसले ? साधे कुठे मंगळागौरीच्या जागरणाला गेले तरी खेळ संपता संपता, - कधी तो अर्धवट तसाच टाकूनसुद्धा घरी परत यायला लावीत. संध्याकाळी कुठे बाहेर जाऊ देत नसत. हरतालका किंवा श्रावणातला मंगळवार हाच काय तो अपवाद. वसतिगृह असलेल्या मुलींच्या हायस्कूलमध्ये मी जाऊ लागले, आणि माझी ती जुनी इच्छा पुन्हा उसळी मारून वर आली. पण करणार काय ? आमचे घर शाळेपासून अगदी हाकेच्या अंतरावर, मग मला बोर्डिंगांत कोण ठेवणार ? पण आला, तोही सुयोग आला. त्याचे असे झाले, इंग्रजी चौथीत असताना वार्षिक परीक्षेत मला गणित विषयांत फार, - म्हणजे फारच कमी मार्क मिळाले, त्यामुळे माझा नेहमीचा पहिला नंबर हुकला. आमच्या घरी आमच्या आठव्या भावंडाचा नुकताच जन्म झाला होता, म्हणून आमच्या हेड मिस्ट्रेस बाईंनी आमच्या आईला असे सुचविले की मला काही दिवस वसतिगृहात ठेवावे, म्हणजे मला अभ्यासाला पुरेसा वेळ मिळेल. कसे कोण जाणे, पण आई - वडिलांनी ही गोष्ट मनावर घेऊन पुढील वार्षिक परीक्षेच्या वेळी थोडे दिवस मला वसतिगृहात राहू दिले. माझा आनंद गगनात मावेनासा झाला. संध्याकाळी बावरून मी इकडे तिकडे पाहू लागले. खरेच का मी रात्रीपण इथे राहाणार ? डायनिंग हॉलमधील जेवणखाण शिस्तशीर आटोपून आम्ही आपापल्या वर्गात Home Workकरायला निघून गेलो. निजण्याची वेळ होताच घंटेप्रमाणे Dormitoryमध्ये जाऊन स्वत:च्या पलंगावर पहुडलो. तोच दुसरी आणि दिवसातील शेवटची घंटा वाजली. दिवे मालवले गेले आणि - सर्वत्र सामसूम झाली. पावलांचा यत्किंचितही आवाज होऊ न देता मेट्रनबाई हातात टॉर्च ( किंवा कंदील ) घेऊन roundघेण्यास निघाल्या, त्यांना एक बिछाना रिकामा दिसला. त्यांनी टॉर्चचा प्रकाश इकडे - तिकडे फिरवला आणि मनाशी काहीतरी नोंद करून त्या पुढे सरकल्या. सकाळी त्यांच्याकडून कोणालासे बोलावणे आले आणि त्याची कुजबूज ताबडतोब सर्वत्र सुरू झाली ! मला हा असला प्रकार संपूर्णपणे अज्ञात होता. आज एवढे काय गूढ, नवल वर्तले होते बरे ? मला काहीच समजेना आणि विशेष म्हणजे काही समजून घेण्याचा मी तसा प्रयत्नही केला नाही. एकंदर वातावरणावरून मला एवढा मात्र बोध निश्चित झाला की, अधून - मधून 'असली' रहस्ये उघडकीस येत असत. मी मनात

म्हणे, या मुली बोर्डिंगचे नियम मोडताच कशा आणि कशाला ? कायदा, मानसशास्त्र, नीतिशास्त्र वगैरे गंभीर विषयांची तोंडओळख व्हायला अजून कितीतरी अवकाश होता. जेवायला बसले म्हणजे मी घरच्या सवयीप्रमाणे एक मांडी घालूनच खालच्या मानेने जेवीत असे. सकाळी किंवा दुपारी चहा किंवा दूध पिताना चुकून खाली चहा-दुधाचे थेंब पडले तर मी ते लगेच हाताने पुसून टाकीत असे. पण असल्या माझ्या या 'कृती' अगदी मोजक्या आणि मोठ्या मुलींना फार कौतुकास्पद वाटत, - तर बहुसंख्य बोर्डर्स तिकडे तुच्छतेने बघत - आणि माझ्या बावळटपणाची कीव करीत. त्या बहुधा गटागटाने वावरत आणि इतर मुलींना आपल्या 'कळपा' जवळ फिरकूही देत नसत. मग माझ्यासारख्या नव्या कोकराची काय कथा ? कुठे गावात, बाहेर जाण्याची नोटीस फिरली रे फिरली की, अगोदर साबण्याची पेटी आणि टॉवेल घेऊन या धावत सुटत आणि थोड्याच नळांपैकी एखादा नळ पकडून तासन् तास् तोंडे स्वच्छ स्वच्छ धुवीत. रस्त्याने दोघी-दोघींच्या ओळीने जावे लागे, तेव्हा मैत्रिणीचाच हात धरण्याकरिता कोण धडपड चाले ! वाटेने सारखी कलकल - इतकी की, बरोबर आलेल्या बाईंनी शिटी - फुंकण्याने आसमंत दणाणून जाई ! कुठे जायचं आहे, काय करायचं आहे, इकडे बहुतेकींचे दुर्लक्षच असे. मग त्यांचे एवढे लक्ष कशाकडे केंद्रित झालेले असे कोण जाणे !

मध्यप्रांत - वऱ्हाड येथील मुलींचे ते सरकारी हायस्कूलचे वसतिगृहात नामांकित मोठ्या आणि अधिकारी वर्गाच्या मुलींची संख्या अधिक. साहजिकच तेथील लिखित-अलिखित नियम विशेष कडक आणि शिस्त कठोर पण काही मुली मेट्रनच्या हातावर बघता बघता तुरी देत, - एकूण मी सर्व अनुभव घेतला आणि अखेर या निर्णयाप्रत आले की, घरची आई-आजीची कडक बोलणी आणि वडिलांची पोलिसी शिस्तच चांगली ! नको तो मोकळेपणाचा, स्वातंत्र्याचा आणि खेळीमेळीचा देखावा !

मॅट्रिक पास झाल्यानंतर मात्र मी आपल्या पायांनीच येरंडवणे येथील वसतिगृहात दाखल झाले - पुण्यामध्ये गावात राहाण्याची सोय असूनसुद्धा तशा एक - दोघी काही दिवस गावातून इथे लांबवर येतही होत्या. पण माझी मुळातली हौस आणि पूर्वानुभवाने आलेले किंचित् शहाणपण, शिवाय आता मी शाळकरी मुलगी राहिले नसून माझ्यावर शोभणारा 'कॉलेज-कन्या' हा छाप, - इत्यादी माझ्या दृष्टीने संयुक्तिक वाटणाऱ्या कारणांनी मी तीनही वर्षे इथेच राहाण्याचे ठरवले. पण कसचे काय अन् कसचे काय ? 'उंच वाढला एरंड ! तरि का होईल. इक्षुदंड' या न्यायाने अस्मादिकांचे वय वाढले - तरी ते नाइलाजानेच. स्वभाव व गुण जिथल्या तिथेच राहिले होते. तेथील विशेष धीट किंवा Non - conventionalमुलींना मी एक खास चेष्टेचा विषय पुरवला, ( त्याबद्दल खरे पाहाता त्यांनी माझे आभार मानायला हवे होते, ) - वेळी - अवेळी माझ्यावर शर-संधान करून त्यांनी मला पुरेवाट करून सोडले. त्याचा परिणाम अखेर इतकाच झाला की, आमच्या छोट्याशा वसतिगृहात ज्यावेळी दोन क्लबस् करण्याचा सुयोग आला, त्यावेळी Common

Secretaryम्हणून एका प्रोफेसरांनी माझे नाव सुचवले आणि सर्वानुमते ते मान्य झाले. हा पहिला मान शेवटचाच ठरला, कारण दुसरा क्लब लवकरच संपुष्टात आला, ही गोष्ट अलाहिदा !

राहत्या मुलींची संख्या अल्प असतानाही आजच्या भाषेत क्यू लावणे ऊर्फ हातरुमाल, पेन्सिल वगैरे वस्तूंनी 'जागा धरणे', इतरांनी ते न मानणे, असले प्रकार सर्रास चालत. मी कॉलेजमध्ये प्रवेश केला, त्यावेळी एकूण मुली वीस किंवा बावीस, फारतर असतील. तिसऱ्या म्हणजे शेवटच्या वर्षात तर केवळ दोनच सुकन्या होत्या. पैकी एक विवाहित आणि दुसरी विधवा. अशाही परिस्थितीत मानवी स्वभावाचे अनेक नमुने तिथे पाहाण्यास व अनुभवण्यास मिळाले. उगीचच्या उगीच तास बुडविणे, हुशार मुलींमध्ये स्पर्धा किंवा मत्सर निर्माण करणे, प्रेमांत पडणे, प्रथम पत्नी हयात असतानाही त्या पुरुषावर प्रेम करणे, आपल्याला हे काहीच साधत नाही म्हणून खंत करणे किंवा आडून आडून त्यात 'रस' घेणे, गैरसमज पसरविणे तसेच भांडणे, अबोला धरणे कितीतरी गमतीजमती सारख्या चालू असत. अंगधुण्याऐवजी, नव्या पद्धतीची आंघोळ मुली याच सुमारास शिकल्या. 'सजातीय - प्रेमा' ची दृश्ये इथेही दुर्मिळ नव्हती - उलट त्यात एक प्रकारचा राजरोसपणा होता. कोणी एक विद्यार्थिनी कथा कीर्तनांत प्रवीण होती. पूर्वरंगानंतर आणि उत्तर रंग सुरू होण्यापूर्वी तिच्या खास 'मैत्रिणी' तिला बुक्का लावून व तिच्या गळ्यात हार घालून तिला क्षेमालिंगन देत !

यावरून अर्थातच असे मानण्याचे मुळीच कारण नाही की, वसतिगृहाचे वातावरण सदासर्वकाळ असल्याच नकोशा वाटणाऱ्या भडक रंगांनी रंगलेले होते म्हणून ! तिथेही कित्येकदा नाजुक, सुंदर मनोहारी रंगछटा उमटत असत. याच ठिकाणी हॉलमध्ये वाचनालय होते. यशवंत, रत्नाकर, मनोरमा, मासिक मनोरंजन, किर्लोस्कर, स्त्री अशी मासिके, आणि विविधवृत्त, भाला, प्रगती, ज्ञानप्रकाश, केसरी इत्यादी वृत्तपत्रे यांचे साभिप्राय आणि साभिनिवेश वाचन इथेच चाले. कम्युनिझमची आणि माझी ओळख याच ठिकाणी झाली. इथेच काव्य -गायने रंगत, मित्र-मैत्रिणीच्या भेटी होत, हास्य - विनोदाला भरते येई. आम्ही एक हस्तलिखित मासिक काढीत असू. त्यामध्ये एखादी विद्यार्थिनी 'चिमणीचे पोहे' सादर करी, तर दुसरी त्या पोह्यांना 'खमंग फोडणी' देई. दुसऱ्या एका विद्यार्थिनीने आपल्या लठ्ठ मैत्रिणीवर 'मोहिनी' नावाची एक विनोदी कविता केली होती. आम्ही एक दोन संघटनाही काढल्या होत्या. वसतिगृहाच्या छोट्याशा चौकात बॅडमिन्टनचा खेळ रंगात येई, 'Touch speaks volumes' असे एखादे ( ऐकलेले )रोमँटिक वाक्य एखादीच्या तोंडून सहज निघून जाई. याच चौकात आम्ही ring खेळलो आणि सायक्लिंगही शिकलो. त्यावेळचे ते वरचेवर जमिनीवर आपटणे आणि आरडाओरडा, हास्याचा कल्लोळ आजही कानात घुमतो आहे. स्व -संरक्षणार्थ लाठी - काठी आम्ही इथेच 'चालवली' आणि जंबियाचे वारही इथेच झेलले. लेझीम खेळलो. त्यावेळच्या 'यशवंत' मासिकांत

आमचा लाठी-काठी घेतलेला फोटो आजही पहायला मिळेल. पुण्याच्या गुलाबी थंडीत सकाळी उठून आम्ही लांब - लांब पळायला जात असू. फर्ग्युसन कॉलेजजवळून जाणारा कालवा आणि हिंगण्याच्या वाटेवरील कालवा यांत त्यावेळी केवढे तरी अंतर होते. पावसाळ्यात कालव्याच्या कडेकडेने हिंगण्याकडे जाण्यात किती Romanceहोता! तो दाट दाट गुडघा - गुडघा रुतणारा चिखल, टपोऱ्या काळ्या जांभळ्या जांभळांचा अंतरा-अंतरावर पडलेला सडा आणि अनंत तऱ्हेची रानफुलझाडे त्यात मधूनच कोसळणाऱ्या पावसाच्या सरी! मूर्तिमंत काव्यसृष्टीच जणू. रुक्ष वऱ्हाडातून आलेल्या मला या सृष्टी सौंदर्याने वेड लावले होते. आमच्या कॉलेजच्या भोवती थोडे थोडे दूर असे शुभ्र रानकुंदाचे ताटवेच्या ताटवे आम्हाला सतत बोलावीत असत. कॉलेजच्या बागेतही, छान छान फुलझाडे आणि छोटे छोटे लतामंडप होते. तिथल्या मालतीपुष्पांचे सुगंधाने भरलेले चषक किती मोहक दिसत. तशीच ती निळी लांब तुऱ्याची फुले आणि त्यांची ती घोसदार बारीक - गोल केशरी फळे! आमच्या आंबाड्यावर ही, नाहीतर ती फुले रात्रंदिवस दाटीवाटीने गर्दी करून बसलेली असत. (म्हणूनच मला वाटते, मधूनच एखाद्या राहत्या खोलीत साप डोकावत असावा) पण या सर्वांपेक्षाही एका अगदी बारीक छोट्या फुलांचा दर्दभरा गंध आणि त्याचे नाजुक सौंदर्य यांनी माझ्या मनात कायमचे घर केले आहे. आमच्या लहान चौकातील एका कोपऱ्यात एक अगदी एकुलती एक हळवी वेल होती. एक दिवस मी अगदी पहाटे उठून खोलीबाहेर आले, तो सारे आसमंत मला अनामिक सुगंधाने दाटले आहे, असे वाटले, म्हणून मी इकडे - तिकडे भराभरा फेऱ्या मारल्या आणि एकदम त्या वेलीजवळ माझी पावले थबकली. डोळे मिटून मी तो वास अंत:करणात साठवला आणि सहज डोळे उघडून वेलीकडे पाहिले - एक कळी माझ्याकडे पाहून हसत होती. ते सायलीचे फूल होते. हे रूप आणि गंध मला सर्वस्वी अनोखा होता.

मला जेव्हा जेव्हा या वसतिगृहाची आठवण होते तेव्हा तेव्हा पहाटे वेलीवर डोलणारे ते सुगंधी फूलच माझ्या मनात जागे होते!

नंतर जवळ जवळ अठरा-एकोणीस वर्षांनी मला पुन्हा वसतिगृहाची हवा खावी लागली. 'बोर्डी' हे गाव आणि विशेषत: तेथील समुद्रकिनारा खरोखर 'हवा खाण्याकरिताच' अगदी निरोगी म्हणून प्रसिद्ध आहे. तथापि हवा खायला जाणे आणि हवा खावी लागणे - यात महदंतर आहे. शिक्षकांकरिता चालवलेल्या येथील जीवन - शिक्षण केन्द्रात आलेला अनुभव निर्भेळ सुखाचा होता, असे मला तरी आज मागे वळून पाहाताना वाटत नाही. उखळात घातले तरी सात घाव चुकवणाऱ्या व्यक्ती इथेही होत्या. तथापि इथे स्त्री - आणि पुरुष शिक्षकांची वेगळी आणि व्यवस्थित सोय होती. यात शंका नाही. तसेच शिकवणाऱ्या प्राध्यापक वर्गासंबंधीही नाराजी वाटण्यासारखे काही नव्हते. शिक्षण-क्रम नवीन, - पण ठीक होता. प्रयोगावस्थेत होता. तथापि प्रौढ

आणि अनुभवी असा जो 'विद्यार्थी - विद्यार्थिनी' वर्ग होता त्यांची परस्परांशी असलेली वागणूक जितकी समंजसपणाची, सोशिक आणि सात्त्विक असावयास पाहिजे होती - तितकी ती दुर्दैवाने नव्हती. असा माझा तरी अनुभव आहे. अविवाहित प्रौढ, मिळवत्या कुमारिकांचे काही वेगळे नमुने जसे तिथे आढळले - तसे सापत्य गतधवांचेही. एकाने तर सहकुटुंब सहपरिवार मुक्काम ठोकला होता. त्याच्याही काही अडचणी असतील म्हणा ! पण गांधी तत्त्वावर चाललेल्या त्या संस्थेत मला ब्राह्मणद्वेषाचा आणि जातिभेदाचा दर्प असह्य वाटला. त्यापुढे द्वेष - मत्सर या गोष्टी म्हणजे 'किस् झाडची पत्ती !' काही विनोदी, व्यासंगी बहुश्रुत आणि कलाप्रेमी शिक्षक - शिक्षिका होत्या तरी परस्पर अविश्वासाने एकूण वातावरण गढूळलेले असे. विचार करताना मला आता असे वाटते इतक्या प्रौढपणी घर - दार आणि मुले - माणसे लांब ठेवून एक वर्षभर असे या नवीन शिक्षणप्रयोगात, - केवळ नोकरी निमित्त घालवणे भाग पडल्यामुळेच साऱ्यांची मने जरा त्रासिक, कटू झाली असावी. परंतु

येथील एक अनुभव मात्र खराच श्रवणीय आहे. ऑक्टोबरच्या सुरुवातीचा आठवडा गांधी जयंतीनिमित्त शैक्षाणिक आणि सोज्ज्वळ कार्यक्रमांनी परिपूर्ण असा आखण्यात आला असताना, - नेमक्या तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी चोरट्यांनी माझ्या खोलीतून माझी तीन - चार कोरी अर्धवट कोरी अशी खास तलम इंदुरी लुगडी पळवली ! इकडे आमचा 'अहिंसा सत्य अस्तेय - याचा सारखा जप चालू होता आणि तिकडे स्तेयाचा प्रत्यक्ष पाठ होत होता. कोणी म्हणलं, बरे झाले - जीवन - शिक्षण मंदिरात शिक्षण घ्यावयाचे ते ( तसा नियम नसताही ) खादी परिधान करूनच घेतले पाहिजे. तिथे उंची सुंदर वस्त्रे आणावीच कशाला ? - खरे आहे. ते मला मनोमन पटले, म्हणून घरी स्वत:लाच शिक्षा करून घेतली. राजी -खुशीने पुढे वर्षभर मी अक्षरश: चिंध्या गाळल्या !

कुठेही जा, - अखेर पळसाला पाने तीनच !

◆

# संबळी

आमच्या घरी एक वेताची संबळी आहे. किती जुनी आहे मला ठाऊक नाही. मला आठवते त्याच्याही आधीपासून ती आमच्याकडे आहे एवढे खरे. केव्हातरी तिचा रंग कोऱ्या वेतासारखा शांत - संथ फिकट - पिवळा असेल. आता तो चिंचोक्यासारखा करपट - तपकिरी आहे. तिच्या झाकणाची बिजागर निखळली आहे. कडीचा कोयंडा निघून गेला आहे. धरायची कडी एका बाजूने सुटली आहे. पूर्वी आम्ही त्या संबळीत आमचे देव ठेवीत असू. पितळेची छोटीशी देवी, नागाच्या रुपेरी वेटोळ्यात उभा बसणारा बाण, स्फटिकाचा पारदर्शक सूर्य, नर्मदेतला तांबडा गणपती, गंडकीतला काळा शाळिग्राम, असे सगळे देव पूजा झाली की तीत बसत. पुन्हा दुसऱ्या दिवशी पूजेच्या वेळी बाहेर निघत.

मी सात-आठ वर्षांचा असताना एकदा केव्हातरी आमच्या वडिलांनी देवांसाठी नवी कोरी संबळी आणली, तेव्हा आई ती जुनी संबळी टाकून द्यायला निघाली. पण मी ती तिच्या हातातून हिसकून घेऊन पोटाशी घट्ट धरून ठेवली आणि तिला म्हटले, ''मला दे ती संबळी.''

''काय करायचीय् तुला ती ?'' तिने विचारले.

''हवीय् मला. आपलं हे - ते ठेवायला.'' मी उत्तर दिले.

तेव्हापासून ती संबळी माझी झाली. आणि मी तीत माझे हे - ते ठेवू लागलो. कुठून कुठून गोळा केलेल्या कितीतरी वस्तू मी तीत भरल्या. मला आवडलेल्या, मी गोळा केलेल्या, म्हणून एकत्र आलेल्या. ह्या पलिकडे त्यांचा एकमेकींशी संबंध नाही. अशा कितीतरी वस्तू आल्या, काही दिवस संबळीत राहिल्या आणि गेल्या. देऊन गेल्या, हरवून गेल्या, टाकून गेल्या. पण अजूनही कितीतरी आहेत. कधी संबळी उघडली म्हणजे दिसतात. आणि आपला आगापिछा माझ्यापुढे उभा करतात.

चर्की - बिल्ला खेळायचा, कडा घासून गोल केलेला; एक खापराचा तुकडा त्यात आहे. एका पायाने लंगडी करीत खालपासून वरच्या टोकाकडल्या टोपीसारखा चिंचोळ्या घरात तो तुकडा पायानेच ढकलीत न्यायचा. रेघेवर पाय पडला की डाव गेला. चर्की - बिल्ला खेळताना असे कितीदा डाव गेले असतील, कितीदा पाय मुरगळला असेल, कितीदा ढोपर फुटले असेल. त्याच्या खुणा काही नाहीत, पण तो खापराचा तुकडा मात्र तिथे आहे. राजवर्खासारखी सोनेरी झाक असलेला, गडद हिरव्या रंगाचा, कवचीसारखा कठीण असा. झिंगण्णाचा एकच पंख शिल्लक राहिला आहे. त्याच्या गळ्याला बारीक दोरा बांधून वर हवेत फेकला की, तो वरचे राजवर्खासारखी सोनेरी

झाक असलेले, गडद हिरव्या रंगाचे, कवचीसारखे कठीण पंख, आणि त्याच्याखालचे - अभ्रकाच्या पत्र्यासारखे पातळ पारदर्शक - पंख, भर्रकन् पसरून उडू लागायचा. उन्हात उडतानाची त्याची शोभा गुंग करायची आम्हाला. कधी दोऱ्याचे टोक हातातून सुटले की, तो उडून जाई आणि मग नुसते "आ" वासून पाहात राहावे लागे. झेंडूची दोन - चार पाने घालून आगपेटीत ठेवली की झिंगण्णा राहात असे. त्याला दुसरे काही खायला - प्यायला लागायचे नाही. पण पुष्कळदा तो दोन - चार दिवसांनी डबीतच मरायचा, किंवा दोरा हातातून सुटून उडून जायचा. वडिलांना हे असले निर्दयपणाचे खेळ आवडत नसत. ऐकले नाही म्हणजे एखादेवेळी त्यांच्या हातचा खट्टा मिळायचा. म्हणून मग त्यांना नकळत झिंगण्णाचा खेळ खेळावा लागे. त्यासाठी कितीतरी झिंगण्णा घेतले असतील. पण आता संबळीत त्यांच्यापैकी कुणाचा तरी पंख राहिला आहे. पण तो आठवण मात्र त्या सगळ्यांची करून देतो.

खेळायच्या काचेच्या गोट्या त्या संबळीत आहेत. गोट्यांच्या खेळासाठी घराशेजारच्या शेरीत आम्ही कितीतरी अगळ केले होते. ते सगळे आता गेले. पण त्या अगळांत पडलेल्या आणि त्यातून बाहेर निघालेल्या काही गोट्या माझ्या संबळीत आहेत. काही जिंकून मिळवलेल्या, काही विकत आणलेल्या, काही अदलाबदलीत घेतलेल्या. पण त्यातल्या अशा कोणत्या अन् तशा कोणत्या ते आता ओळखता यायचे नाही. वर्षानुवर्षे चरे पडल्यामुळे त्या आता आंधळ्या झाल्या आहेत. पण त्यांच्या पोटात रंगी-बेरंगी, वळणदार, प्रवाही रेषा आहेत, आणि त्या सुंदर आहेत, ते मला माहीत आहे. आणि कसे पाहावे ते माहीत असले तर तुम्हालाही त्या दिसतील. अनेक दुःखाकष्टांच्या आघातांमुळे उभे आडवे चरे पडले तरी एखाद्याच्या चेहऱ्यात मूळचा निर्मळपणा, खेळकरपणा, एकदम चमकताना जाणवतो ना ? तसे.

आणि माझ्याजवळ आगपेट्यांवरची चित्रे किती जमली होती ! शे-दोनशे तरी असतील. तीही संबळीतच होती. कोणाची आगपेटी रिकामी होत असली की, तिच्याकडे आशाळभूतपणे पाहात राहायचे. रस्त्यात, बोळात, उकिरड्यावर कुठेही चांगले चित्र असलेली आगपेटी पडलेली दिसली की, तिच्यावर झडप घालायची. ते चित्र पाण्यात भिजवून अलगद सोडवून घ्यायचे. टिपून पुसून वाळवायचे अन् संबळीत ठेवायचे. चित्रासाठी कुठेही घाणीत हात घालावा लागला तरी त्याचे काही वाटायचे नाही. आणि एखादे चांगलेसे चित्र मिळाले की, मोठी शिकार साधल्याप्रमाणे मित्रांजवळ बढाई मारायची.

त्यावेळी आगपेट्यांवर किती सुंदर चित्रे येत असत ! श्रीदेवी आणि भूदेवी अशा दोघी सुंदर बायकांना उजव्या मांडीवर घेऊन गरूडावर स्वार झालेला विष्णू; आकाशातून पावसाच्या सरींबरोबर अवतरणाऱ्या गंगेकडे नजर लावून आव्हानाच्या पवित्र्यात, त्रिशूळ मागे आडवा धरून, उंच खडकावर उभा असलेला शंकर, हात जोडून उभा असलेला भगीरथ आणि आपल्या नवऱ्याचे कौतुक करावे की, सवतीचा मत्सर करावा ह्यासंबंधी निश्चय न झालेली पार्वती, असे गंगावतरणाचे चित्र; जटायूचा पंख तोडून टाकणाऱ्या, सीतेचे हरण करणाऱ्या, कडकलक्ष्मीसारख्या दिसणाऱ्या रावणाचे चित्र; शिवाय शकुंतलापत्रलेखन, तिलोत्तमा, वसंतसेना, मल्याळसुंदरी अशी कितीतरी चित्रे त्यावेळी

आगपेट्यांवर असत ! रविवर्म्याची चित्रे आम्ही पहिल्यांदा त्या आगपेट्यांवर पाहिली. चित्रांबद्दलची आवड आमच्या मनात त्या आगपेट्यानं उत्पन्न केली. आताच्या आगपेट्यांवर चित्रे का छापीत नाहीत ? त्या अशा मद्दड का असतात ? आगपेटी म्हणजे काड्या ठेवण्यासाठी एक सोयीचा खण असे का ह्या लोकांना वाटते ? हल्लीच्या आगपेट्या करणारांना मुलांबद्दल इतकी अनास्था का ? त्यांना मुलेबाळे नाहीत ? मुलांची नजर वेधून घेणारी, त्यांच्याशी खूप बोलणारी, जपून ठेवावीतसे वाटावे अशी चित्रे ते का नाही आगपेट्यांवर छापीत ?

आणि पूर्वी लाल गुलाच्या गंधकाच्या Great Mogulनावाच्या काड्याच्या पेट्या असत. खोलीच्या कोपऱ्यातल्या अंधाराकडे वळून, हातांची कुपी करून आतल्या आत काडी घासली की, निळ्या-पिवळ्या प्रकाशाच्या सुरेख रेषा दिसत. आणि तो प्रकाशलेख म्हणजे आपलीच करामत असल्यासारखा अभिमान - आनंद वाटायचा. तो आपला शोध, ते आपले कर्तृत्व, लहान मुलांना दाखवायची मोठी गंमत वाटायची. त्या काड्यांनी म्हणे आग लागते, म्हणून तसल्या काड्या तयार करीत नाहीत. कुणी त्या काड्यांनी आगी लावल्या असतील त्या असोत. आमच्यामुळे कधी आग लागल्याचे मला माहीत नाही. आणि ह्या आजच्या "बिन - धोक" काड्यांनी कुणी आगी लावीतच नाही का ?

ह्या सगळ्या वस्तूंबरोबरच त्या संबळीत काही काचांचे तुकडे आहेत. रस्त्यावर पडलेल्या फुटक्या बाटल्यांचे तुकडे. त्यातली एक काच काळपट हिरव्या रंगाची आहे. एक डोळा एका हाताने मिटून दुसऱ्या डोळ्यासमोर दुसऱ्या हाताने काच धरली ( मात्र जपून धरायला हवी हं, नाहीतर बोट कापायचे ), की सगळे अगदी वेगळे - वेगळे दिसायचे. उन्हाळ्यातले दुपारचे ऊनसुद्धा गार वाटायचे. झाडांची पाने अधिक हिरवी व्हायची, आभाळ गडद रंगायचे, रस्त्याच्या कडेच्या सुकलेल्या पिवळट काटक्या पोपटी व्हायच्या. नुसती काच डोळ्याला लावली की, सगळे जग बदलायचे. अशी एक डोळ्यापुढे काच धरून घरासमोरच्या रस्त्यावरून ह्या टोकपासून त्या टोकापर्यंत चालत जाताना आपण दुनियेचे बादशाह आहो असे वाटायचे, आणि का लोक उगीच उन्हाला भिऊन हाय-हुश्श करतात ते कळायचे नाही.

आता माझ्याजवळ मंद काळ्या शेडचा उन्हाचा चष्मा आहे. त्यातून पाहताना गार वाटते. आणि ह्या चष्म्याच्या काचा हातांनी डोळ्यांसमोर धराव्या लागत नाहीत. तरी पण त्या फुटक्या बाटल्यांच्या वेड्यावाकड्या तुकड्यांची जादू ह्या चष्म्यात नाही.

आणखी त्या संबळीत एक तिकोनी भिंगाचा तुकडा आहे. त्यातून पाहिले की मुळी सगळ्या वस्तूंना इंद्रधनुष्याच्या सातही रंगांची कड धरे. रस्त्यातल्या मळकट दगडा - खड्यांना हिरे - माणकांची शोभा येई. समोरचे फत्तेचंद मारवाड्याचे विटके शेवाळलेले घर गोष्टीतल्या नागकन्येच्या रत्नखचित वाड्यासारखे झळकू लागे. कंटाळा आला की, तो घालवून आनंद अनुभवणे त्यावेळी किती सोपे होते ! एक काचेचा तुकडा हाती आला तर ब्रह्मानंदाचे रहस्य हाती आल्यासारखे वाटे. डोळ्यापुढे भिंग

धरले की, सगळे जग आपल्यासाठी सुंदर होई. आता सुख मिळविण्यासाठी डोळ्यांपुढे भिंग धरून भागत नाही. त्यावेळी दगडाने ठेच दिली तर त्याला उलट लाथ मारून त्यावर सूड घेता येत असे. आणि त्यात दगडाचा पराभव होत असे. आता दगड टाळून वाट चालावी लागते. ठेच लागली म्हणून त्याला लाथ मारली तर त्याला लागत नाही, आपल्याला लागते. जग किती बदलले आहे !

ते तिकोनी भिंग, रबराची रिंग, गुळगुळीत पैसे, अशा आणखी कितीतरी वस्तू त्या सबंळीत आहेत. मला आवडलेल्या, मी गोळा केलेल्या, म्हणून एकत्र आलेल्या. ह्या पलिकडे त्यांचा एकमेकांशी संबंध नाही.

केव्हा कोण जाणे, मी पुढे हे - ते जमवीनासा झालो. आणि मग केव्हा कोण जाणे, घरातले देवही त्या संबळीत सामील झाले. आता केव्हातरी घराची झाडझूड करताना एखाद्या कोपऱ्यात ती मला दिसते. लहानपणाच्या माझ्या खजिन्याची ती पेटी मी मग पुन्हा उघडून पाहतो. हिरवे - पिवळे काचेचे तुकडे, तिकोनी भिंग, चरे पडून आंधळ्या झालेल्या काचेच्या गोट्या, भुताला भिववण्यासाठी म्हणून जपून ठेवलेले पण आता काळीने कुरतडून टाकलेले वाघाचे नख, पुस्तकांना कसर लागू नये म्हणून मिळवून ठेवलेली पण आपण स्वतःच झडून गेलेली सापाची कात, ह्यांच्याबरोबर नर्मदेतला तांबडा गणपती, गंडकीतला काळा शाळिग्राम, स्फटिकाचा पारदर्शक सूर्य हेही त्यातच आहेत. आता मी त्यांची पूजा करीत नाही. पण ते मी अजून तसेच सांभाळून ठेवले आहेत. त्या सगळ्या वस्तूही सांभाळून ठेवल्या आहेत. का ठेवल्या आहेत सांगता येत नाही. पण टाकाव्याशाही वाटत नाहीत. मला वाटते संबळी आहे, म्हणून ते देव आणि त्या वस्तू आहेत.

आणि मध्येच मला जाणवते, माझ्याजवळ दुसरीही एक संबळी आहे. माझ्या मनाची. आणि मग असाच केव्हा तरी मी ही दुसरी - माझ्या मनाची - संबळी उघडून बसतो. तीतही अशाच किती तरी जुन्या-पुराण्या, सुसंगत-विसंगत, एक वेळ हव्या असलेल्या - आता नकोशा झालेल्या, अनेक गोष्टींची गर्दी आहे. त्यात अनुभव आहेत, प्रसंग आहेत, विचार आहेत, विकार आहेत, आशा - आकांक्षा आहेत, निराशा - मनोभंग आहेत, बायका आहेत, पुरुष आहेत, मुले आहेत, कुत्री - मांजरे आणि पोपट - चिमण्याही आहेत. कुणाची ओढ लावणारी वळणदार रेखीव जिवणी आहे, तर कुणाचे निर्मळ स्नेहल डोळे आहेत. कुणाची ताठर मान आहे, तर कुणाचा करारी जबडा आहे. प्रेमाची कुजबुज आहे, कलहाची कचकच आहे. ज्यांच्या - माझ्यात औदासीन्याचे अंतर कधीही उभे राहाणार नाही असे वाटत होते ती आता मला दुरावली आहेत. ज्यांच्यावर मी आणि ज्यांनी माझ्यावर उत्कट, विश्रब्ध प्रेम केले ती माझ्या जीवनातून बाहेर गेली आहेत. पण त्यांच्या आठवणी त्या संबळीत आहेत. ज्यांच्याकडे पाहिले म्हणजे पुन्हा पहिला उल्हास वाटतो अशा आठवणी आहेत. आणि ज्यांच्याकडे नजर गेली म्हणजे

बोचल्यासारखे, अंत:करणावर कांटा उभा राहिल्यासारखे, वाटते अशाही आहेत. त्या मी कशासाठी ठेवल्या आहेत सांगता येत नाही. पण त्या टाकाव्याशाही वाटत नाहीत. माझ्या म्हणून त्या तिथे एकत्र आहेत. नाहीतर त्यांचा परस्परांशी काही संबंध नाही. तिथेही काही देव आहेत. त्यांची मी एका काळी पूजा करीत होतो, आता करीत नाही. पण अजून ते तिथे आहेत. त्या वेताच्या संबळीतल्या देवांसारखेच इतर वस्तूंबरोबर आहेत. मला वाटते ही दुसरी संबळी आहे म्हणून आहेत.

ती वेताची संबळी मला आठवते त्याच्या आधीपासून आमच्या घरी आहे. आणि ही दुसरी संबळी - तीही मला आठवते त्याच्या आधीपासून माझ्याजवळ आहे. त्या वेताच्या संबळीचे माझ्यामागे काय होणार आहे कुणाला ठाऊक! आणि ह्या दुसऱ्या संबळीचे माझ्या मागून काय होणार आहे ते तरी कुणाला ठाऊक!

◆

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
वा. क्र. 3426
२६८८२
५।३।०३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# ''आपण त्यांच्यासमान व्हावे''

प्रत्येकाला आपण मोठे व्हावे असे वाटत असते. आणि मोठे होणे फारसे कठीण नाही असेही वाटत असते. पण पुष्कळदा घरातली वडील माणसे आणि जिला ''परिस्थिती'' म्हणतात ती आपल्या बाजूला नसल्यामुळे आपल्याला मोठे होता येत नाही. उदाहरणार्थ शेंडी खुंटीला बांधून अभ्यास करणे हा मोठे होण्याचा एक हमखास उपाय आहे, किंवा एक वेळचा उपवास करून वाचलेल्या पैशातून चांगली पुस्तके विकत घेणे हा मोठेपणाचा एक मार्ग आहे. पण कोणी वडील माणसांनी ह्या गोष्टी आपल्या मुलांना करू दिल्याचे कुठे तरी उदाहरण आहे काय ? म्युनिसिपालिटीच्या दिव्याखाली अभ्यास करूनही माणसाला मोठे होता येते. पण आपल्या शहरातल्या लहान मुलांतून मोठी माणसे निर्माण व्हावी असे म्युनिसिपालिट्यांना वाटायला हवे ना ? तसे त्यांना वाटले असते तर त्यांनी लहान मुलांना सोयीस्कर असे कमी उंचीचे दिव्याचे खांब रस्त्यावर ठिकठिकाणी उभे करून ठेवले असते. हे तर सोडूनच द्या, पण पुष्कळदा म्युनिसिपालिटीच्या रस्त्यावर साधे दिवेही लावलेले नसतात. आमच्या लहानपणी आम्ही जिथे राहत होतो तिथे रस्त्यावर म्युनिसिपालिटीचे दिवे मुळीच नव्हते. त्यामुळे आमच्या गल्लीतल्या कितीतरी मुलांची मोठे होण्याची महत्त्वाकांक्षा मनातल्या मनात मारली गेली.

तरीही माणसाची चिकाटी अशी जबरदस्त की, त्याची मोठी व्हायची धडपड चालूच असते. किमानपक्षी आपण आहो त्यापेक्षा मोठे दिसावे, मोठ्यासारखे दिसावे, वेगळे दिसावे, असा त्यांचा सारखा प्रयत्न चाललेला असतो हे कुठेही नजर टाकली किंवा न टाकली तरीसुद्धा दिसून येईल.

मी नेहमीच्या वेळी स्टॉपवर जाऊन बससाठी उभा राहिलो की, थोड्या वेळाने एक गृहस्थ येतात. त्यांचा पोषाख अगदी जवाहरलाल नेहरूंसारखा असतो. अगदी बटन होलमधल्या गुलाबाच्या 'फुलासुद्धा !' पण सगळ्याच दिवसात हवे तसे चांगले ताजे गुलाबाचे फूल मिळणे शक्य नसते. म्हणून ते खऱ्यासारखे दिसणारे खोटे फूल वापरतात. टोपीचा नोक-झोंकही अगदी थेट तसाच. फक्त त्यांच्या हातात नेहरूंच्यासारखी आंखूड काठी नसते. त्यांना पाहिले की, लोक म्हणतात, 'हे आले गावठी नेहरू.' लोक आपल्याला 'नेहरू' म्हणतात - 'गावठी' का होईना - त्याची त्यांना जाणीव असावी. आणि ते त्यांना मनातून आवडतही असावे असे दिसते. नाही तर त्यांनी सतत तंतोतंत तसा पोषाख केला नसता. नेहारूंसारखा पोषाख केल्याने आपण नेहरू होत नाही, हे त्यांना कळत नसेल का ? पण तरी तो ते करतात. आणि त्याबद्दल त्यांना लोक हसतात.

पण हा थोडासा ''मी हसते लोकांला'' पैकी प्रकार नाही का? कारण तसेच जर पाहिले तर

आमच्या रांगेतले बाकीचे तरी काय करीत होते ? त्या रांगेत एक तरुण मनुष्य आहे. सभ्यच असेल तो. पण त्याने आपल्या तंगड्या तंग तुमानीत कोंबल्या आहेत. व्हेसुव्हियस आणि नायगारा ह्यांचे देखावे छापलेल्या कापडाचा बुश शर्ट अंगात घातला आहे आणि केसांची झुलपे पुढे कपाळावर लोंबती केली आहेत. आपल्या पोषाखावर तो निहायत खूष आहे, हे त्याच्या हावभावांवरून स्पष्ट दिसते आहे. लोक आपल्याकडे पाहतात त्याची त्यालाही जाणीव आहे.

त्याच्या पलिकडे दोन माणसे टाकून एक बाई उभी आहे. ती तारुण्य मागे टाकून मध्यम वयाकडे चालली आहे. तीही सभ्यच असेल, तिने आपला चेहरा आणि केस ह्यांची सजावट फॅशन मॅगेझीन वरच्या चित्रातून घेतलेली आहे. साडी, चोळी, दागिने ह्यांसाठी तिने अजिंठा, खजुराहो, गदवाल, वनपर्ती, कमाठणी आणि वंजारणी ह्यांची उसनवारी केलेली दिसते आहे. ती पुन्हापुन्हा खालीवर इकडे तिकडे माना करते आहे आणि पदर खांद्यावरून हलूही नये आणि खांद्यावर राहूही नये अशा रीतीने तो बसवण्यासाठी किंवा बसू नये ह्यासाठी तिच्या किंचित् सुरकटत आणि शुष्क होत चाललेल्या बोटांची सारखी चाळवाचाळव चालली आहे. आपण लोकांच्या डोळ्यांत भरण्याजोग्या सजलो आहो असे तिला मनापासून वाटते आहे हे उघड दिसते आहे.

त्या तरुणाने आणि त्या प्रौढेने आपल्यासमोर ठेवलेल्या आदर्शाच्या मानाने 'गावठी नेहरूंनी' ठेवलेला आदर्श लोकांना हसण्यासारखा का वाटावा हे मला कळत नाही.

तो गृहस्थ नेहरू नाही. तो तरुण सिनेमा नट नाही. आणि ती बाई नटी नाही किंवा सोसायटी लेडीही नाही. पण ती तिघेही ती जी नाहीत ती असल्यासारखी सजली आहेत - भासताहेत. पण ती कशाला ? आपण सगळीच तेच करीत असतो. आपण जे नाही ते असल्यासारखे लोकांना दिसावे, असे आपल्याला नेहमी वाटत असते. आपण खरोखर असतो त्यापेक्षा कोणी विशेष आहो असे लोकांना वाटावे अशी आपली धडपड असते. लहानपणी आपल्याला दाढी - मिशा नसतात तेव्हा आपण मक्याच्या कणसाच्या दाढी - मिशा करून लावतो. डोळ्यांवर चष्मा चढवतो. डोक्यावर पगडी घालतो, आणि आपल्या पायांपेक्षा पाचपट मोठ्या जोड्यात पाय सरकवून घरभर फरफरटतो. आपल्यापेक्षा दोन-चार वर्षांनी मोठा झाला म्हणून रंग्याला स्नानानंतर झटकण्यासाठी शेंडी आणि फलकावण्यासाठी लंगोटीचे शेपूट मिळावे आणि आपल्याला मात्र कानावरची - चिमणीच्या पंखाएवढाली झुलपे उडवण्यावर समाधान मानावे लागावे ह्यांचे वैषम्य वाटते. आणि शेंडी - लंगोटीचा अधिकार मिळावा म्हणून मांडी कापून तीत बेडूक घालून घ्यायला आपण तयार होतो. दुसऱ्याचे जे आहे ते आपल्यापेक्षा अधिक चांगले आहे असे आपल्याला वाटत असते आणि ते आपल्यासाठी मिळविण्याचा आपला प्रयत्न चाललेला असतो.

लहानपणापासून आपले आईबाप आणि इतर वडील माणसेही आपल्यासमोर दुसऱ्यांची उदाहरणे ठेवीत असतात. "तो बन्या पाहा कुठे आपल्या चड्डीची नाडी चोखतो ? नाही ना रे चोखीत, बन्या ? आमचा बंड्या पण नाही चोखीत" असे गिरवण्यासारखे कित्ते आपल्याला घालून देण्यात येतात, ते योग्यच म्हटले पाहिजे. नाडी चोखण्याची सवय खरोखर दिसायला अगदी घाणेरडी आणि आरोग्याला अगदी विघातक आहे. जगातल्या यच्चयावत् डॉक्टरांनी आणि समंजस आयांनी

त्याज्य ठरवलेली आहे. बंड्यांचा कित्ता पुढे ठेवल्याने जगातल्या सर्व बंड्यामध्ये सुधारणा होईल अशी आशा बाळगायला बिलकुल हरकत नाही. पण केव्हा केव्हा मात्र आईबापांनी पुढे केलेले कित्ते मोठे कुचंबणा करणारे असतात. एखादी मुलगी जराशी संकोची आणि अबोल असली तर तिची आई तिला म्हणत असते "अग, अगदीच अशी कशी घुमी तू? ती सुशी पाहा कशी आहे, हसून खेळून असते. चारचौघांत गेलं म्हणजे बोलावं." बरे मुलगी जर बोलकी, हसरी असेल तर "किती बोलतेस? अग मुलीच्या जातीला इतकं हसणं खिदळणं बरं नव्हे. ती मुलगी बघ कशी आहे. विचारल्या प्रश्नाचे एका शब्दाने 'हो - नाही' उत्तर देते. मान वर करून पाह्यची नाही." अर्जुनालासुद्धा कदाचित् श्रीकृष्णाचा उपदेश ऐकून आपण काय करावे आणि काय करू नये ह्याचा बोध झाला असेल, पण आईचा उपदेश ऐकून, आपण कसे वागावे हे आजतागायत एकाही मुलीला कळले असेल असे मला वाटत नाही.

हे झाले लहानपणाचे. थोडे मोठे झाले, आणि आपण शाळेत गेलो म्हणजे मग, ज्ञानेश्वरांनी सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली; विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी बत्तीस वर्षांच्या आयुष्यात सरकारी नोकरी सोडून खाजगी शाळा काढली. चित्रशाळा काढली, छापखाना काढला, पुस्तकाचे दुकान काढले. निबंधमाला चालवली, सुधारकांची भंबेरी उडवली, आपल्या देशाची नाडी साफ चालत असल्याचे निदान केले. मराठी भाषेचे शिवाजीपद मिळवले, किती किती कार्य केले; अलेक्झांडरने अवघ्या तेरा वर्षांच्या अवधीत अवघे जग पादाक्रांत केले; झाशीची राणी बावीस वर्षांच्या आयुष्यात विद्युल्लतेसारखी तळपून गेली. "मुहूर्त ज्वलितं श्रेय:" "करा काय ते आता करा" "दूष्यस्तु कामो लघु:"असा उपदेश सुरू होतो.

टिळक - जयंती आली, टिळकांचा आदर्श पुढे ठेवा, रेंटिया बारस आली गांधींची शिकवण मनांत बिंबवा. शिवजयंती आली "आठवा शिवरायाचा प्रताप" असे सारखे चाललेले असते. अशा ह्या आदर्शांच्या गर्दीत अगदी जत्रेत सापडल्यासारखे वाटते आणि ह्या आदर्शाकडून त्या आदर्शाकडे सारखी आपली ढकला-ढकल चाललेली असते.

ह्या सगळ्या उपदेशाचा परिणाम म्हणून म्हणा किंवा आपोआपच म्हणा, पुढे मग आपल्यालाच असे वाटू लागते की, जीवनात एकंदरीत आपल्यापुढे एखादा आदर्श असलेला बरा. आणि मग ज्या ज्या मोठ्या माणसांचे चरित्र आपण वाचावे त्याच्या त्याच्यासारखे व्हावेसे आपल्याला वाटू लागते. टागोरांची गीतांजली, गार्डनर आणि चित्रा वाचल्याबरोबर आपल्यावर इतका काही परिणाम होतो की, आपण दाढी वाढवू लागतो, सदऱ्याच्या बाह्या बोटांच्या पुढे वीतभर येतील इतक्या लांब काढतो. धोतराचा कासोटा सैल करून सोगा खिशांत कोंबू लागतो. आणि एकंदरीत आपले अंत:करण खूपच हळवे आणि प्रकृती नाजुक करू लागतो.

गडकरी वाचल्यावर आपण बेहद्द खूष होतो. आणि लेखक होणे ह्यासारखे आयुष्यात दुसरे ध्येय नाही, ह्यांची आपल्याला खात्री पटते, आणि लिहायचे तर अगदी गडकऱ्यांसारखे लिहायचे हे आपले अगदी ठरून जाते. आणि चार - दोन जरी वाक्ये गडकऱ्यासारखी आहेत. असे कुणी म्हटले तर आपण आपली पाठ मनातल्या मनात थोपटून घेतो.

लेखक होणे हे काही लोकांना अगदीच मिळमिळीत वाटते तर काही लोकांचे लेखणी हे शस्त्र तरवारीपेक्षा तिखट आहे आणि ते तसेच वापरले पाहिजे असे मत असते. ह्या शस्त्रवादी लोकांच्या मते लेखणी वापरायची तर ती विष्णुपंत चिपळूणकर, लोकमान्य टिळक, शिवरामपंत परांजपे, स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांच्याप्रमाणे शत्रूवर घाव घालण्यासाठीच वापरली पाहिजे, सावरकरांसारखे लिहिणे म्हणजे "र" अक्षर "=" असे लिहिणे 'आणि'च्या स्थानी नेहमी 'नि' लिहिणे 'हजारा'च्या स्थानी 'सहस्र' तसेच 'ऊर्फ' च्या स्थानी 'तथा' लिहिणे असा करतात.

लेखक होणे ज्यांना मिळमिळीत वाटते त्यांचा कर्तबगारीवर भर असतो. माझा एक मित्र असाच कर्तबगारीचा भोक्ता होता. ॲलेक्झांडर किंवा नेपोलियन ह्यांच्यासारखे जगणे हे खरे जगणे असे त्याला वाटे. त्यासाठी तो दिवसातून पन्नासदा आपले दुमडलेले दंड चाचपून पाही आणि दीर्घ श्वसन करून छाती फुगवी. तसेच आपले व्यक्तिमत्त्व प्रभावी आणि लोकप्रिय करण्यासाठी त्याने पेलमनिझमचा कोर्स घेतला होता आणि डोळे तेजस्वी करण्यासाठी डोळ्यांचे व्यायाम करीत असे. सध्या तो म्युनिसिपालिटीत सफाई खात्यात कारकून आहे. निदान काही दिवसांपूर्वी होता असे मी ऐकले होते. आता कदाचित् बढती मिळाली असेल.

एकटा माझा मित्रच नव्हे तर असे कितीतरी भावी अलेक्झांडर - नेपोलियन, टिळक - गांधी, टागोर - गडकरी आपल्या आवतीभोवती आपल्या आयुष्यात दिसत असतात. आणि दिसता दिसताच दिसेनासे होत असतात.

असे होता होता आयुष्याच्या मुशाफरीत आपण एक वेळ अशा मजलेला येतो की, इतका प्रवास करूनदेखील आपण कुठेच येऊन पोचलो नाही असे आपल्याला दिसून येते. कधी ह्याच्यासारखे तर कधी त्याच्यासारखे होण्याच्या धडपडीत आपण कोणासारखेच झालो नाही, हे आपल्याला लख्कन् प्रकाश पडल्यासारखे जाणवते आणि त्या प्रकाशाने क्षणभर आपले डोळे दिपतात. आणि मग त्याच्या मागोमागच आपण इतर कोणासारखे नाही तर नाही पण स्वत:सारखेही झालो नाही ह्याची जाणीव होते. त्याने तर अगदीच खचल्यासारखे वाटते.

आपल्या समोरचा आदर्श कितीही मोठा असला तरी त्यात पडणारे प्रतिबिंब अखेर आपलेच असणार. त्याचा मोठेपणा तो त्याचा आणि आपण शेवटी आपणच. पण ते आपणही धड आपण राहिलेले नसतो. एवीतेवी अनामिक राहून विरून जायचे तर आपले आपणपण टिकवीत आणि वाढवीत फिरणे बरे. त्यात स्वाभिमान आहे. कणखरपणा आहे. कर्तृत्व असले तर त्यात आहे.

जे लोक आदर्श म्हणून ठेवण्याजोगे होतात, ते दुसऱ्याचा आदर्श न मानल्यामुळे आपल्या अंत:करण प्रवृत्तीशी इमान राखल्यामुळे, आणि कोणत्याही लाभासाठी ते इमान विकण्याचे नाकारल्यामुळे होतात. कला आणि साहित्य ह्यांच्या क्षेत्रांत पाहिले तरी जे दुसऱ्याचे अनुकरण न करता स्वत:चे वैशिष्ट्य राखतात तेच नाव घेण्याच्या योग्यतेला पोचतात असे दिसून येते.

आपले स्वत्व राखणे आणि त्याला वळण लावणे, त्याचा विकास करणे ह्यांतच आपले हित आहे. दुसऱ्या कोणाचाही कित्ता गिरवण्यात किंवा तो पुढे ठेवण्यात नाही, आणि मोठे न झाले म्हणून काहीही बिघडत नाही हे आपल्याला इतर कोणी किंवा आपण स्वत:च इतक्या वर्षात

का सांगितले नाही! ''आपण त्यांच्यासमान व्हावे'' ह्यापेक्षा ''आपण अपणासमान व्हावे'' हेच अधिक श्रेयस्कर आहे; हे आपल्याला इतक्या वर्षात का कळले नाही? ह्याचे आपण अखेर नवल करू लागतो, आणि तोपर्यंत फार उशीर झाल्यामुळे नुसती नक्कलच करीत राहतो.

◆

# चिंचेचा खाणार...

समजा, एखाद्या ज्ञानकोशांत तुम्ही वाचलेत - " चिंच : उष्ण कटिबंधात ओसाड व जंगली जागेत आपोआप वाढणारे झाड. हिंदुस्थानात व ब्रह्मदेशात विपुल प्रमाणात आढळते. उंची साठ ते सत्तर फूट असून घेर दोनशे ते अडीचशे फूट असतो. त्याचे लाकूड चिवट, टणक व टिकाऊ असते. त्याला चैत्र - वैशाखात फुले येतात...इत्यादी इत्यादी" किंवा समजा, शंकर दाजी शास्त्री पदे यांच्या 'वनौषधिगुणादर्श' तली चिंचेचे गुणधर्म आणि औषधी उपयोग ह्यांच्यासंबंधीची बहुमूल्य माहिती वाचलीत तरी चिंच ही वस्तू काय आहे हे तुम्हाला कळेल काय ? आणि चिंचेचे चिंचपण ? शक्यच नाही. आत्म्याचे स्वरूप ही जशी प्रवचनाने लाभणारी वस्तू नव्हे, तसेच चिंचेचे चिंचपण हीदेखील प्रवचनाने किंवा ज्ञानकोशाच्या वाचनाने लाभणारी वस्तू नव्हे. ब्रह्मानंद किंवा त्याचा सहोदर हा जसा त्याचा ज्याला साक्षात्कार झाला त्यालाच कळतो, तसेच चिंचेचे चिंचपण हे तिचा आस्वाद घेणाऱ्यालाच कळते, येरांना कळायचे नाही. पण एकदा ज्याने चिंचेचा आस्वाद घेतला त्याला तिच्या आवडीची मिठी कायमची बसल्यावाचून राहत नाही. चिंचेची आवड हा ब्राह्मविवाहासारखा एक संस्कार आहे. तो सोयीचा करार नाही. आणि खऱ्या सुखी वैवाहिक जीवनात जसे कालांतराने केवळ शरीरसुखाचे महत्त्व कमी कमी होत जाते आणि त्या शरीरसुखाच्या आठवणींवर पोसलेला मऊ, मुरलेला जिव्हाळा आणि मालकीच्या जाणिवेचा वासही नसलेला एकमेकांबद्दलचा नि:स्वार्थ ओढा वाढत जातो, तसेच चिंचेच्या आवडीचे आहे. तिची आसक्ती म्हणतात ती सुटत असेल, नव्हे सुटतेच. पण तुम्ही शाबूत निरोगी मनाचे असाल तर तिची गोडी कमी वाटते, ती तुच्छ लेखावीशी वाटते, असे कधी होणार नाही. किंबहुना तिची गोडी आता पहिल्यासारखी चाखता येत नाही हे जाणवल्यामुळे तिच्याबद्दल एक प्रकारची नवीन ओढ वाटू लागते.

माझेच पाहा ना. चिंचेची आठवण झाली तरी माझे दात आत आंबतात, आणि अंगावर शहारे येतात. पण लहानपणी पुन्हा पुन्हा, घोळून घोळून घेतलेली तिची चव आठवते आणि तोंडाला पाणी सुटते. ज्यांना कोणाला काही कारणाने चिंच चघळणे अशक्य जाले असेल, त्यांनी नुसती आपल्या लहानपणाची आठवण करून पाहावी, म्हणजे माझे म्हणणे त्यांना पटेल. त्या वयात चिंचेचे एक बोटुक जरी जिभेच्या टोकावर ठेवायला मिळाले तरी परब्रह्म मिळाल्याचा आनंद होतो. बोटुक तोंडात घालायचे, थोडा वेळ जिभेभोवती घोळवायचे, फिरवायचे; मग त्याचा रस चोखायचा. लगेच ओठ आवळतात; तोंडाचा चंबू होतो, 'स्स्' - 'स्स्' करून श्वास जोरात, अगदी

खूप जोरात, आत ओढला जातो. भुवयांची कमान वर चढून, धनुष्यासारखी ताणते, आणि डोळे विस्फारून चमकू लागतात. 'आनंद' 'आनंद' म्हणून ज्याला म्हणतात त्याची त्या वेळी परमावधी झालेली असते.

बरे, ह्या आनंदाच्या अनुभूतीसाठी चिंच गाभुळलेली, सालीपासून सहज सुटणारी, जाड गराची, मऊ मऊ आणि गुळचट - आंबट असावी लागते असे मुळीच नाही. चिंचेची आवड फार व्यापक, समावेशक आणि उदार असते. ती चिंच ह्या वस्तूची आवड असते. तिच्या एखाद्या जातीची किंवा अवस्थेची नाही. खऱ्या साधूला जशी भूतमात्रविषयी नि:पक्षपात आणि निरपवाद प्रीती असते तशी ही असते. तिथे पक्षपात नाही. ती चिंच असली म्हणजे पुरे. तिला नुसतेच जेमतेम नाव आणि रूप मिळालेले असले आणि तिची चव आंबट-तुरट-कडवट अशी संमिश्र - म्हणजे कोणतेच नाव न देता येण्यासारखी - असली तरी ती आवडते. तिच्यात हिरवे, टणक, फुगीर, चिंचोके तयार झालेले असले, गर अजून पातळ असला, चिंचोका, गर आणि साल एकमेकांना घट्ट चिकटून असली, इतकी की दातांनी सोलूनच तिची - वर तपकिरी, आत हिरवी - साल काढावी लागत असली किंवा सालीसकटच खावी लागत असली आणि तिचा आंबटपणा अगदी कर्कश, जिभेला लागताच अंगावर शहारे आणणारा( इथे कुणाच्या अंगावर शहारे येताहेत म्हणा ! ) असला तरी ती आवडते. इतकेच नव्हे तर 'ॲप्प् ॲप्प्' करून ती खावी लागत असल्यामुळे विशेषच आवडते. चिंच पिकत आली, सालीपासून सुटू लागली, तिला तांबूस - तपकिरी रंग आला, आणि तिचा जाड गर सहज सुटून तोंडात विरघळ्यासारखा असला म्हणजे मग त्या चिंचेला तोड नाही, आणि ती खाण्यामुळे होणाऱ्या आनंदाला पारावार नाही.

चिंच खाताना दुसऱ्याला पाहिले म्हणजे आपल्या तोंडाला पाणी सुटते. ते आपण आतल्या आत गिळतो. नको आपल्याला ती चिंच. असल्या मोटभर चिंचा पाहिल्या आहेत. ती चिंच काही चांगली नसावीच, असे आपण मनाशीच म्हणतो. पण चिंच आणि ती चांगली नाही असे कसे होईल ? असे पुन्हा आपल्याशीच विचारतो. छे, छे ! तिच्यातला एखादा तुकडा आपल्याला मिळालाच पाहिजे. मग आपण त्याच्याजवळ तिच्यातला तुकडा मागतो. आपल्याला त्याच्याकडून जेवढी चिंच मिळेल तिच्या दुप्पट, दसपट, हजार पट चिंच त्याला द्यायचे कबूल करतो. गळ्याशप्पत, आईशप्पत - अगदी रामाशप्पत कबूल करतो. त्याच्या औदार्यबुद्धीला आवाहन करतो, त्याच्या अंगच्या मोठमोठ्या गुणांची वाखाणणी करतो. 'मुंगीच्या पायाच्या नखाइतका तरी तुकडा दे' असे त्याला विनवतो. दारूच्या व्यसनाच्या आधीन झालेला मनुष्य होणार नाही इतके आपण लाचार होतो. तरी त्याचे मन वळले नाही तर रुसतो. फुरंगटतो. तो स्वार्थी, आप्पलपोट्या, मख्खीचूस आहे ह्याची आपल्याला खात्री पटते. आणि अखेर जर त्याने उदार होऊन आपल्याजवळच्या चिंचेतला - मुंगीच्या पायाच्या नखाएवढा का होईना - तुकडा दिला तर आपल्याला धन्य धन्य वाटते.

आणि मग जेव्हा आपल्याजवळची चिंच किंवा तिच्यातला थोडासा तुकडा दुसरा कोणी आपल्याजवळ मागतो तेव्हा आपल्याला, आपल्याजवळच्या चिंचेतला मुंगीच्या पायाच्या

नखाएवढासुद्धा तुकडा देणे कठीण आहे ते कळते. त्याला फार मोठा त्याग करावा लागतो हे लक्षात येते. पण मग मैत्रीखातर तेवढा त्याग करायला आपण तयार होतो.

पण कधी कधी काय होते की, आपल्याजवळ किंवा दुसऱ्या एखाद्याजवळ चिंचेचे एखाद्दुसरेच बोटुक असते. आणि ते आधीच तोंडात जाऊन जिभेच्या आवती - भोवती रेंगाळत असते. अशा वेळी ती चिंच मागायची कशी आणि द्यायची कशी? पण तितकेच जर 'पेशल' प्रेमाचे नाते असले तर अशा तोंडात घोळणाऱ्या चिंचेचा तुकडा देण्याघेण्याला एक अगदी खासगत अर्थ येतो. आणि त्या चिंचेची उबदार गोडीही काही वेगळीच लागते. ती ज्याने चाखली असेल त्याला माहीत असेल. नसेल तो कमनशिबाचा.

चिंच चांगली गाभुळलेली असली आणि ती बोटांनी तोडावी लागली तर तिचा गर बोटांना चिकटतो. स्वच्छतेचे स्तोम माजवणाऱ्यांना ते घाणेरडे वाटते. पण खरोखर अशी बोटे चोखण्यात किती गंमत असते? चिंच संपून गेली आहे आणि आपण नुसती बोटे चाटतो आहो हे आपल्याला कळत असते, तरी आपण बोटे चाटीतच राहतो. त्या बोटांना चिंच चिकटलेली होती एवढेच कारण पुरेसे असते. मोठी माणसे मग नावे ठेवतात. पण मोठी माणसे नाही का श्रीखंड संपले तरीसुद्धा वाटी निपटून बोटे चाटीत राहत? त्यांना कोणी नावे ठेवायची?

चिंच ही परमेश्वराने आपल्या (परमेश्वराच्या नाही) जिभेला सुखास्वाद मिळावा म्हणून खास निर्माण केलेली वस्तू आहे असे मुलांना वाटत असते. तशा आंबा, पेरू, बोरे ह्याही वस्तू त्याने मुलांसाठीच निर्माण केल्या आहेत. पण चिंच विशेष. नाही तर त्याने चिंच इतकी विपुल - ओसाड व जंगली जागेत आपोआप जगवणारी - का निर्माण केली असती? शाळा ह्या नावाची जी संस्था निर्माण झाली आहे तीसुद्धा मुलांना जाता-येताना आणि मधल्या सुटीच्या वेळात - इतकेच नव्हे तर वर्गात बसल्याबसल्यासुद्धा - चिंच खाता यावी म्हणूनच. आंबा, पेरू वर्गात बसून तोंडातल्या तोंडात चघळून खाता येत नाही. बोर तर फार वेळ तोंडात टिकतच नाही. चिंच ह्या सर्वांपेक्षा श्रेष्ठ आहे. बागेतल्या आंब्या-पेरवांना राखण असते. बोरीला काटे असतात, तसे चिंचेचे नाही. तिचे घडचे घड झाडांना लागलेले असतात आणि चिंचेची सगळीच झाडे काही कुणाच्या मालकीची नसतात. वारा सुटला तर चांगल्या पिकलेल्या चिंचा झाडाखालीच किती तरी सापडतात. नाही तर दोनचार दगड फेकले की, चिंचाच चिंचा. चिंच आपण खावी ह्यासाठी आहे आणि आपले जीवन चिंच खाण्यासाठी आहे अशी त्यांची सुखाची, समाधानाची स्वयंतुष्ट वृत्ती असते. नाही तरी माणूस सबंध आयुष्यभर कशासाठी धडपडत असतो? सुखासाठी आणि समाधानासाठीच ना?

चिंच देणारे म्हणून चिंचेचे झाड जसे मुलांना अतिशय प्रिय असते; तशीच त्यांना त्याची गूढ आणि आकर्षक भीतीही वाटत असते. कारण चिंचेवर भुते असतात ना! आता भुताची भीती वाटते खरी, पण भूत कसे असते, ते पाहायची ओढही असते मनाला. खरे म्हणजे तसे भुताला भ्यायचे काही कारण नाही. मुंज झालेली असली तर जानवे बाहेर काढून, ब्रह्मगाठ पुढे करून खुशाल भर अंधाऱ्या रात्री चिंचेखालून जावे. भुताची टाप नाही धक्का लावायची. मुंज झाली

नसली तर नुसते 'राम', 'राम' म्हटले तरी चालते. रामाच्या नावाचा प्रभावच तसा आहे. त्याने नाही चौदा चौकड्यांचा राजा जो रावण, त्याला मारून तेहतीस कोटी देवांना त्याच्या कैदेतून सोडवले? आणि समजा, इतकेही करून भूत जवळ आलेच तर त्याच्या डोक्याचा एक केस तोडून घ्यायचा आणि आपल्याजवळ ठेवायचा. म्हणजे मग भूत आपल्याला काही करू शकत नाही. दुसऱ्या कोणाचे काही असो, माझा अनुभव आहे. एकदा मी असा अंधाऱ्या रात्री स्टेशनावरून गावात येत होतो. तहसील कचेरीच्या मागच्या बाजूच्या चिंचेच्या झाडावर भूत आहे हे मला माहीत होते. झाड दिसू लागले तसा मी थोडासा भ्यायलो हे कबूल करतो. पण लगेच मी जानवे बाहेर काढून ब्रह्मगाठ समोर धरली. शिवाय मोठ्याने रामरक्षा म्हणून लागले. झाडापर्यंत आलो, त्याच्याखालून चाललो - मागून कोणी तरी आलेसे वाटले. पण मागे वळून भुताकडे पाहायचे नसते. म्हणून मी मान अगदी लाकडासारखी ताठ ठेवून तसाच पुढे चाललो. जे कोण होते ते अगदी माझ्या अंगासरशी आले, बरोबर चालले, आणि पुढे गेले. भुताची पावले उलटी असतात, गुडघ्याच्या वाट्याही तशाच; डोकेही उलटे लागलेले असते आणि पोट - पाठही. मी पाहू लागलो, खरोखरच सगळे उलटे होते आणि ते उलटेच चालले होते. ते भू - भू - तच होते. प - पण मला काही न करता निघून गेले ते. माझ्या तोंडाला कोरड पडल्यामुळे रामरक्षा तोंडातल्या तोंडात लंगडत - लडबडत होती. पण ब्रह्मगाठ बाहेर काढलेली होती ते त्याला कळलेच असेल.

चिंचेची अशी भीती वाटत असली तरी अंधाऱ्या रात्री चिंचेकडे जाऊन खरेच तिच्यावर भुते असतात का आणि असली तर ती तशी दिसतात ते पाहण्याची तीव्र उत्सुकताही असते. असे हे चिंचेचे आकर्षण आहे.

पण काही माणसाचे वय जसे वाढत जाते तशी चिंचेसंबंधीची त्यांची वृत्ती बदलत जाते. त्यांना चिंचेची भीतीही वाटत नाही आणि प्रेमही वाटत नाही. ती 'शहाणी' आणि 'सभ्य' होत जातात. निदान आपण तसे होत चाललो आहो असे त्यांना वाटू लागते. पुष्कळांना चिंच खाण्याची मनातून अनिवार हौस असते. पण तसे करणे 'शोभत' नाही ना? किंवा कुणाचे दात आंबू लागतात तर कुणाला आणखी काही होते. म्हणून मग ही मोठी होत चाललेली माणसे मुलांवर डाफरतात. चिंच खाऊ देत नाहीत. चिंच खाल्ल्याने खोकला होतो म्हणतात. चिंच खाल्ल्यामुळे मुलांना खोकला झालेला कुणी पाहिला आहे का? कुणी त्याची आकडेवारी काढली आहे? शेकडो मुले चिंचा खातात. त्यापैकी कितींना खोकला होतो? चिंचेमुळे हो! इतर कारणे नाही द्यायची. आणि मोठ्या माणसांना खोकले होतात ते हो कशामुळे? ते तर चिंच नाही ना खात? आपल्याला खायची नाही म्हणून मुलांना खाऊ द्यायची नाही, असा शुद्ध खुनशीपणा आहे हा! बहुधा त्यांचे मूळचे चिंचेवरचे प्रेमच त्यांना असे उरफाटे वागायला लावीत असावे. त्यांना लहानपणी चिंचेची जी मोहिनी पडलेली असते, आणि जी खरे म्हणजे अजूनही नाहीशी झालेली नसते, ती त्यांना आपला दुबळेपणा वाटतो. आणि आपण दुबळे नाही, आपण स्वतःवर विजय मिळवला आहे हे दुसऱ्यांना भासवण्याचा त्यांचा हा प्रयत्न असतो. ही माणसांची एक परी.

दुसऱ्या काही माणसांची चिंचेसंबंधी वृत्ती अगदी उपयुक्ततावादी असते. चिंच ही सारक आहे,

पाचक आहे, उष्णताशामक आहे, रक्तशुद्धिकारक आहे, तिच्यात सायट्रिक ॲसिड आणि टार्टरिक ॲसिड आहे, चिंच प्रकृतीला हितकारक आहे...इत्यादी इत्यादी म्हणून मग कुणी चिंचेचा बलक पाकांत घालून राखून ठेवतात. कुणी आपल्या बायकांना सांगतात, "उन्हाळा आला बरं का आता! आता चिंचोणी नाही तर चिंचेचं सरबत करीत जा मधूनमधून." (उन्हाळा आला म्हणून बरे का - चांगले लागते म्हणून नाही!) कुणी कच्च्या चिंचेचा तक्कू घालून ठेवतात. कुणी जुनी चिंच अधिक गुणकारी म्हणून ती मुद्दाम घरी ठेवतात. आणि काही काही बायका तांब्यापितळेची भांडी - उपकरणी लखलखीत करण्याकरता म्हणून मुद्दाम वाण्याकडून स्पेशल चिंच विकत घेऊन ठेवतात. अळवाची किंवा सुरणाची भाजी चिरताना बोटांना कंड सुटते, ती घालविण्यासाठीसुद्धा बायका चिंच वापरतात.

चिंचेचे लाकूड फार चिवट, टणक आणि टिकाऊ असते. म्हणून ते उसाच्या चरकासाठी, कातकामासाठी किंवा चाकांसाठी काही लोक वापरतात. पाने रंगासाठी वापरतात. चिंचोक्याचे पीठ करून त्याची घोंगड्यांना लावायसाठी खळ करतात. आणि कोणी चिंचोक्यांच्या पिठाच्या भाकरी करून खातात. विंचवाचे विष उतरवण्यासाठी चिंचोका घासून विंचू चावल्याजागी लावतात. असे आणखी किती तरी उपयोग आहेत आणि असतील. पण चिंचोक्यांचा खरा उपयोग म्हणजे खूप चिंचोके जमवून 'एकी की बेकी' खेळणे; चिंचोका घासून दुसऱ्या मुलांना त्याचा चटका देणे - आणि एखादे वेळी भाजून खाणे.

चिंचेच्या झाडाचा आणखी एक उपयोग आहे. तो म्हणजे चिंचेवर जर मुलांनी चिंच शिल्लक ठेवली असली तर ती विकून मालकाला पैसे मिळवता येतात. एक झाड दर साल साधारण चार-साडेचार मण चिंच देते, आणि सत्तर-ऐंशी वर्षे टिकते, हा त्याचा उपयोग दुर्लक्ष करण्यासारखा नाही. चिंचेच्या झाडाच्या एका भागाचा आणखी एक उपयोग आहे. पण तो थोडासा आता कमी झाला आहे. तो म्हणजे चिंचेच्या फोकाचा. मुलांच्या हातावर, पायावर, पाठीवर, ढुंगणावर सपासप ओढायला याचा फार उपयोग होतो. (हा खूप लवचिक असतो आणि लवकर तुटत नाही, त्यामुळे मार चांगला बसतो आणि खूप मुलांवर वापरता येतो!) हल्ली शाळांतून ह्याचा असा उपयोग करण्याची बंदी झाल्यामुळे मास्तरवर्गाची फार कुचंबणा झाली आहे. मुलांवरचा राग मोकळेपणाने काढता येत नसल्यामुळे त्यांचा मानसिक ताण वाढून त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम झाला असण्याचीही शक्यता आहे. अजूनही कुठे कुठे मुलांना सद्वर्तनाचे महत्त्व पटवण्यासाठी किंवा स्वत:चा दुबळेपणा आणि दोष मुलांपासून लपवण्यासाठी ह्याचा मुलांवर प्रयोग होतो. हा म्हटला तर चांगला आणि म्हटला तर विकृत उपयोग.

उन्हाळ्याच्या दिवसांतल्या दुपारची वेळ असली तर चिंचेच्या झाडाखाली गाडी सोडता येते आणि गाशा अंथरून आडवे होता येते, हा चिंचेचा आणखीही एक उपयोग कुणास माहीत नसला तर सांगायला हरकत नाही.

पण चिंच खाता येत नाही म्हणून तिच्याविषयी कृतघ्न होण्याचे किंवा तिचा आपल्याला नाना परींनी उपयोग होतो म्हणून निव्वळ स्वार्थी आणि व्यवहारी दृष्टीने तिच्याकडे पाहण्याचे कारण नाही. संकुचित आवड-निवड आणि गरज ही बाजूला सारून नुसते एक झाड म्हणून चिंचेकडे

पाहायला काय हरकत आहे? प्रत्येक झाडाचे एक वेगळे असे सौंदर्य असते. अगदी त्याच्या नुसत्या उघड्या फांद्यांचेसुद्धा. चिंचेच्या नुसत्या उघड्या झाडांकडे पाहिले तर त्याच्या खांद्या, फांद्या, डहाळ्या आणि डिकशा ह्यांची सुंदर, डेरेदार जाळी गुंफलेली दिसते. बुंध्या - फांद्याचा रंग असतो मातटच. पण करड्या - निळ्या आभाळावर सगळी जाळी काळ्या रंगाने रेखल्यासारखी आणि दुपारच्या वेळी तळच्या जमिनीवर तिचा नकशीदार छाप उठवल्यासारखी दिसते.

काही झाडांची पाने इतकी मोठी, जाड, दडस आणि दाट असतात की, त्या झाडाखाली उभे राहून आभाळाकडे पाहिले तर आभाळ आपल्याला दिसत नाही, तर त्याचे वेडे - वाकडे, तिकोनी - चौकोनी, आडवे - उभे - तिरपे तुकडे दिसतात. पानांच्या फटीतून आपल्याला आभाळ दिसते, तेवढेच. चिंचेच्या झाडाखाली उभे राहून आभाळाकडे पाहिले तर त्याच्या पानांनी आभाळ झाकून दृष्टीआड करून टाकले आहेसे वाटत नाही. शिरीषाच्या, शेवग्याच्या किंवा गुलमोहराच्या पानांचा पसरट रेखीव आकार असतो आणि त्यांची आभाळावर नकशी रंगवल्यासारखी दिसते. तसे चिंचेचे नाही. चिंचेची पाने आकाशाच्या भिंतीवर फवारा मारल्यासारखी दिसतात. फवाऱ्यांतल्या गाभ्यात जशी एक प्रकारची धूसरता आणि टोका-टोकांशी जसे बिंदूचे कण असतात, तसे चिंचेच्या पालवींचे असते. त्यामुळे सबंध झाडाला एक प्रकारची तरलता येते.

पिंपळाची कोवळी पाने माणकांच्या किंवा पद्मरागाच्या चकत्यांसारखी तकाकतात, तशी चिंचेची तकाकत नाहीत. काही काही आंब्याची कोवळी पालवी तांबड्या - गुलाबी - किरमजी रेशमाच्या मऊ भरघोस, लुसलुशीत लडीसारखी लोंबते, तशी ही चिंचेची कोवळी पालवी नसते. गुलमोहराच्या फांद्याच्या डौलदार झोकामुळे त्याची नवी पालवी ल्यालेली पोपटी फांदी मोराच्या शेपटीसारखी डौलदार दिसते. तशीही चिंचेची दिसत नाही. तिची नव्या पालवीची शोभा काही वेगळीच असते. चिंचेला जेव्हा नवी पालवी येऊ लागते तेव्हा तिच्या फांद्यांच्या टोकांशी, तांब्यासारखी नाजुक - तांबूस, तिच्या मागे पिवळसर तांबूस, मग पिवळी, मग पिवळसर हिरवी आणि शेवटी दडस काळसर हिरवी - अशा वेगवेगळ्या चार-पाच रंगाच्या छटा दिसू लागतात. आणि त्या सगळ्या झाडावर सगळीकडे दिसतात. जणू कुणी तरी त्या वेगवेगळ्या रंगात कुंचले बुडवून त्याचे ठिकठिकाणी हात दिले आहेत. आणि त्यांत भडकपणा कुठेही नसतो.

हळूहळू दिवसांमागून दिवस जातात तसा त्या पालवींतल्या रंगछटांचा वेगळेपणा कमी कमी होत सगळीकडे कमी - अधिक गडद पण एकच हिरवी छटा येते. आणि ही छटा येते न येते तोच चिंचेला फुले यायला सुरुवात होते. आणि हळूहळू झाडाच्या हिरव्या अंगावर ठिकठिकाणी फुलांच्या लहान-मोठ्या सैलसर झुबक्यांचा फिकट पिवळा रंग खुलू लागतो. चिंचेचे झाड अशा रीतीने वर्षातून किती तरी महिने रंगाच्या विविधतेमुळे सुंदर दिसत असते.

चिंचेच्या पालवीत जसा भडकपणा नसतो तसा फुलांतही नसतो. चिंचेची फुले झुबक्या -झुबक्यांनी येतात. पण आंब्याच्या फुलांप्रमाणे त्यांना गंधाचा भडकपणा नसतो, तसा गुलमोहराच्या फुलांप्रमाणे रंगाचाही भडकपणा नसतो. फिकट पिवळ्या तांबूस रंगाचे चिंचेच्या फुलांचे गुच्छ पाहिले म्हणजे पहिल्या प्रथम त्यांचा सैल गुंफणीचा नाजुकपणा डोळ्यात भरतो. पण त्यातल्या एकेकट्या फुलांत

सौंदर्य असेल असे वाटत नाही. एखादी दृष्टिभीरू कुलवती ज्याप्रमाणे आपल्या अवयवसौंदर्याचे प्रदर्शन करण्याऐवजी ते झाकते, तसेच चिंचेच्या फुलांचे आहे. जवळ घेऊन हळुवारपणाने हाताळल्याखेरीज त्यांचे सौंदर्य दिसत नाही. त्याच्या पाकळ्या इवल्याशा - पण रेखीव, वळणदार असतात. त्यांच्या फिकट पिवळ्या अंगावर केसासारख्या सूक्ष्म लाल - किरमिजी रेषांची सुंदर नाजुक नकशीदार जाळी असते. आणि त्यांतच मधूनमधून लालसर टिंबांचा शिडकावा असतो. आणि त्या दोन रंगांचा विरोध एकमेकांना साहाय्यक असा उठाव देत असतो. त्यांचे हे नाजुक, संयत सौंदर्य पाहिल्यावर आपले आजपर्यंत तिकडे कसे लक्ष गेले नाही याचे नवल वाटते.

संध्याकाळच्या वेळी चिंचेच्या झाडाकडे पाहिले तर त्याच्या बारीक, लांबोडक्या, नाजुक पानांची आकाशाच्या करड्या - निळ्या पार्श्वभूमीवर कातरकामाची हलकी जाळी पसरल्यासारखी दिसते. त्या वेळी त्याला एक आर्त, अंतर्मुख शांतता येते. चिंचेच्या झाडाची ही गंभीर आणि थोडीशी विरक्तीसारखी भासणारी शांतता पाहिली आणि चिंचेची ती वेड लावणारी, मनाला उसळी आणणारी धारदार गोडी आठवली म्हणजे त्यांच्यामधल्या विरोधाने मनाच्या वृत्ती परस्परविरुद्ध दिशांना खेचल्या जातात.

डोळ्यावर न येणारे हे चिंचेच्या झाडाचे संयत, नाजुक सौंदर्य बघता येईतो, चिंच चघळण्याचा आनंद उपभोगण्याचे तुमचे वय पुष्कळच मागे पडले असण्याचा संभव आहे. पण म्हणून तो आनंद तुम्ही विसरला असाल असे नाही. जर त्या आनंदाची आठवण अजून तुमच्या मनात कुठे तरी असेल आणि चिंचेचे नाव ऐकताच ती जागी होऊन तुमच्या तोंडाला पाणी सुटत असेल, तर तुमचे वय कितीही झाले असेल तरी त्याची क्षिती बाळगण्याचे कारण नाही. कारण वयाने तुमच्यावर मात केलेली नाही, तुम्ही वयावर मात केली आहे !

◆

# अवघे पाउणशें वयमान

वयमान पाउणशे झाले आहे पण वयाचा भार साहून साहून कंबर कमान झाली नाही. केस रूपेरी होऊ लागले आहेत पण डोईला छान टक्कल अजून पडले नाही. दंताजीचे ठाणे उठले नाही, मान नन्ना करीत नाही. डोळे रुसले नाहीत आणि कान फुटले नाहीत. सगळे शरीर सगळ्या अवयवांसकट अजून धड आहे हे मी गर्वाने सांगत नाही. कृतज्ञतेने सांगतो आहे. आणि आपल्याला आयुष्य मिळाले त्यात आपण गर्व कसला करायचा ? तो जो रेड्यावर बसलेला आहे त्याचे पाश आपण जन्मतो तेव्हाच आपल्या गळ्याभोवती पडतात. ते कोणाचे केव्हा आवळले जातात एवढाच प्रश्न. माझ्या बाबतीत तरी गर्वाला खासच जागा नाही. खरेच. कारण चाळीस पंचेचाळीस वर्षापूर्वी अशी वेळ आली होती की, मी गेलोच होतो. म्हणजे गेल्यासारखाच होतो. त्यावेळी ज्यांनी माझी प्रकृती पाहिली असेल त्यांना मी त्या अवस्थेतून पार पाडून इतकी वर्षे जगलो ह्याचेच नवल वाटत असेल. मलाही वाटते. समजा मी गेल्यातच जमा होतो तेव्हाच गेलो असतो, तर काय झाले असते ? काय झाले असते ? काही विशेष झाले नसते. मी गेलो असतो एवढेच झाले असते.

खरे, मी जेव्हा माझ्या आयुष्याकडे मागे वळून पाहतो ( नाही तरी आता पुढे फारसे पहाण्यासारखे नाही. मागेच पहायचे ) तेव्हा दोन - चार टप्पे तरी असे दिसतात की, त्या त्या वेळी जे घडले ते घडले नसते आणि मी आताच्या इतका जगलो असतो तर मी वेगळाच कोणीतरी असतो.

चवदाव्या वर्षी जर मला हैदराबाद सोडून वऱ्हाडात जावे लागले नसते तर मी हैदराबादेतच मॅट्रिक होऊन महासवीत, फराडगीरीत किंवा सर्फखासमध्ये नोकरी करून वजीफा घेतला असता आणि त्याच आमच्या दीड रुपया किरायाच्या घरात किंवा तशाच दुसऱ्या एखाद्या घरात म्हातारपणाचे दिवस ओढीत राहिलो असतो. माझे एकदोन समवयस्क राहताहेत तसा. पत्रे लिहिण्याखेरीच - ती तरी कोणाला लिहायची ? - कागदावर टाक फिरवायची गरज पडली नसती.

इंदूरला कॉलेजात न जाता उमरावतीलाच डेप्युटी कमिशनरच्या ऑफिसात कारकुनी करीत राहिलो असतो तर ३० - १ - ४० ई.बी. ४० - ११/२ - ६०, पुन्हा ई. बी. सिलेक्शन ग्रेड ६० - १२० असा चढत जाऊन पंधरावीस वर्षापूर्वी पेन्शन घेऊन बसलो असतो. मंगळवारी, शुक्रवारी अंबाईच्या दर्शनाला गेलो असतो. जमेल तसे सकाळी - संध्याकाळी बरोबरीच्या पेन्शनरांबरोबर मालटेकडीवर फिरायला गेलो असतो. जाता - येताना त्यांच्याजवळ "हल्लीच्या" पोरापोरींवर टीका गेली असती. कदाचित आंबापेठेत ( काही लोक तिला गुलामपुरी म्हणतात ) सरकारकडून कर्ज काढून - ते मिळालेच असते - स्वत:साठी दोन

खोल्या आणि भाड्याने देण्यासाठी दोन खोल्या असे छोटेसे घर बांधले असते. त्याच्या मागल्या बाजूला अळवाची खाच केली असती. मोकळ्या जागेत गुलाबाची, मोगऱ्याची, गुलबक्षीची फुलझाडे लावली असती. आणि गवती चहाही. म्हातारपणी रोजचा चहासुद्धा थोडा गवती चहा टाकून घेतलेला बरा. एकंदरीत सरळ वाटेने जाऊन चारचौघांसारखा पेन्शन खात सुखात राहिलो असतो. माझे काही समवयस्क राहताहेत तसा.

पण तसे काही घडले नाही. थोडीशी आडवाट धरून डी. सी. च्या ऑफिसात काम करीत असतानाच मी कॉलेजात गेलो. रस्ता खाचखळग्यांचा होता. थोडासा काटेरी होता. पण तेवढा प्रवास करून बी. ए. चा टप्पा पार केला. आणि मग जी वाट चुकली ती मला इकडे तिकडे भटकावीतच राहिली. काही वर्षे आजारात गेली. काही आज ही नोकरी धर, चार दिवस कर. उद्या ती धर, चार दिवसांनी सोड असे चालले होते. बी. ए. झाल्यापासून वीस वर्ष. काही वर्षे हायस्कूलात मास्तर होतो. काही दिवस ट्यूटर गार्डियन. काही वर्षे रेडियोवर. काही वर्षे प्रकाशकांचा फिरता प्रतिनिधी. आधी मुंबई मग ग्वालेर - उज्जैन पुन्हा मुंबई, मग दिल्ली, आणि मग पुन्हा मुंबई असे मागे पुढे चालले होते. सगळ्यात अधिक सलग नोकरी झाली ती दिल्लीला ऑल इंडिया रेडियोच्या बातमी विभागात साडेचार वर्षे. बाकी नोकऱ्या एखादी वर्षभर, एखादी दोन वर्षे, एखादी तीन वर्षे. आज इथे, उद्या तिथे. मित्र आणि नातेवाईक म्हणत, "भाऊची नोकरी टिकत नाही. काय होतं कोण जाणे!" काही हितचिंतक वेगळ्या स्वरात तेच म्हणत "जोश्यांची नोकरी टिकत नाही. काय होतं कोण जाणे!" आणि मला तर वाटे माझे काही चुकत नाही.

ह्या सगळ्या काळात प्रकृती बहुधा चांगली रहात नसे. किंबहुना प्रकृती चांगली राहत नव्हती म्हणूनच नोकऱ्यांची धर - सोड होत होती. केव्हा केव्हा तर 'नको हे जगणं!' असे वाटावे इतकी प्रकृती ताप देत असे. त्यात पुन्हा लग्न झाले होते आणि बायकोची माझ्याबरोबर आणि माझ्यामुळे फरफाट होत होती. पण तिनं कधी तक्रार केली नाही. वर्षे जाता जात नव्हती आणि अडचणी संपता संपत नव्हत्या. लोकांना वाटे माझी नोकरी टिकत नाही. मी अस्थिर स्वभावाचा असलो पाहिजे. उलट मी जेव्हा जेव्हा नोकरी सोडी तेव्हा तेव्हा मला वाटे 'मी योग्य कारणासाठीच नोकरी सोडतोय. मी स्वभावाने अस्थिर नाही.' केव्हा नोकरी मनासारखी असावी. तर पगार कमी असावा आणि परिस्थिती मनासारखी नसावी. कधी पगार चांगला तर नोकरी मनासारखी नसावी असा ऊनसावलीचा खेळ चालला होता, आणि प्रकृती पाठीशी लागलेली होतीच.

वर्षे जाता जात नव्हती म्हटले तरी वर्षे जातातच, आणि जात होती. अखेर योगायोगानेच पण मनासारखी नोकरी मिळाली. पण तोपर्यंत नोकरीच्या हिशेबाने अर्धे आयुष्य होऊन गेले होते. म्हणजे उमरावतीला डी. सी. च्या ऑफिसातच नोकरी करीत राहिलो असतो. तर सव्वीस वर्षे नोकरी झाली असती आणि चार वर्षांनी पेन्शनला पात्र झालो असतो.

म्हणजे नोकरीच्या दृष्टीने पेन्शनकडे नजर लावायची वेळ आणि वय ज्यावेळी येते त्या वेळी आणि त्या वयाला मी खऱ्या मनापासूनच्या नोकरीला आरंभ करीत होतो.

पण का आणि कसे कोण जाणे; आपले अर्धे आयुष्य होऊन गेले आहे, गाडे उताराला लागले आहे, असे मला वाटले नाही. डी. सी. च्या ऑफिसातली किंवा रेडिओतली नोकरी धरली तेव्हापेक्षाही अधिक हुरूपाने मी ही नोकरी धरली. आणि इथूनच पुढे आपल्याला काय करायचे ते करायचे अशा उमेदीने कामाला लागलो. आणि खरोखरच तिथून पुढली वाट सरळ आणि निष्कंटक होती.

मग बी. ए. झाल्यापासून सिद्धार्थ कॉलेजात लागेपर्यंतची वीस वर्षे वाया गेली का ? आताच्या टप्प्यावरून विचार करायचा तर पाऊणशे वर्षातली वीस वर्षे माणसांच्या उमेदीच्या - उद्योगाच्या वर्षाचा विचार करायचा पंचवीसपासून पंचावनपर्यंतचा तर तीस वर्षातील वीस वर्षे ! पण ज्याअर्थी पंचावन्नाव्या वर्षी आयुष्य संपले नाही आणि कामही थांबले नाही त्याअर्थी हा दुसरा विचार करण्यात काही अर्थ नाही. त्या वीस वर्षांनी मला काहीच दिले नाही का ? त्यातली दीड - दोन वर्षे इस्पितळातले जीवन कसे असते ते मी तिथल्या खाटेवर पडून पाहिले. त्याच काळात वळणामागे उभे असलेल्या मरणाची चाहूल घेतली. चार-साडेचार वर्षे दिल्लीतले वसंत-ग्रीष्म वर्षा - शरद - हेमंत - शिशिर ह्या ऋतूंचे फेरे आणि त्या त्या ऋतूतली दिल्लीची बदलती रूपे पाहिली. प्रकाशकांकडल्या नोकऱ्यांनी मला जबलपूर, राजकोट, धारवाड ह्या त्रिकोणाने संधलेल्या प्रदेशांतून हिंडवले आणि त्याचे अंतर्बाह्य दर्शन घडवले. सुपीक-नापीक उघडे पडलेले, राने पांघरलेले, सपाट - डोंगराळ प्रदेश दाखवले. बहुरंगी - एकरंगी उदार - कृपण पाहुण्यांना पाहून दारे बंद करणारी माणसे भेटवली. इतके ज्या वर्षांनी दिले ती वाया गेली असे कसे म्हणू ? त्यांनी जे मला सृष्टीचे आणि माणसांचे दर्शन घडवले त्याचा मला पुढल्या ज़ीवनात सतत उपयोग झाला. अजूनही होतो आहे. अनेक प्रकारांनी. त्या वर्षांनी दिलेला अनुभव माझ्या घडणीतच शिरला आहे. तिथेच माझे आयुष्य संपले असते तर मात्र वाटले असते ती वर्ष वाया गेली. पुढे त्याहूनही अधिक वर्षे मिळाली त्यामुळे आता तसे म्हणता येत नाही.

पण हा अनुभव मिळण्यासाठी इतकी वर्षे जायला हवी होती का ? पण ह्या प्रश्नाला आता काय अर्थ आहे ? उलट वेगळ्या रीतीने असे म्हणता येईल की डी. सी. च्या ऑफिसात नोकरीला लागल्यापासून सिद्धार्थ कॉलेजात नोकरीला लागेपर्यंत मी घेत होतो आणि त्या काळात जे घेतले त्यातून त्या नंतरच्या काळात देऊ लागलो. अर्थात नंतरची वर्षेही मला काही ना काही देत राहिली आणि अजून देत आहेत. पण मला वाटते, पुढल्या वर्षाकडून आपण काय घेऊ शकतो ते पूर्वीच्या वर्षाकडून काय घेतले त्यावर अवलंबून असते. निदान बरेचसे. पण ह्या वीस वर्षांनी जे दिले ते मनाचा आणि प्रवृत्तींचा इतका छळ करून देण्याची आवश्यकता नव्हती. गेलेल्या आयुष्याशी मला

भांडायचे नाही - भांडून काय उपयोग म्हणा! - पण 'ती सगळी वर्ष तू पुन्हा तशीच जगायला तयार होशील का?' असे मला कुणी विचारले तर मी म्हणेन 'अगदी तशीच नाही.' 'विपद: सन्तु न: शश्वत्' असे म्हणण्याची माझ्या मनाची तयारी नाही. पण ह्या प्रश्नोत्तरांनाही आता अर्थ नाही.

मात्र असे वाटते की, निश्चिंतीची वर्षे थोडी अधिक मिळाली असती, आयुष्याचा सरळ रस्ता थोडा अगोदर सापडला असता, तर कदाचित् केले त्यापेक्षा अधिक करता आले असते. जे करायचे होते, पण करता आले नाही ते केले असते. पण माझे एक मन म्हणते, " तू काय केलं असतंस अन् काय केले नाहीस, त्याची चर्चा आता कशाला? ह्यापुढे काय करणार आहेस ते सांग."

पण ते मला कसे सांगता येईल? कारण माझ्या आयुष्याची दोरी आणखी किती शिल्लक आहे हे मला कुठे ठाऊक आहे? हे मी उगीच वैतागाने म्हणत नाही. वामनराव जोशी म्हणजे वामन मल्हार म्हणत असत - 'आपले लेखनाचे वगैरे जे काय बेत असतील ते चार लोकांजवळ बोलून ठेवावेत त्यामुळे ते बेत पार पाडायचं आपल्यावर एक प्रकारचं बंधन पडतं आणि ते आपण पार पाडतो.'

तिशी पस्तीशीच्या माणसाला हा उपदेश चांगला आहे. अर्थात भविष्य कोणालाच सांगता येत नसते. तिशी पस्तीशीतल्या माणसालासुद्धा. पण आशा बाळगणे ह्या वयाला शोभून दिसते. नाही, त्या वयात बाळगाव्याच. म्हणूनच तर त्या वयात माझी सारखी धडपड चालली होती. पण आता पाउणशे वयमान झाल्यावर बेत कसले करायचे? कलप लावून आणि कवळी बसवून तरुण आहोत असे दाखवता येईल कदाचित, पण तरुण होता कसे येईल? म्हणायचे तर एवढे म्हणता येईल की शरीर आणि मन धड असेल तोवर करता येईल ते, तेवढे करीत राहीन.

◆

# वावड्या

मी कधी पतंगबाजी केली नसली तरी लहानपणी खूप पतंग उडवले होते. इतरांचे काटले होते. माझे काटले गेले होते. माझे पतंग इतरांच्या दोऱ्यात गुंतले होते. काही वेळा वाव दोन वाव उडून गिरक्या खात खाली आपटले होते. पण आपल्याला पुढल्या आयुष्यात कधी वेगळ्या अर्थाने वावड्या उडवाव्या लागणार आहेत, त्यातल्या बहुतेक उडून गिरक्यासुद्धा न घेता खाली आपटणार आहेत ह्याची त्यावेळी कल्पना नव्हती. तसे होणार आहे असे कोणी सांगितले असते तर ते खरेही वाटले नसते. पण तसे झाले.

इंग्रजी सहावीत गेल्यावर माझ्या मनात माझ्या भवितव्यासंबंधी, आपण पुढे काय करावे यासंबंधी, विचार येऊ लागले. निश्चय असा काहीच नव्हता. मॅट्रिकमध्ये गेल्यावर मात्र मनाशी पक्के ठरवले की, नुसते मॅट्रिक होऊन थांबायचे नाही. पुढे अधिक शिकायचे. पण पुढे शिकायचे म्हणजे काय शिकायचे ते कळत नव्हते. मुंबईला जाऊन व्ही. जे. टी. आय. मध्ये प्रवेश परीक्षेला बसलो. पण प्रवेश मिळाला नाही - मग मात्र कॉलेजात जाऊन बी. ए. व्हायचे हा विचार पक्का केला. कुठे जायचे, कोणत्या कॉलेजात जायचे हे ठरवून प्रत्यक्ष प्रवेश मिळवण्यात दोन वर्षे गेली. पण निदान मॅट्रिक झाल्यावर पुढे काय करायचे याविषयी संदेह राहिला नव्हता.

१९२७ मध्ये बी. ए. झाल्यानंतर मात्र पुढे काय करायचे हे मला ठरवता येईना. मी नुसता पास झालो असतो तर पुढे काय करायचे हे ठरवणे फारसे कठीण गेले नसते. मॅट्रिक झाल्यापासून मी उमरावतीच्या डेप्युटी कमिशनरच्या ऑफिसात नकलनवीसी करीत होतो. नोकरीत कायमही झालो होतो. तिथेच काम करीत राहिलो असतो तर हळूहळू चढत चढत सुपरिंटेण्डण्टच्या जागेपर्यंत पोचलो असतो. कदाचित ऑफिसने मला नागपूरला सेक्रेटरीएटमध्येही पाठवले असते. डी. सी. च्या ऑफिसातली नोकरी सोडून सरकारी शाळेत मास्तर म्हणून लागलो असतो तर कालांतराने एखाद्या हायस्कूलचा हेडमास्तर झालो असतो. पण मला बी. ए. ला वर्ग मिळाला होता त्यामुळे दिशा फाकल्या आणि आपल्यापुढे पुष्कळ वाटा आहेत असे वाटू लागले. उमरावतीत माझे जे हितचिंतक होते ते कोणी काही, कोणी काही सुचवीत होते. कोणत्याही वाटेने जाता येईल असे वाटत होते. पण कोणत्या वाटेने जावे हे ठरत नव्हते. रेव्हिन्यू खात्यात ब्राह्मणांना नोकऱ्या मिळण्याचे प्रमाण त्यावेळी कमी होऊ लागले होते. एलएल. बी. होऊन काही वर्षे वकिली करून मुन्सफीसाठी अर्ज करता आला असता. त्या खात्यात ब्राह्मणांना अजून प्रवेश मिळत होता. माझ्या माहितीचे काही लोक मुन्सफ झाले होते. पण मला वकिलीची आवड नव्हती आणि सरकारी नोकरीत बांधून

घेण्याची कल्पना आवडत नव्हती.

सूचना येतच होत्या. शेवटी असा विचार केला की एम. ए. पदवी घ्यावी आणि प्रोफेसर व्हावे किंवा तसेच काही तरी पुढले शिक्षण घ्यावे आणि संशोधन करावे. एक विचार असा आला की सर्व्हण्टस् ऑफ इण्डियाचा आजीव सभासद व्हावे. पण एम. ए. साठी कॉलेजात जायला पाहिजे. कुठेही कॉलेजात जायचे म्हटले तरी माझी पैशाची अडचण होतीच. म्हणजे स्कॉलरशिप, शिकवण्या वगैरेतून पैसे मिळवता आले तरच हे शक्य होते. शिवाय बहिणीचे शिक्षण चालू होते. तिलाही मदत करायला हवी होती.

कोणीतरी सुचवले की, टाटाकडे अर्ज करावा. त्यांच्या परदेशी शिक्षणाच्या शिष्यवृत्त्या असतात. त्याप्रमाणे अर्ज केला. त्यांचे उत्तर आले, ‘‘आमच्या स्कॉलरशिप्स सायन्सच्या विद्यार्थ्यांसाठी असतात. तुमचे विषय सायन्सचे नाहीत. सबब तुम्हाला स्कॉलरशिप देता येत नाही.’’ त्यामुळे ती वाट बंद झाली.

आमच्या, म्हणजे होळकर कॉलेजच्या प्रिन्सिपलचे पहिला वर्ग मिळाल्याबद्दल माझे अभिनंदन करणारे पत्र आले होते. आमच्या कॉलेजचे काही विद्यार्थी स्कॉलरशिप घेऊन पुढले शिक्षण करण्यासाठी अलाहाबादला गेले होते. ‘‘मला स्कॉलरशिप मिळेल का ?’’ असे मी त्यांना पत्र पाठवून विचारले. त्यांचे उत्तर आले, ‘‘स्कॉलरशिप फक्त होळकर संस्थानच्या प्रजेला मिळते. तू ह्या संस्थानचा प्रजानन नाहीस. त्यामुळे तुला स्कॉलरशिप मिळू शकणार नाही असे मला खेदपूर्वक कळवावे लागत आहे.’’ तोही मार्ग बंद झाला.

एका वाटेने जाण्याचा प्रयत्न करीत असतानाच दुसऱ्या वाटा शोधण्याचे काम चालू होतेच. कारण ज्या वाटेने जाण्याचा आपण प्रयत्न करू त्या वाटेने आपल्याला जाता येईलच याची खात्री नव्हती. या दोन्ही वाटा बंद झाल्या तेव्हा रवीन्द्रनाथ टागोरांच्या ‘‘विश्वभारती’’ त प्रवेश मिळतो का हे पाहण्याचे ठरवले. रवीन्द्रनाथांनी केलेल्या चाकोरीबाहेरच्या शिक्षण कार्याबद्दल शांतिनिकेतन, श्रीनिकेतन ह्या संस्थांबद्दल शाळेत असतानाच वाचले होते. त्या दोन संस्थांप्रमाणेच उच्च शिक्षण देणारी ‘‘विश्वभारती’’ ही त्यांची संस्था एक आदर्श संस्था होती. विद्यार्थी आणि प्राध्यापक तिथे एकत्र राहात असत. त्यामुळे त्यांचे वैयक्तिक संबंध जुळत असत. ‘‘यत्र विश्वमूभवत्येकंनीडम्’’ ( म्हणजे सगळे जग जिथे एका घरट्यात असल्याप्रमाणे राहते. ) हे त्यांचे बोधवाक्य होते. विश्वभारतीत नुकताच चिनी भाषेचा अभ्यास सुरू करण्यात आलेला होता. आपल्या देशात ही एक अपूर्वाईची गोष्ट होती. मी ‘‘काव्यतीर्थ’’ झालो होतो. बंगाली शिकलो होतो. ‘‘काव्यतीर्थ’’ ही कलकत्त्याच्या संस्थेची परीक्षा. हा अभ्यासक्रम नव्यानेच सुरू झालेला असल्यामुळे विद्यार्थ्यांची गर्दी होण्याचा संभव कमी. आपल्याला कदाचित स्कॉलरशिपही मिळेल. आपल्याला जर विश्वभारतीसारख्या संस्थेत टागोरांच्या सान्निध्यात राहून शिकायला मिळाले तर त्यापेक्षा अधिक भाग्याची गोष्ट कोणती ? आपण जर चिनी भाषा चांगली आत्मसात केली, गुरुजनांचा विश्वास संपादन केला तर विद्येच्या एका नव्या क्षेत्रात प्रवेश केल्यासारखे होईल. चीनचा प्रवासही घडू शकेल. प्राचीन काळी बौद्ध धर्म भारतातून चीनमध्ये गेला. इत्सिंग, फाहियान, ह्यूएनत्संग ह्यांच्यासारखे बौद्ध विद्वान बौद्ध

धर्माच्या अभ्यासासाठी, बौद्ध धर्मक्षेत्रे पाहण्यासाठी भारतात आले. आपण चिनी भाषा शिकलो तर आपल्याला चीनमध्ये जाऊन तिथे असलेले बौद्ध मठ, बौद्ध ग्रंथ पाहता येतील. चिनी भाषा शिकून चीनमध्ये जाणारे आपण कदाचित पहिलेच भारतीय असू अशी अनेक आकर्षक चित्रे नजरेसमोर तरळू लागली. मी विश्वभारतीला पत्र लिहिले. बी. ए. ला पहिला वर्ग मिळाल्याचे, ''काव्यतीर्थ'' असल्याचे, आणि वाचून समजण्यापुरते बंगालीही येत असल्याचे कळवले.

विश्वभारतीकडून लवकरच अनुकूल उत्तर आले. उत्तर अनुकूल होते. पण तिथे जाण्याला प्रवृत्त करणारे नव्हते. त्यांनी तीस की पस्तीस रुपये दरमहा स्कॉलरशिप देऊ केली होती. कदाचित तिथे त्या दिवसात तेवढ्या पैशात राहणे-जेवणे शक्य झाले असते. पण कपडेलत्ते, कलकत्ता - उमरावती वर्षातून दोनदा जाण्या - येण्याचा प्रवास, बहिणीला काही पैसे पाठवावे लागले असते. एका वर्षाने मॅट्रिक झाल्यानंतर तिने पुढे शिकायचे ठरवले असते तर अधिकच मदत कदाचित करावी लागली असती. हे सगळे त्या पस्तीस रुपयात कसे भागवायचे? निदान पन्नास रूपये स्कॉलरशिप मिळाली असती तर थोडीबहुत काटकसर करून ह्या गोष्टी साधता आल्या असत्या. पस्तीस रुपयात ते शक्य झाले नसते. त्यामुळे विश्वभारतीसारख्या प्रतिष्ठित विद्यापीठात राहून चाकोरीबाहेरची भाषा शिकण्याचे स्वप्न मला कष्टाने का होईना पुसून टाकावे लागले. म्हणजे मनाच्या आकाशात मी जी वावडी अगदी उंच उडवली होती ती एकदम गिरकी घेऊन सरळ खाली आपटली आणि फाटून गेली.

त्याचवेळी आणखी जे विचार मनात येत होते त्यात अमेरिकेला जाऊन पुढले शिक्षण घ्यावे असाही एक विचार होता - आता नक्की आठवत नाही पण स्वामी सत्यदेव, किंवा अशाच नावाच्या कोणी तरी''अमेरिकेतील गरीब विद्यार्थी'' अशा नावाचे पुस्तक लिहिले होते ते मी वाचले होते. ''फ्रॉम लॉग कॅबिन टु व्हाइट हाऊस'' हे जेम्स गार्फील्डचे चरित्र वाचले होते. अमेरिकेत छोटी कामे करीत करीत पैसा मिळवून शिक्षण करता येते असे ऐकले होते. जहाजावरल्या प्रवासाचा खर्च जहाजावर काम करून काढता येत असे. खानखोजे, रामलाल वाजपेयी, नांदेडकर असे काही महाराष्ट्रीय तरुण अमेरिकेत शिकत होते. होळ्कर कॉलेजचे फिजिक्सचे माजी प्रोफेसर शं. ल. गोखले हे अमेरिकेत एका कंपनीत मोठ्या हुद्द्याच्या जागेवर होते, वगैरे ऐकलेले होते.

बर्कली, कॅलिफोर्निया, ह्या ठिकाणच्या एका संस्थेची जाहिरात त्यावेळी 'केसरी'त येत असे. अमेरिकेत जाऊ इच्छिणाऱ्या महाराष्ट्रीयांना साहाय्य आणि मार्गदर्शन करण्याला ती संस्था तयार होती. जवळ पैसा नसतानासुद्धा अमेरिकेत शिक्षण घेणे शक्य होते, फक्त अमेरिकेत प्रवेश करताना आपल्याजवळ पाचशे रुपये आहेत हे दाखवावे लागे. तेवढी रक्कम मला माझ्या हितचिंतकांकडून मिळू शकली असती. अमेरिकेत जाऊन कोणत्या विषयाचे शिक्षण घ्यावे हे ठरवले नव्हते. पण साहित्य किंवा समाजशास्त्र ह्यांपैकी कोणतातरी विषय निवडावा असे मला वाटे. कारण ह्या दोन्ही विषयासंबंधी मला आस्था होती. आणि मनातल्या मनात असे एक वाटत होते की, आपल्यास सरकारी हिंदू हायस्कूलचे श्रीधर व्यंकटेश केतकर जसे अमेरिकेत जाऊन समाजशास्त्राचे एम. ए. पीएच. डी. होऊन आले तसे आपण होऊन यावे! त्यावेळी हिंदुस्थानात फक्त मुंबई विद्यापीठातच

समाजशास्त्र शिकवले जाते असे मी ऐकले होते आणि त्यालाही नुकतीच सुरुवात झाली होती. तेव्हा अमेरिकेतून परत आल्यावर आपल्याला कुठेही प्रोफेसरची जागा मिळेल ही त्यावेळी कल्पना होती.

मला वाटते मी बर्कलीच्या त्या संस्थेला पत्रही पाठवले होते. मग मी विचार करू लागलो: काम करून पैसे मिळवून शिकायचे म्हणजे सलग शिकण्यापेक्षा अधिक वर्षे लागणारच. ती किती लागतील त्याचा काय नेम ? तोपर्यंत इथे बहिणीकडे कोण पाहील ? तिला मदत लागली तर कोण करील ? आणि समजा काही तरी झाले आणि मी परत येऊच शकलो नाही तर ? तर तिला एकटीला टाकून गेल्यासारखे होईल. असे विचार मनात येऊ लागले. खरे म्हणजे ते आधीच यायला पाहिजे होते. पण मी माझ्या भविष्याची स्वप्ने रंगवण्यात गुंगून गेलो होतो, त्यामुळे आले नव्हते. पण ते केव्हा तरी येणारच होते. हे विचार पुढे आल्यानंतर अमेरिकेत जायचा विचार मागे पडला. ही वावडी उडालीच नाही.

ही किंवा ह्यांपैकी कोणतीच वावडी न उडण्याची कारणे म्हणजे एकटेपण तसेच घराचा आणि पैशाचा अभाव. त्यामुळेच सतत बहिणीचा विचार करावा लागे. बहिणीकडे पाहणारे कोणी असते, किंवा कोणी असे म्हणणारे असते - "तू जा. तिची काळजी आम्ही घेऊ." तर पैशाचा विचार न करताही मी काही तरी केले असते. पण काही संबंध नसताना असे आश्वासन कोण कसे देईल ?

हे सगळे विचार सोडून द्यावे लागले तरी पुढे शिकायचा विचार सुटला नव्हता. म्हणून शेवटी मुंबईला जाऊन समाजशास्त्र घेऊन एम. ए. व्हायचे आणि समाजशास्त्राचा प्रोफेसर, इंग्रजी पत्रकार किंवा सर्व्हण्टस ऑफ इण्डिया सोसायटीचा आजीव सभासद व्हायचे असा विचार केला. सोसायटीने जर मला सभासद करून घेतले तर समाजकार्य करता येईल. सोसायटीची राजकीय आणि सामाजिक विचारसरणी मला मानावणारी होती. प्रत्यक्ष राजकारण करण्याची मला इच्छा नव्हती. आणि तो माझा पिंडही नव्हता. सोसायटीची राजकारणाखेरीज इतरही कामे होती. 'विश्वभारती'सारखे नाही तरी सोसायटीचे वातावरण व्यासंगी होते. अभ्यासाला, व्यासंगाला, विचाराला निवांतपणे काम करण्याला, तिथे वाव मिळेल असे वाटत होते. पैसा मिळाला नसता - पण आपण खूप पैसा मिळवावा असे मला कधी वाटले नाही. संसार चालवण्याला पुरेसा पैसा सोसायटी देत असे. माझ्या नजरेसमोर ना. म. जोशी, गो. कृ. देवधर असे लोक होते.

मुंबईला जाऊन एम. ए. व्हायचे म्हटले तरी पोटासाठी काही तरी नोकरी करायला पाहिजेच होती. आणि संस्कृत, फिलॉसॉफी घेऊन बी. ए. झालेल्या मला समाजशास्त्र विभागात प्रवेश मिळेलच ह्याची खात्री काय ? बी. ए. ला पहिला वर्ग मिळाला होता एवढीच माझी जमेची बाजू. पण योगायोग असा की, मुंबईत नोकरी मिळू शकेल अशी आशा वाटण्याजोगे एक ओळखपत्र मला मिळाले. तसेच समाजशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. घुर्ये ह्यांच्याशी व्यक्तिश: ओळख होण्यालाही एक पत्र मिळाले. शिवाय माझी मुंबईत राहण्याची सोय होऊ शकत होती.

ही दोन पत्रे घेऊन मी मुंबईला आलो. त्यावेळी १९२७ साली गिरगाव बॅकरोडवर आंग्रेवाडीत

असलेल्या आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या हायस्कूलमध्ये मला नोकरी मिळाली. आणि डॉ. घुर्यांनी मला त्यांच्या विभागात प्रवेशही दिला. आपल्याला पुढची वाट सापडली असे वाटले.

नोकरी आणि विद्यापीठात प्रवेश ही दोन्ही मिळाल्यावर सँढर्स्ट रोडवरच्या सर्व्हंटस् ऑफ इण्डिया सोसायटीच्या ऑफिसात जाऊन तिथे जे कोणी होते, मला वाटते श्री. बखले, ह्यांना मी भेटलो, माझा विचार त्यांना सांगितला. एम. ए. झाल्यावर त्यासंबंधी विचार करता येईल असे ते म्हणाले.

मी नोकरी आणि एम. ए. चा अभ्यास दोन्ही चालू ठेवले. मी प्रबंध लिहून एम. ए. होणार होतो. विषय ठरवला होता त्यासाठी वाचन करीत होतो. सर्व ठीक चालले होते. विशेष म्हणजे वर्ष सव्वा वर्षानं मला समाजशास्त्राच्या अभ्यासासाठी विद्यापीठाची स्कॉलरशिप मिळाली. त्यामुळे मी नोकरी सोडली आणि विद्यापीठात जाऊन वाचन करू लागलो.

आता गाडी व्यवस्थित मार्गाला लागली असे मला वाटले. चार-सहा महिने सुरळीत गेले. आणि मग प्रकृती बिघडू लागली. ती वेगवेगळ्या प्रकारांनी बिघडतच राहिली. आणि अखेर समाजशास्त्राची वावडीही माझ्या हातातून निसटली, हेलकावत गेली आणि दृष्टिआड झाली. साहजिकच सर्व्हन्टस् ऑफ इण्डिया सोसायटीत जाण्याचा विचारही मागे पडला.

त्यानंतर अखेर १९३३ मध्ये मी इंग्रजी मुख्य भाषा आणि मराठी दुय्यम भाषा घेऊन एम. ए. व्हायचे ठरवले आणि कॉलेजात नाव घातले. १९३५ मध्ये एम. ए. झालो. दरम्यान १९३२ मध्ये माझे लग्न झाले होते. माझी पत्नी सौ. सुधा हिला शाळेत नोकरी होती आणि मला एक शिकवणी होती. आमचे दोघांचेही हात मिळवीत होते म्हणूनच मी एम. ए. होऊ शकलो. एम. ए. झाल्याबरोबर हवी होती ती वाट सापडली. किंवा ही वावडी लगेच उंच उडू लागली असे मात्र झाले नाही. पतंग उडवताना पुष्कळदा असे होते की, तो थोडासा उंच जातो. तिथेच घुटमळत राहतो. तो खाली पडू नये म्हणून आपण दोऱ्याला सारखे हिसके देत असतो. अखेर त्याला वाऱ्याची दिशा सापडली म्हणजे तो वर जातो. तसेच ह्यावेळी झाले. एम. ए. झाल्यानंतर बारा वर्षांनी तिला वाऱ्याची दिशा सापडली. आणि मग त्या आधारावर आपल्या कुवतीप्रमाणे ती जाता येईल तितकी उंच गेली. ही वावडी मी मुळात मनात धरलेल्यापैकी नव्हती. पण साहित्याबद्दल मला आस्था असल्यामुळे मी ती हाती घेतली ती आवडीनेच. ह्या अवधीत मी लेखनही करू लागलो होतो.

बी. ए. च्या परीक्षेचा निकाल लागून मुंबईला येईपर्यंत वावड्या उडवण्याचा मी जो प्रयत्न केला त्यात दिवस मात्र फार गेले नाहीत. फक्त एक-दीड महिना. त्या वावड्या उडाल्या नाहीत. पण वेगवेगळ्या रंगाची एकएक वावडी उडवताना मन त्या खूप उंच उडवीत होते. आणि त्यात त्याला उंच जात असल्याचा आणि अधिकाधिक विस्तारत जाणारे क्षितिज पहाण्याचा आनंद होत होता. एका अर्थी वांझोटा खरा, पण तोही अनुभवच. आणि असे काही अनुभव प्रत्येकालाच येत असले पाहिजेत.

◆

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
विभाग
दा. क्र. 3426
35222
6/7/93
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)



रा.भि. जोशी - सुधा जोशी
(१९३२)

या शतकातल्या तिसऱ्या दशकांत सुशिक्षित महाराष्ट्रीय समाजात जे वैचारिक वारे वहात होते, ज्या साहित्यिक - सामाजिक घडामोडी चालू होत्या, त्यांची प्रत्यक्ष अनुभवलेली झलक ताईच्या लेखांमधून प्रत्ययकारी रीतीने व्यक्त झाली आहे. तसेच तिच्या इतर काही लेखांमधूनही त्या आधीच्या, विसाव्या दशकातलं सामाजिक जीवन, विशेषत: मुली आणि स्त्रिया यांचं जीवन त्यातल्या निरनिराळ्या तपशीलांसकट समोर उभं राहिलं आहे.

भाऊंचे लेख संख्येनं मुद्दाम कमी ठेवले आहेत, त्यांचं स्वरूप एकसंध न ठेवता, भाऊंच्या एकूण लेखनप्रकृतीचं प्रतिनिधित्व करील असं ठेवलं आहे. त्या उभयताचं एक एकत्रित स्मरण म्हणून आणि ज्या काळात त्यांनी आपल्या थोड्याफार जगावेगळ्या सहजीवनाला सुरुवात केली, त्या काळची आठवण उजळण्यासाठी ही संग्रहयोजना.

मी लहान असतानाची मला आठवणारी ताई घरात काम करताना निरनिराळ्या कवींच्या कविता चालीवर गुणगुणत असायची. तिच्या एका आवडत्या, माधव ज्यूलियन यांच्या कवितेची पहिली ओळ या संग्रहाचं शीर्षक म्हणून दिले आहे.

"एकत्र गुंफून जीवित - धागे"